# आदित्यदीप

वर्ष : ११ / अंक : ४

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२०

## दीपावली चारधाम विशेषांक



**बद्रिनाथं रामेश्वरं पुरी द्वारावती तथा ।।**
**चत्वारि पुण्यधामानि भारते मोक्षदायकम् ।।**

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२०                                    शके १९४२

"आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।।"



कार्यकारी संपादक
सौ. अपर्णा अभ्यंकर

# आदित्यदीप

(आदित्य प्रतिष्ठानचे वार्तापत्र)



संस्थापक-संपादक
गुरुदेव शंकर अभ्यंकर

वर्ष : ११                                    अंक : ४

## अंतरंग


| | |
|---|---|
| संपादकीय – सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर | ४ |
| बहुतांची अंतरे | ६ |
| यूट्यूबवरील प्रवचनमाला | ७ |
| १. बदरीनाथ (उत्तरेचे धाम) | १२ |
| २. जगन्नाथ पुरी (पूर्वेचे धाम) | २१ |
| ३. द्वारका (पश्चिमेचे धाम) | ३५ |
| ४. रामेश्वरम् (दक्षिणेचे धाम) | ४४ |
| हे पाठ कराच ! - श्रीसूक्तम् (अर्थासह) | ५२ |
| पठण एक अनुभव – सौ. विशाखा निरंजन बिळगी | ५६ |
| बोधाची व तृप्तीची उजळणी – सौ. प्राजक्ता नितीन जोशी | ५७ |
| श्रद्धांजली – कै. डॉ. शरदराव रेगे / कै. मोहनराव फडणीस | ६१ |
| माझ्या तरुण मित्रांनो – गुरुदेव | ६२ |


प्रकाशक, मुद्रक, मालक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** (कार्यकारी विश्वस्त - आदित्य प्रतिष्ठान)
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२
संपादक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** यांनी हे त्रैमासिक
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२ येथून प्रसिद्ध केले.
REGISTERED : RNI No. MAHMAR / 2010 / 31595

# आनंदवार्ता

## । पुनश्च हरिः ॐ ।





* आदित्यव्रती *
डॉ. मोघेकर
श्री. निलेश जालनावाला
श्री. रवी शिंदे
श्री. योगेश लोहार
श्री. कौस्तुभ बेलसरे



कोरोनामुळे स्थगित झालेले संतभारती मंदिर बांधकाम दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर पुन्हा सुरू झाले.

**या देवकार्यास देणग्यांचे स्वागत आहे.**

ADITYA PRATISHTHAN
HDFC BANK
A/c No. 0825 111 000 0016
Branch : Hingne Khurd,
Sinhagad Road, Pune
IFSC : HDFC0000825

ADITYA PRATISHTHAN, INC. USA
CHASE BANK
A/c No. 287576612
Contact :
Ramesh Sarva CPA, PC
183 S. Broadway
210 Hicksville, NY 11801
RAMESH@SARVA.ORG
(718) 268-4933

## संपादकीय

# धाम म्हणजे काय?



– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर

सस्नेह नमस्कार,

आदित्यदीपचा २०२० चा **'चार धाम विशेषांक'** आपल्या हाती देताना मनामध्ये विशेष समाधान आहे. हे वर्ष उजाडले तेच मुळी कोरोनाची चाहूल घेऊन. भारतातही तो येणार म्हणता म्हणता मार्चमध्ये तो आलाच! परिणामी मोदीजींना २२ मार्चपासून पूर्ण देशामध्ये 'लॉक डाऊन' अर्थात संचारबंदी, जमावबंदी घोषित करावी लागली. इतर देशांपेक्षा लोकसंख्येने मोठा असलेला आपला देश! शिवाय विकसनशील! त्यामुळे सरकारने घातलेले नियम पाळले जाणार का? स्वच्छता कशी सांभाळणार? मुंबईला केवढी मोठी झोपडपट्टी! घनदाट वस्ती म्हणजे एका १० बाय १० च्या खोलीत १२-१५ जण राहतात. अशी ही जगामध्ये थोडी बदनामच झालेली धारावी! मग तेथे कसचे 'सोशल डिस्टंसिंग' पाळणार! अशा अनेक शंका-कुशंकांचे जाळे प्रत्येक सुजाण नागरिकाच्या मनात विणले गेले. महाराष्ट्रात कोरोनाचे प्रमाण सर्वात जास्त झाले. टीव्हीवर येणारे मृत्यूचे आकडे वाचले की पोटात भीतीचा गोळा फिरे. रोज एखाद्या जवळच्या नात्यातील वा कुटुंबातील व्यक्ती गेल्याचे कळल्यावर मनावर दु:खाचा ओरखडा उठे! त्यात या त्रि-शंकू सरकारचा अजब कारभार! देवळात जाऊन देवदर्शन घ्यावे तर देऊळ बंद! घरामध्येच स्वत:ला स्थिर करण्यावाचून पर्यायच उरला नाही! उद्योगधंदे, छोटे-मोठे व्यवसाय ठप्प झाले, विमानसेवा, हॉटेल्स-मॉल्स सारेच ठप्प! त्यामध्ये हॉस्पिटलमध्ये योग्य तो उपचार मिळेना! सगळीच अवस्था मोठी बिकट! ती म्हण आहे ना- 'आई जेऊ घालीना । बाप भिक मागू देईना ।' अशी अवस्था जनसामान्यांची झाली. बरे, रोग असा भयानक की अंतकाळी जवळ आप्तजन यायलाच परवानगी नाही. नाहीतर रोग पसरेल अशी भीती! जनमानसात प्रचंड नैराश्य दाटले. अशावेळी विवेक करून संतवचने आठवावीत आणि घरी एकांतात एका जागी बसावे लागले तरी उत्तम ग्रंथवाचन, श्रवण, पठण यात स्वत:ला गुंतवून घेणे हाच एक उत्तम मार्ग होता. आता सहा महिन्यानंतर परिस्थिती हळूहळू सुधारते आहे आणि भारतामध्ये इतर देशांपेक्षा मृत्यूदर कमी व रुग्ण बरे होण्याची संख्या जास्त कशी याचा विस्मय जगामध्ये आहे.

समर्थ सांगतात,

जन्मभरी स्वार्थ केला । तितुकाचि व्यर्थ गेला।
कैसा विषम काळ आला । अंतकाळी ।।
जन्म अवघा दु:खमूळ । लागती दु:खाचे इंगळ।
म्हणोनिया तात्काळ । स्वहित करावे ।।

(दासबोध ३.५.५०, ५२)

या कठीण काळामध्ये आदित्य प्रतिष्ठानने यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून अत्यंत बोधप्रद असे गुरुदेवांचे सकारात्मक विचार लाखो श्रोत्यांपर्यंत पोहोचवले. अनेक प्रवचनातून, स्तोत्रामधून, पठणामधून ही सात्त्विक ऊर्जा लोकांपर्यंत सातत्याने पोहोचवण्याचे काम आम्ही सतत करत राहिलो आणि असंख्य श्रोत्यांनी त्याची पावतीही आम्हाला दिली.

**चारधाम विशेषांक –** त्याचाच एक सत्त्वांश म्हणजे आम्ही यावर्षीचा दीपावली विशेषांक भारतातील जगप्रसिद्ध अशा 'चार धामांविषयीचा काढलेला विशेषांक! अर्थात हा मागील अंकाप्रमाणेच 'इ-विशेषांक' असणार आहे. तो तुम्हाला वॉटस् ॲप वा वेबसाइटवर उपलब्ध होणार आहे. प्रत्यक्ष कागदावर छपाई होणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

भारतातील बद्रीनाथ, द्वारका, पुरी आणि रामेश्वर अशी भारताच्या चार दिशांना असलेली चार तीर्थक्षेत्रे अत्यंत प्राचीन, पवित्र आणि भारताचे भक्तीचे उभे-आडवे धागे जोडून भक्तीचे महावस्त्र निर्माण करणारी आहेत. आपण म्हणतो, 'चार धाम यात्रा केली की सार्थक झाले बुवा!' तर ही चार धामे कोणती, कशी निर्माण झाली, तेथील मूर्ती कोणत्या, त्यांचे वैशिष्ट्य काय अशी अत्यंत उद्बोधक आणि रंजक माहिती तुम्हाला या विशेषांकात वाचायला मिळणार आहे. गुरुदेवांनी संपादित केलेल्या 'तीर्थक्षेत्रे-मंदिरे' या भक्तिकोशाच्या ५ व्या खण्डातून प्रामुख्याने ही माहिती घेतली आहे. ही वाचल्यावर हा ग्रंथ आपल्याकडे असावाच असे तुम्हाला वाटले नाही तरच नवल!

**'धाम' म्हणजे काय? –** 'धाम' या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. १) 'धाम' म्हणजे रोगाची साथ, व्यसन. 'देशात कोरोनाची धाम आली आहे.' अशा अर्थाने हा शब्द वापरला जातो. २) 'धाम'चा दुसरा अर्थ घर, स्थान, ठिकाण. 'जी जी परम मंगळ धामा । सकळ देवदेवोत्तमा ॥' (ज्ञानेश्वरी ३.२८) 'चार धाम' मध्ये हाच अर्थ आहे. पवित्र अशी चार स्थाने. ३) धामचा तिसरा अर्थ 'देह' असाही आहे. ४) 'धाम'चा चौथा अर्थ रूप, तेज, प्रकाश, प्रभाव असाही आहे. 'परंधाम परब्रह्म परेशं परमीश्वरम्' येथे हा अर्थ अभिप्रेत आहे.

सर्वश्रेष्ठ धाम म्हणजे वैकुंठधाम! पण ते प्रत्येकाला लाभतेच असे नाही. म्हणून आमच्या श्रेष्ठ आत्मज्ञानी ऋषिमुनींनी या भूतलावरच श्रेष्ठ धामे निर्माण केली. तर अशी ही पवित्र **'धामे'** प्रत्येकाने दर्शन घ्यावी अशीच आहेत. कारण ही आपली तीर्थक्षेत्रे आहेत. प्राचीनकाळी तपस्वी, ऋषिमुनींनी आपल्या तपस्येने, त्यागाने आपल्या गावाला 'तीर्थाचे' महत्त्व प्राप्त करून दिले. आमच्या पूर्वजांनी पूर्ण विचार करून धर्मासाठी यात्रा करण्याचा उद्देश लोकांच्या मनात रुजवला. तीर्थयात्रेचे अनेक लाभ आहेत. त्या त्या ठिकाणची वेशभूषा, राहणीमान, आचार-विचार, भाषा, पीकपाणी याची माहिती घेऊन मानव प्रगल्भ तर होतोच पण मंदिरातील देवापुढे नतमस्तक होऊन मनातील दुष्ट विचारांची जळमटे दूर होतात अन् काहीकाळ माणूस स्वत:स विसरून त्या ठिकाणी मन:शांती अनुभवतो. अंत:करणात उच्च सात्त्विक भाव स्थायी स्वरूपात निर्माण होतात. सांसारिक अनिश्चितता, वैभव, विलासी जीवन यांच्या क्षणभंगुरतेची जाणीव होऊन तो भविष्याबद्दल जास्त जागृत होतो. आपले पूर्वज व प्राचीन इतिहासाचे महत्त्व खऱ्या अर्थाने कळते. निसर्ग व परमेश्वरापुढे आपण किती छोटे आहोत याची जाणीव होते. सहकार्य व एकात्मता जागते. म्हणून तर प्रतिष्ठान तीर्थपर्यटन आयोजित करते.

या विशेषांकामध्ये दिलेल्या चार धामांचे दर्शन यावर्षी घरबसल्या घ्या आणि स्तोत्रपठणाने सात्त्विक भक्ती जागृत करा.

ही दीपावली सर्वांना सुखा-समाधानाची जावो. कोरोनाची दुसरी लाट येऊ नये यासाठी सर्व नियम पाळून ही दीपावली साजरी करुया.

'सर्वांना दीपावलीच्या मंगलमय शुभेच्छा!!!'

* * *

## बहुतांची अंतरे

९ ऑगस्ट २०२०

म्यानमारला मोबाईलवर युट्यूब बघायला शिकले आणि तिथे गुरुदेव शंकर अभ्यंकरांची विवेकानंद, संत तुकाराम, श्रीसमर्थ रामदास यांच्यावरील व्याख्याने ऐकली आणि मला वेडच लागले त्यांची व्याख्याने ऐकण्याचे. त्यांचे व्यक्तिमत्त्व, भव्य कपाळ, त्यावर लाल उभे गंध अत्यंत टापटिपीत असलेले कपडे आणि हसरे व्यक्तिमत्त्व! विषय कोणताही असो त्यांच्या शब्दाला धार आहे, तेज आहे. सखोल विचार समोरच्या श्रोत्यांना सहज खिळवून ठेवतात. पार्ल्याला त्यांची व्याख्याने मी ऐकली आहेत. त्यामुळे त्यांची व्याख्याने म्हणजे पर्वणीच. आता युट्यूब आणि कोरोना यांचे जणू माझ्यावर उपकारच झालेत. गुरुपौर्णिमा, आषाढी एकादशीचे कीर्तन, गीत रामायण, लोकमान्य टिळक ही सर्व व्याख्याने तर ऐकलीच. रुद्रावरील माहिती आणि याबरोबरच जुनी व्याख्याने पण ऐकते आणि सर्व थकवा निघून जातो. त्यांचे 'यं ब्रह्मा' म्हणून झाल्यावर 'हे प्रभो' ही जी आर्त हाक आहे ती मनाला आणि कानांना तृप्त करते. साधनेचे तेज जे असते म्हणतात ते गुरुदेवांच्या मुखावर दिसून येते.

**– सौ. शोभना वसंत केळकर**

आदित्यदीप- एप्रिल ते सप्टेंबर २०२० हा आपला पहिलाच ई-अंक! कुठल्याही का निमित्ताने असेना, प्रतिष्ठानने टाकलेले हे फार महत्त्वाचे पाऊल आहे व नक्कीच कौस्तुकास्पद आहे. भविष्यात ह्या माध्यमांचा आपल्याला प्रचंड फायदा होणार आहे हे स्पष्टच आहे.

ई-अंक उत्तम मजकूर, सुयोग्य संकलन व उत्कृष्ट संपादन नेहमीच्याच सफाईने केल्याचे नक्कीच जाणवते. सौ. आरतीचे विशेष अभिनंदन!

राणी लक्ष्माबाईंवरील आदरणीय गुरुदेवांचे भाषण ५००० लोकांनी यूट्युबवर बघितले/ऐकले तसेच आषाढीचे कीर्तन १०००० लोकांनी बघितले/ऐकले तसेच महर्षी व्यासांवरील प्रवचन १९००० लोकांनी बघितले/ऐकले.

याहूनही खूप मोठे आकडे साध्य होणे ही तर ह्या ई-तंत्रज्ञानाची खासियत आहे. अर्थात आ. गुरुदेवांना प्रत्यक्ष बघणे व ऐकणे याची तुलना कशाशीही करणे शक्य नाही हेही तितकेच खरे!

याचसाठी गेली २० वर्षे ई-शिक्षणक्षेत्रात काम करताना एक मंत्र आम्ही कायमच पाळला. तो म्हणजे 'Brick Plus Click Learning' अर्थातच शाळा/महाविद्यालयातील वर्गामधील शिक्षणाला ई-शिकवण्याची जोड हवी. एकाच नाण्याच्या ह्या दोन बाजू आहेत.

ई-माध्यमातील ताकद प्रचंड आहे. आपण प्रत्यक्ष करीत असलेल्या सर्व कार्यक्रमांना ह्या माध्यमाची जोड देऊन विनासायास असंख्य (देशात व परदेशात एकाच वेळी) लोकांपर्यंत पोहोचण्याचा हा सुलभ सोपानच आहे जणू.

त्याशिवाय असे अनेक ई-अंक, व्हिडिओ वगैरे यांचा ई-साठा आपण सहजपणे करू शकतो तो अतिशय कमी जागेत तो संगणकाच्या आतील मेमरीमध्ये!!!

**– श्री. श्रीकांत आठवले**

*(वर उल्लेखिलेले आकडे गेल्या काही दिवसातले आहेत. परंतु आत्तापर्यंत श्रीकृष्ण प्रवचनमाला सुमारे दोन लाख श्रोत्यांनी, श्रीसूक्त प्रवचनमाला पंच्याहत्तर हजार, श्रीसूक्त पठण ८७ हजार, विष्णुसहस्रनाम १ लाख श्रोत्यांनी ऐकली आणि प्रतिदिनी ही संख्या वाढतेच आहे. – संपादिका)*

श्रीकांतभाऊ अगदी बरोबर लिहिले आहे तुम्ही!

खरोखरच आपल्या प्रतिष्ठानने टाकलेले हे उल्लेखनीय पाऊल आहे. या माध्यमामुळे सतत सर्वांशी संपर्क राहून संघटन अधिक सबळ होण्यास मदत होत आहे. गुरुदेवांचे दर्शन प्राप्त होते. भौगोलिक अंतर मिटते. शिवाय पुन:प्रत्ययाचा आनंद घेता येतो. आपल्याबरोबर अनेकांना या सात्त्विक विचारधारेमध्ये सहभागी करून घेता येते.

अभ्यंकर परिवाराचे आम्ही सर्व ऋणी आहोत.

**– सौ. विशाखा बिळगी**

चिदानंदरूप: शिवोहम् शिवोहम् ...

प्रत्येक वेळेस हे स्तोत्र पूजनीय गुरुदेवांच्या पावन वाणीतून ऐकताना अतिशय शांती, समाधान, परमानंद मनामध्ये दाटून येतो. एका वेगळ्याच उंचीवर गेल्याचा भास होतो, कारण लिहिणारे आणि स्तोत्र म्हणणारे दोघेही आम्हाला शंकराचार्यच आहेत. पूजनीय गुरुदेव चरणी नम्रतापूर्वक साष्टांग नमस्कार!

**– सौ. प्राजक्ता जोशी**

मूर्ती शंभूशंकराची
लेखणी शंकराचार्यांची
वाणी गुरुदेवांची
प्रसन्नता श्रावणी सोमवारची
चिदानन्द रूप: शिवोऽहम् शिवोऽहम् ।

**– सौ. रश्मी तुळजापूरकर**

आदरणीय गुरुदेव व सौ. वहिनी व
सर्वच श्रद्धेय परिवार सादर नमस्कार.

यावर्षी श्रावण महिन्यात विशेष पुण्य आपल्या सर्वांना लाभले आहे. कालभैरव स्तोत्र, प्रवचने, कीर्तन, आदित्यदीप अंक व शिवोऽहम् शिवोऽहम्।

**– श्रीमती वनिता भिडे**

श्रीसूक्ताचे मंत्रमुग्ध करणारे प्रवचन. त्या काळात या राष्ट्राचा महिमा इतका श्रीसूक्तात असेल असे कधीच वाटले नव्हते. कोटी कोटी प्रणाम.

**– मुक्ता आणि गायत्री भगिनी**

श्रीसूक्तात सांगितलेले विचार आवडले. भारतीय संस्कृतीत जेवढे आचार विचार सांगितले आहेत ते जास्तीत जास्त लोकांनी व तरुण पिढीने अनुसरायला हवेत. तेव्हाच या भारताचे भवितव्य उज्ज्वल होण्यास मदत होईल.

**– श्रीमती कुन्दा मोडक**

श्रीसूक्त प्रवचन खूपच छान. अर्थपूर्ण माहिती देणारे आपल्यासारख्या विद्यावाचस्पतींच्या श्रीमुखातून ऐकायला मिळाले. आनंद झाला.

**– श्री. सुहास पाठक**

नमस्कार,

अहाहा! 'वेदसारशिवस्तव' हे इतकं रसाळ स्तोत्र; त्यातून गुरुदेवांचा आवाज आणि त्यात ओथंबून भरलेली भक्ती... मी तर थेट वीस वर्षे मागे गेले... आपल्या टिळक रोडच्या प्रतिष्ठानच्या ऑफिसमधील गुरुदेवांचे उत्स्फूर्त भजन गायन अजून माझ्या कानात घर करून आहे. म्हणजे ती भजने जशीच्या तशी माझ्या कानात वाजतात.

**– सौ. माधवी टोळ**

अपर्णाताई, तुमच्या आवाजातील विष्णु-सहस्रनाम स्तोत्र यूट्यूबवर ऐकले. स्पष्ट उच्चार आणि लयबद्ध पठण मनाला प्रसन्न करते. छान वाटले. गीतापठण ऐकण्यासाठी मन उत्सुक आहे.

**– सुनीता गरुड**

# यूट्यूबवरील प्रवचनमाला

## चॅनेल : 'Aditya Pratishthan'

**(कोरोनामुळे आलेल्या लॉकडाऊनच्या कालखण्डात गुरुदेव सर्वांना भेटत राहिले ते यूट्यूबवरील 'Aditya Pratishthan' या चॅनेलच्या माध्यमातून. असंख्य श्रोत्यांनी त्याचा लाभ घेतला व घेत आहेत. आपणही हे चॅनेल अवश्य सबस्क्राइब करा.) चॅनेल सबस्क्राइब करणे विनामूल्य असते. यामुळे गुरुदेवांची नवीन प्रवचने तुम्हाला कळत जातील.**

### १) शिवस्तोत्र पठण

आदि शंकराचार्य रचित अशा चार स्तोत्रांचे पठण क्रमाने चार श्रावणी सोमवारी गुरुदेवांनी त्यांच्या धीरगंभीर तरीही मृदु, गोड आवाजात यूट्यूबवर सादर केले. ही उत्कट, मधुर स्तोत्रे श्रवण करून श्रोत्यांना वेगळेच आंतरिक समाधान लाभले.

अ) सोमवार, दि. २७-७-२०२०

**कालभैरवाष्टकम् –** काशी विश्वनाथाच्या अष्टभैरवांपैकी कालभैरवाला अधिक प्राधान्य आहे. ऐहिकदृष्ट्या शोकमोहाचा निरास व पारमार्थिकदृष्ट्या ज्ञान-मुक्तीचा लाभ कालभैरवाच्या कृपेने होतो म्हणून त्याचे नित्य पठण करावे. विश्वनाथ - अन्नपूर्णेच्या दर्शनानंतर कालभैरवाचे दर्शन घेतात. त्याशिवाय काशीयात्रा पूर्ण होत नाही.

ब) सोमवार, दि. ३-८-२०२०

**वेदसारशिवस्तवः –** हे स्तोत्र वेदांनी केलेल्या शंकराच्या वर्णनाचे सारच आहे. भाषा सुबोध आणि वर्णनही गोड आहे.

क) सोमवार, दि. १०-८-२०२०

**आत्मषट्कम् –** आत्मा हा सर्व विश्वाचे अधिष्ठान असून अत्यंत शुद्ध व सत् चित् आनंद स्वरूप आहे. तो शिव म्हणजे सुखस्वरूप, मंगलमय, आनंदमय आहे. त्यालाच ब्रह्म म्हणतात आणि तेच मी आहे. दुसरा कोणी नाही. असा दृढ निश्चय या आत्मषट्काच्या मननाने साधकास करून घेता येईल. या स्तोत्राला 'निर्वाणषटक' असेही नाव आहे. 'निर्वाण' शब्दाचा अर्थ 'पूर्ण शांती' असाही होतो. या सहा श्लोकांच्या अर्थाचे मनन केल्यास निश्चित पूर्ण शांतीचा लाभ होईल.

ड) सोमवार, दि. १७-८-२०२०

**शिवमानसपूजा –** पूजेच्या खऱ्या आनंदाकरिता बाह्योपचारापेक्षा मानसिक उपचारच अंत:करण तन्मय करण्यास अधिक उपयुक्त होतात. शंकराचार्यांची ही 'शिवमानसपूजा' अर्थाकडे दृष्टी देऊन शांत चित्ताने रोज म्हटली तर अंत:करणाला देवपूजेचे समाधान निश्चित लाभेल.

### २) श्रीकृष्ण चरित्र

कालखण्ड - दि. १२ ते १९ ऑगस्ट २०२०

गुरुदेव अभ्यंकरांनी सलग आठ दिवस श्रीकृष्ण चरित्र कथन केले. श्रीकृष्ण जन्मापासून प्रारंभ करून सांगतेच्या दिवशी श्रीमद् भगवद्गीता तत्त्वज्ञानाची ओळख करून दिली. पूर्ण प्रवचनमाला सुमारे दोन लक्ष श्रोत्यांनी यूट्यूबवर श्रवण केली.

श्रीकृष्ण चरित्र, कृष्ण जन्मानंतर, बाललीला-कालियामर्दन, कंस वध, कालयवन वध व रुक्मिणी स्वयंवर, स्यमंतक मणी व भगवंताचे विवाह, द्रौपदी स्वयंवर, जरासंध वध, राजसूय यज्ञ, शिशुपाल वध व द्यूत प्रसंग, द्रौपदी वस्त्रहरण,

पांडव अज्ञातवास, कृष्ण शिष्टाई, महाभारत युद्ध या क्रमाने गुरुदेवांनी कथन केले.

पांडवांना युद्धाला श्रीकृष्णांनी प्रवृत्त केले ते सद्धर्माच्या स्थापनेसाठी आणि सज्जनांच्या परित्राणासाठी. कौरव लढले ते सत्ता, संपत्ती, भूमी व स्त्री यांच्यासाठी. कौरवांचा पराभव करून त्या दुर्जनांना मारल्याशिवाय धर्माची प्रतिष्ठापना अशक्य होती. कृष्णाने नेहमी समष्टीचा विचार केला. श्रीकृष्ण नीतीला तोड नाही. श्रीकृष्णाने ती कधीच स्वार्थासाठी वापरली नाही. धर्माचा अन्वयार्थ, संस्कृतीचा अर्थ समाजहितासाठी आणि धर्मस्थापनेसाठी उपयोजिला.

धर्माची ढाल हवी असेल तर तलवारीचे पाते नीतीचे पाहिजे. सत्याची, सत् चारित्र्याची मूठ पाहिजे. कृष्ण आणि पांडव असे धर्मनिष्ठ, सदाचारी होते. शास्त्र, परंपरा, ज्ञान, कर्म यांचा श्रीकृष्णाने अलौकिक समन्वय केला.

भगवद्गीतेचे स्वतंत्र तत्त्वज्ञान निर्माण करणारा श्रीकृष्ण पूर्णावतार होता. जीवनात लढलेली सर्व पंचावन्न युद्धे त्याने जिंकली. बद्रिकाश्रमात तपसाधना करून चोवीस वर्षे नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळले. तपसामर्थ्याने त्याने सुदर्शन चक्र प्राप्त केले.

अलौकिक, मधुर कृष्णचरित्र आणि गुरुदेवांचे तितकेच मधुर ओघवते कथन यांचा समसमा संयोगच या प्रवचनमालेत श्रोत्यांनी अनुभवला.

### ३) श्रीगणेश माहात्म्य

दि. २२ ऑगस्ट २०२० या दिवशी यूट्यूबवर गुरुदेव अभ्यंकरांचे गणेश चतुर्थीनिमित्त प्रवचन श्रवण करण्याचा सुयोग जुळून आला. प्रवचनाचा विषय अर्थातच ‘श्रीगणेश माहात्म्य’.

हिंदू धर्म व संस्कृतीत श्रीगणेशाचे स्थान एकमेवाद्वितीय आहे. प्रत्येक मंगल किंवा धार्मिक कार्यारंभी श्रीगणेशाला वंदन केले जाते. ॐ म्हणजे श्रीगणेशाचे नादब्रह्मस्वरूप होय. गणेशाचे रूप रूपकात्मक आहे.

गणेश संज्ञेला व्यापक अर्थ आहे. ‘ग’ हे अक्षर ज्ञानार्थवाचक तर ‘ण’ हे अक्षर निर्वाणवाचक आहे. वेदांमध्ये याला ‘ब्रह्मणस्पती’ म्हणून संबोधले आहे. उपनिषदे, स्मृतिग्रंथ, पुराणे, रामायण, संत वाङ्मय यातही श्रीगणेश आहेच. गणेशपुराणात ‘गणेशगीता’ आली आहे. भगवद्गीतेचे सारच या गीतेत आले आहे.

अथर्वशीर्ष या गणेशाच्या स्तोत्राला सर्वाधिक लोकप्रियता लाभली आहे. ‘एकदन्ताय विद्महे । वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।’ उपासनेसाठी हा गणेश गायत्री मंत्र आहे.

सुखकर्ता, दु:खहर्ता, विघ्नहर्ता, विद्यादाता, शांतिकर्ता, वैभवदाता, बुद्धिप्रदाता अवघा गणेशच आहे. तो चौदा विद्या, चौसष्ट कलांचा स्वामी आहे. आपली सर्व संस्कृती गणेशाने व्यापली आहे. अशा या सर्वव्यापक, सर्वसमावेशी, सर्वस्पर्शी गणेशाचे वर्णन गुरुदेवांच्या रसाळ वाणीतून ऐकणे हा एक आनंदयोगच आहे.

### ४) श्रीगणपती अथर्वशीर्ष

दि. २४ ऑक्टोबर ते १ सप्टेंबर २०२०

गणेशोत्सवाच्या मंगल आणि प्रसन्न काळात आदित्य प्रतिष्ठानने यूट्यूबवर आठ दिवसांची गणपती अथर्वशीर्षावरची प्रवचनमाला श्रोत्यांना उपलब्ध करून दिली. सर्वात्मक गणेशाचे विश्वात्मक दर्शन गुरुदेवांनी विशद केलेल्या अथर्वशीर्षाच्या प्रत्येक शब्दाच्या प्रदीर्घ विवेचनाने श्रोत्यांना घडले. सार्थ स्तोत्र पठणाचा आनंद आता मिळेल असे

मत श्रोत्यांनी व्यक्त केले. या माध्यमातून अधिक श्रोत्यांपर्यंत हे ज्ञान पोहोचवता आल्याचे समाधान प्रतिष्ठानला लाभले. श्रोत्यांनाही कर्ता-धर्ता-हर्ता गणेशाचे साद्यंत रूप ऐकायला मिळाले. गणक ऋषींची प्रतिज्ञा, विघ्नहर्ता गणेश, गणेशाचे अध्यात्मरूप, अनंत रूपात नटलेला गणेश, गणेश गायत्री, गणेश विद्या यावरील ज्ञानात्मक विवेचनाने गणेशोत्सवाच्या काळात ज्ञान यज्ञच संपन्न झाला जणू!

### ५) शिक्षक दिन (५ सप्टेंबर)

शिक्षक दिनानिमित्त गुरुदेव नेहमी विद्यार्थी, शिक्षकांना मार्गदर्शन करतात. पण या वर्षी यूट्यूबवरून प्रवचन प्रक्षेपित झाल्याने सर्वांनाच लाभ घेता आला.

गुरुदेवांनी सांगितलेली शिक्षक-विद्यार्थी लक्षणे प्रत्येकानेच लक्षात ठेवण्यासारखी कारण व्यक्तीला चांगलं शिकता आलं पाहिजे आणि शिकवताही आलं पाहिजे. अशा मार्गदर्शनाने समाज घडतो निश्चित.

मा. चिंतामणराव देशमुखांची गुरुंवरील श्रद्धा आणि गुरुदेवांच्या विद्यार्थ्यांची गुरुदेवांवरील श्रद्धा याचे वर्णन डोळे ओलावून गेले.

शिक्षण परंपरेचा आपल्या संस्कृतीतील गौरवच प्रतिष्ठानच्या वैश्विक संतभारतीत जपला जाणार आणि वर्धिष्णु होणार याचा विश्वास श्रोत्यांना मिळाला.

गुरुदेवांचे हे प्रवचन एकाच वेळी अंतर्मुख आणि प्रसन्न करणारे आहे.

### ६) श्रीसूक्त प्रवचने

दि. २१ ऑक्टोबर २०२०

नवरात्राच्या महन्मंगल काळात श्रोत्यांना गुरुदेवांच्या श्रीसूक्तावरील अत्यंत ज्ञानगर्भ प्रवचनांचा लाभ प्रतिष्ठानने यू ट्यूबच्या माध्यमातून करून दिला.

श्रीसूक्त हे केवळ पारमार्थिक नसून, वैयक्तिक उत्कर्षासाठी नसून धर्माधिष्ठित अर्थ मिळवून राष्ट्राची उन्नती कशी करायची हे सांगणारे हे सूक्त आहे. असा महत्त्वपूर्ण विचार गुरुदेवांनी या प्रवचनांमधून दिला.

गुरुदेवांनी या सूक्तातील प्रत्येक पदाचा अर्थ उलगडून दाखविल्यामुळे श्रोत्यांपुढे श्री, महालक्ष्मी, महाकाली, महासरस्वती, अनपगामिनी, दुराधर्षा अशा रूपातील आदिशक्तीचे रूप उभे राहिले. तिरोभाव, उत्पत्ती, स्थिती, लय, अनुग्रह अशा रूपातील देवीची पंचविध कार्ये कळली आणि आत्मज्ञान, ऐश्वर्य, आत्मसुख, आरोग्य, धन, धान्य, निष्कलंक कीर्ती ही लक्षणे कळून लक्ष्मीच्या व्यापक रूपाची कल्पना आली. या प्रवचनांनी श्रोत्यांना आत्मिक समाधान लाभले.

### ७) रामायणातील दन्तकथा

रामायण हा आपला देदीप्यमान इतिहास आहे आणि त्याचा मूल स्त्रोत म्हणजे वाल्मीकि रामायण. महर्षी वाल्मीकींनी जे पाहिले ते तसे काव्यबद्ध केले. परंतु प्रदीर्घ कालखण्डात यामध्ये अनेक दन्तकथा रचल्या गेल्या. त्या सर्व काय आहेत याविषयी अत्यंत रोचक व रंजक इतिहास गुरुदेवांनी आत्तापर्यंत छोट्या छोट्या ९ प्रवचनातून यूट्यूबवर उलगडून सांगितला आहे. तो आपण अवश्य ऐकावा. म्हणजे मूळ इतिहास काय आहे हे कळेल. वाल्या कोळी, रामायण कालखण्ड, अहल्या, तुलसी रामायण, सीता-स्वयंवर, श्रीरामांचा वनवास, शूर्पणखा, लक्ष्मण रेषा असे अनेक महत्त्वाचे विषय यामध्ये आले आहेत.

* * *

# बदरी



भारताचे उत्तर दिशेचे पवित्र धाम

# १. बदरीनाथ (बदरी विशाल)

## (उत्तरेचे धाम)



उत्तरांचल म्हणजे धर्मप्रदेश आहे. या राज्याला देवभूमी असेच म्हणतात. उत्तरांचलाचा ९० टक्के भूप्रदेश पर्वतीय तर ७० टक्के जंगलाने व गर्द वनराईने व्यापलेला आहे. नंदादेवी, कामेट, माणा, खैखंबा, त्रिशूल, इनागिरी, पंचचूली, चंगबंब, नंदाकोट, मगथूनी, गंगोत्री, शिवलिंग, नीलकण्ठ, कीर्तिस्तंभ, बन्दरपूछ, नन्दाघूण्टी, स्वर्गरोहिणी, हनुमान इत्यादी उत्तुंग हिमशिखरे याच राज्यात आहेत. गंगोत्री-यमुनोत्री-केदारनाथ-बदरीनाथ या हिमालयातील चार धामांमुळे उत्तरांचलाची भूमी पावन झाली आहे. भारतातील १४ प्रयागक्षेत्रांपैकी केवळ या एकाच राज्यात १३ प्रयागक्षेत्रे आहेत! अल्मोडा, डेहराडून, नैनीताल, मसूरी, राणीखेत इत्यादी पराकोटीची निसर्गरम्य स्थळे याच राज्यात आहेत. 'भारताचे स्वित्झर्लंड' कौसानी याच राज्यात आहे. विश्वविख्यात कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान येथेच आहे. येथील पंचकेदारांचे दर्शन घेताना भक्त अनन्य भक्तीने शरणागत होतो. हरिद्वार-हृषिकेश ही दोन पावन तीर्थे म्हणजे तपस्व्यांसाठी मोक्षधामेच आहेत. शिखांचे पवित्रस्थान हेमकुंडसाहिब याच राज्यात आहे.

अनेक तीर्थक्षेत्रांनी व निसर्गरम्य स्थानांनी उत्तरांचलाची माती-माणसे धन्य झाली आहेत. हिमालयाच्या सान्निध्यामुळे या राज्याला हिमाचल प्रदेशाप्रमाणेच विशेष महत्त्व आहे. गंगा-यमुना या दोन्ही पवित्र नद्यांचा उगम याच राज्यात आहे. संपूर्ण उत्तरांचलाला हिमालयाची दैवी आणि आध्यात्मिक पार्श्वभूमी आहे.

उंच उंच हिमाच्छादित पर्वत शिखरे, घनदाट जंगल, नद्यांची खोरी, कलकल करत वहात जाणाऱ्या नद्या, झरे, फुलांनी बहरलेल्या पुष्पघाटी या सर्वांमुळे उत्तरांचल राज्याला एक आगळे-वेगळे सौंदर्य आणि पावित्र्य लाभले आहे.

**भारताच्या चार आणि हिमालयातील चार धामांपैकी एकमेव प्रसिद्ध पुण्यक्षेत्र म्हणजे बदरीनाथ.**

हे क्षेत्र गोपेश्वर जिल्ह्यात येते. हा जिल्हा राज्याच्या उत्तर सीमेवर आहे. उत्तरेला हिमालय पर्वताचा भाग आणि चीनचा भूभाग आहे. पश्चिमेला रुद्रप्रयाग आणि पूर्वेला पिठोरागढचा भाग आहे. दक्षिणेला पौडी गढवाल, अल्मोडा आणि बागेश्वर

जिल्ह्यांचा काही भाग आहे. चमोली हे जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण आहे. चमोलीपासून ५४ कि. मी. वरील हे तीर्थक्षेत्र आहे.

**पंचकेदार –** बदरीनाथ धाममधील प्रमुख स्थलांमध्ये 'पंचकेदार' महत्त्वाची क्षेत्रे आहेत. कल्पेश्वर (हेलगपासून ९ कि. मी.), तुंगनाथ (चोपतापासून ५ कि.मी.), मध्यमहेश्वर (गुप्तकाशीपासून ३० कि.मी.), रुद्रनाथ (मंडल चट्टीपासून २८ कि. मी.), श्रीकेदारनाथ (सोनप्रयागपासून १९ कि.मी.) या जिल्ह्यात ही पाच क्षेत्रे क्रमाने आली आहेत.

***कसे जाल* –** बदरीनाथ हे क्षेत्र हृषीकेशपासून २९७ कि. मी., हरिद्वारपासून ३२१ कि. मी., जोशी मठापासून ४२ कि. मी., डेहराडून पासून ३४३ कि. मी. आणि चमोलीपासून ५४ कि. मी. आहे. याला बदरीधाम किंवा बदरीविशाल असेही म्हणतात. हे स्थान समुद्रसपाटीपासून १०२४४ फूट (३१२२ मी.) उंच आहे. जोशीमठ, विष्णुप्रयाग, बलदौडा चट्टी, पांडुकेश्वर, शेषधारा, हनुमान चट्टी, कांचनगंगा, देवदेखनी असे मुक्काम करीत व त्या त्या ठिकाणची स्नाने आणि दर्शने करीत बदरीनाथाला जायचे असते. देवदेखनीहून बदरीनाथाच्या मंदिराचे दर्शन होते; म्हणूनच त्याला ते नाव मिळाले आहे.

**स्थानाचे प्राचीन उल्लेख –**

बदरीनाथाचे उल्लेख बहुतेक सर्व पौराणिक वाङ्‌मयात सर्वत्र सापडतात.

कूर्मपुराण, देवी भागवत पुराण, पद्मपुराण, ब्रह्मपुराण, ब्रह्मवैवर्त पुराण, भागवत पुराण, वराह पुराण, वामन पुराण या सर्व पुराणात बदरी क्षेत्राचे उल्लेख आहेत.

***स्कन्द*** पुराणाच्या केदारखण्डात बदरीचे विशेष माहात्म्य आले असून त्यात बदरी क्षेत्र सप्त पुऱ्यांपेक्षा थोर म्हणून उल्लेखिले आहे. (स्क. पु. केदार. ५७.३४-३५)

'न काशी न तथा काञ्ची मथुरा न गया तथा ।
प्रयागश्च तथाऽयोद्धा नावन्ती कुरुजाङ्गलम् ।।
अन्यान्यपि च तीर्थानि यथासौ कलिनाशिनी।
बदरीतरुणा या वै मण्डिता पुण्यगास्थली ।।'

तात्पर्य, बदरीक्षेत्राचे अपूर्व वर्णन व थोरवी संपूर्ण पौराणिक वाङ्‌मयात आहे.

महाभारताच्या वनपर्वातील ९० व्या अध्यायात २४ ते ३३ अशा दहा श्लोकात बदरीचे सुंदर वर्णन आले आहे. त्याचा सारांश असा– भूत-भविष्य वर्तमान स्वरूप असलेल्या सर्वशक्तिमान, सर्वव्यापी, सनातन पुरुषोत्तम नारायणाची विशालापुरी बदरीवनात आहे. त्रिखण्डात ज्ञात असलेले हे स्थळ नरनारायणाचा आश्रम म्हणून विख्यात आहे. येथील गंगा दिव्य आहे. महातेजस्वी देवता, महर्षी प्रतिदिनी नारायणाला वंदन करतात. जेथे नारायण आहे तेथेच संपूर्ण जगत, तीर्थ व देवालय आहेत. बदरिकाश्रम पुण्यक्षेत्र व परब्रह्मस्वरूप आहे. तेच तीर्थ, तेच तपोवन, तेच संपूर्ण भूतमात्रांचे परमस्थान, परमेश्वर आहे. तिथे देवर्षी, सिद्ध आणि समस्त तपोधन महात्मा निवास करतात. सर्व पुण्यतीर्थे, वसु, सिद्ध, आदित्य, मरुद्गण, अश्विनीकुमार, देवदेवता याच तीर्थाचे सेवन करतात.



**यात्रा कशी करावी?**

बदरीनाथाची यात्रा कशी करावी, याचेही अनेक

तपशील आपल्याला पौराणिक वाङ्मयात अनेक ठिकाणी आढळतात. आपल्या निवासस्थानी यात्रेचा संकल्प सर्वप्रथम करावा. शक्यतो पायीच प्रवास करावा. 'चरणानां च साफल्यं कुर्याद् बदरिकागमात्।' जोशीमठाजवळ नृसिंहाला न चुकता नमस्कार करावा. वैखानस तीर्थात स्नान करून कुबेर शिळेजवळ दान द्यावे. ऋषिगंगेत स्नान करावे. कुमारधारेजवळ अर्घ्य द्यावे. जय-विजय यांना नमस्कार करून नंतरच मंदिरात प्रवेश करावा.

बदरी क्षेत्राचा विस्तार कण्वांच्या आश्रमापासून नंदगिरीपर्यंत म्हणजे सुमारे बारा योजने आहे असे परंपरा मानते.

आधुनिक कालखण्डात या अलौकिक तीर्थाची निर्मिती आदि शंकराचार्यांनी केली. या संदर्भातील एक श्लोक बदरी व जोशीमठ या दोन्ही स्थळी सानंद म्हटला जातो–

'गत्वैकादशवार्षिको बदरिकारण्यं सुपुण्याश्रमं।
पञ्चब्दान्नरकुण्ठया निजधिया भाष्याणि यः षोठश।
निर्माय प्रथमां चकार बदरीनारायणार्चां ततः ।
श्रीज्योतिर्मठभावबन्ध स गुरुः श्रीशङ्करो वन्द्यते।।'



***यात्रेतील सोयी –*** बदरीनाथाच्या पूर्वेला ४० कि. मी. वर भारताची सीमा संपून तिबेटची सीमा लागते. बदरीनाथाची यात्रा पूर्वी फार कष्टमय होती. यात्रेकरूंना पायी किंवा कंड्यात बसून जावे लागे. पण आता पक्की सडक झाली असून, यात्रेकरूंना हा संपूर्ण प्रवास बसमधून करता येतो.

या क्षेत्रात कालीकंबलीवाल्याच्या अनेक धर्मशाळा आहेत. तिथे यात्रेकरूंना पांघरण्यासाठी कांबळी मिळू शकतात. गरीब यात्रेकरूंच्या भोजनासाठी तेथे सदावर्तही आहे. या क्षेत्रात हिवाळ्यामध्ये दहा ते पंधरा फूट उंचीचे बर्फ पडते. त्यामुळे मार्गशीर्ष ते वैशाख या काळात तेथील देऊळ बंद करून नारायणाची उत्सवमूर्ती खाली जोशीमठात आणतात व तेथे तिची पूजाअर्चा चालू ठेवतात. वैशाखात बर्फ वितळून गेल्यावर उत्सवमूर्ती परत बदरीनाथाला नेतात. त्या दिवसापासून बदरीनाथाची यात्रा सुरू होते.

हृषीकेशपासून अनेक यात्रेकरू पुढे गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ, बदरीनाथ या हिमालयातील यात्रास्थळी जातात.

हृषीकेशपासून जोशीमठापर्यंत मोटर व बससाठी रस्ता आहे. ज्यांना केवळ बदरीनाथला जायचे असते ते यात्रेकरू जोशी मठापर्यंत जातात. केदारनाथला जाणारे यात्रेकरू रुद्रप्रयाग येथे उतरून जातात.

***बदरीनाथ हे नाव कसे पडले –*** महाभारत, नारद व ब्रह्मवैवर्त पुराणातील काही महत्त्वाचे उल्लेख आहेत. त्यावरून या परिसरात बदरीवन होते हे उघड आहे. याशिवाय महाभारतात आणखी एक महत्त्वाचा उल्लेख वनपर्वाच्या १४५ व्या अध्यायात आहे. याच बदरीवनात पाण्डवांनी नरनारायणाचे दर्शन केले होते. (श्लोक २६). श्लोक २७ ते ५३ यात बदरीकाश्रमाचे, बदरीवनाचे उत्कट वर्णन आहे. प्रयाग तीर्थात ज्याप्रमाणे अक्षय वटवृक्ष त्याप्रमाणे या तीर्थात अक्षय बदरी अशी परंपरा आहे. बदरीच्या, बोरीच्या इथे बागा असल्यामुळे बदरीवन व तेथील स्वामी तो बदरीनाथ झाला.

हे क्षेत्र अलकनंदा नावाच्या नदीच्या तीरावर वसले आहे. पण तिथे अलकनंदेत स्नान करणे अत्यंत कठीण असते. म्हणून यात्रेकरू तिचे दर्शन



घेऊन तप्तकुंडात स्नान करतात. स्नान करून व पूजासाहित्य घेऊन मग ते बदरीनाथाच्या दर्शनाला जातात. उत्तरांचलमधील चार धाम यात्रेत बदरीनाथ सर्वाधिक पुण्यदायक समजतात.

***कथा*** – सांप्रत बदरीनाथ हे क्षेत्र वैष्णव असले, तरी त्यापूर्वी ते शैव स्थान होते, असे पुढील कथेवरून ध्यानात येते–

शिवाने ब्रह्मदेवाच्या विष्णुनिंदा या अपराधाबद्दल त्याचे शिरच्छेदन केले; पण ते शिर खाली न पडता शिवाच्या हाताला चिकटून बसले. त्यातून मुक्त होण्यासाठी शिव बदरी विशाल या क्षेत्राला आला. तेथे अलकनंदेच्या तीरी ते शिर शिवाच्या हातापासून गळून पडले. त्यामुळे ब्रह्महत्येचे पाप अंशतः दूर झाले. पण ते पूर्ण नष्ट होण्यासाठी शिवाने मग तेथेच वास्तव्य केले.

यापुढची कथा गढवाली लोकगीतांत मिळते, ती अशी–

शिव बदरी वनाच्या निर्जन एकांतात पार्वतीसह वास्तव्य करीत असता ऋषिगंगेच्या दक्षिण तीरावर पार्वतीला एक नवजात शिशू रडत असलेला दिसला. ते नारायणाचे बालरूप होते; पण पार्वतीला ते कळले नाही. तिने शिवाच्या विरोधाला न जुमानता त्या बालकाला उचलले आणि ती आश्रमात आली. तेथील गुहेत तिने त्याला स्नान घालून झोपविले. नंतर शिव-पार्वती तप्तकुंडावर स्नान करण्यासाठी निघून गेली. परत येतात तो गुहेचे द्वार आतून बंद झालेले. पार्वतीने बरेच प्रयत्न केले; पण तरीही ते उघडले नाही. त्यावर शिव म्हणाला 'पार्वती, मी तुला सांगितले होते, की या बालकाच्या फंदात तू पडू नकोस; पण तू ऐकले नाहीस.'

बिचारी पार्वती खाली मान घालून उभी राहिली, एवढ्यात गुहेतून गंभीर वाणी उमटली. 'शिवमहाराज, तुमच्या इथल्या वास्तव्याचा उद्देश पुरा झाला आहे. तुम्ही दोघे आता केदारक्षेत्री जाऊन निवास करा. माझे भक्त प्रथम तुमचे दर्शन करतील आणि मग माझ्या दर्शनाला येतील.'

**बदरीनाथ मंदिर** – अलकनंदेच्या उजव्या तीरावर गावाच्या मध्यभागी बदरीनाथाचे भव्य मंदिर आहे. रस्त्यापासून ते दीड-दोन पुरुष उंचीवर असून, तेथे जाण्यासाठी प्रशस्त पायऱ्या आहेत. त्याच्यापुढे महाद्वार लागते. त्याच्या आतल्या अंगास दोन्ही अंगी देवड्या आहेत. त्यांच्या खाली तळघरात देवाचे कोठार आहे. माडीवरची जागा धर्मशाळेसारखी मुक्तद्वार आहे. तेथून पुढे थोडी मोकळी जागा सोडून बदरीनाथाचे मंदिर आहे.

या मंदिराचे मूळ स्वरूप कसे होते, ते आज सांगता येणे कठीण आहे. तथापि पांडुकेश्वर येथील ताम्रपत्र, कालीमठात सापडलेला शिलालेख, गोपेश्वर येथील त्रिशूलाभिलेख, नाला (गुप्तकाशी) मधील शिलालेख आणि लाखामंडपातील शिलालेख यावरून उत्तराखण्डातील हे तीर्थक्षेत्र अत्यंत प्राचीन, सुसंस्कृत व थोर धर्मस्थान होते, ही गोष्ट निर्विवाद आहे. आजचे मंदिर फार प्राचीन वाटत नाही. आदि शंकराचार्यांनी निर्मिलेले मूळ मंदिर निश्चितच वेगळे असले पाहिजे. याची उंची ५० फूट आहे. मंदिराचे तीन भाग आहेत– सिंहद्वार, सभामंडप व गर्भगृह. हे मंदिर बाहेरून १७.५' x १५'

आणि आतून १३' x ८.१०' आहे. या मंदिराच्या सिंहद्वाराची निर्मिती श्रीनगरचा प्रख्यात शिल्पी लछमू मिस्त्री याने केली आहे. गढवाल टिहरीच्या राजवंशाचा या मंदिराशी घनिष्ठ संबंध होता. सहा महिने इथे अखंड नंदादीप तेवत राहील इतके तेल या राजवंशाकडून अनेक वस्त्रे व अलंकारासहित येत असे. वसंत पंचमीला या मंदिराचा मोठा उत्सव या राजवंशाकडून संपन्न होत असे. इ. स. १८०४ पर्यंत गढवाल राजवंशाचे असलेले हे नाते कमी झाले. इ. स. १९८० मध्ये बदरीनाथ मंदिराची स्वतंत्र समिती शासनानेच नेमली. त्यामुळे राजवंशाचा अधिकार पूर्णत: संपुष्टात आला.

पुढे सभामंडप व मागे गाभारा अशी त्याची रचना आहे. सभामंडप शंभर माणसे बसू शकतील असा असून त्याच्या मोठमोठ्या कमानीतून हवा-उजेड भरपूर आत येतो. सभामंडपावर डेरेदार उंच कळस आहे. गाभाऱ्यावर पॅगोडा पद्धतीचे दुछपरी शिखर आहे. हे शिखर सोन्याच्या पत्र्याने मढवलेले आहे. देवळाभोवती प्रदक्षिणेचा मार्ग आहे. आवारातच डाव्या व उजव्या हाताला सोपे व घरे आहेत. त्यात पाकशाळा, कचेऱ्या व रावळजीचे (मुख्य पुजारी) वास्तव्य स्थान आहे.

### बदरीनारायणाची मूर्ती –



गाभाऱ्यात कंबरभर उंचीच्या सिंहासनावर शाळिग्राम शिळेची नारायणाची मूर्ती आहे. बदरीनारायण म्हणतात तो हाच होय. मूर्ती पद्मासनावर ध्यानमुद्रेत विराजित आहे. ती चतुर्भुज असून, उंचीला २॥-३ फूट आहे. तिच्या चार हातांपैकी दोन हात जोडलेले असून, दोहोंत शंखचक्र आहेत. नारायणाला नेहमी सुवर्णाचा मुखवटा चढविलेला असतो. डोक्यावरचा मुकुटही सुवर्णाचा असून तो हिरेजडित आहे. नारायणाच्या डाव्या हाताला लक्ष्मी चवरी ढाळीत असून, तिच्या पलीकडे नरनारायणांच्या शंख-चक्र-पद्म-गदाधारी मूर्ती आहेत. उजव्या अंगाला कुबेर व गणपती आहेत. या मूर्तीच्या खालच्या पायरीवर उजव्या बाजूला गरुड, डाव्या बाजूला नारद व मध्ये उद्धव आहे. नारायणाच्या पलीकडे अक्षय्य नंदादीप आहे. उद्धवाजवळ चरणपादुका असून डावीकडे नरनारायणाची मूर्ती आहे. जवळ श्रीदेवी आणि भूदेवी आहे. विशेष म्हणजे हे मंदिर लाकडी असून प्रतिवर्षी मे महिन्यात याची रंगरंगोटी करतात.

नारायणाचे हे देऊळ आदि शंकराचार्यांनी इ. स. ९ व्या शतकात निर्मिले. नंतर गढवालच्या महाराजाने इ. स. च्या १३ व्या शतकाच्या अखेरीस बांधले व अहल्याबाई होळकर यांनी त्यावर सोन्याचा कळस चढविला, असे सांगतात.

येथील नारायणाची मूर्ती फार प्राचीन आहे, असे पुराणांवरून कळते. येथे नर-नारायणांनी उग्र तपश्चर्या केली. त्यामुळे अलकनंदेच्या उभय बाजूंच्या पर्वतांना नर-नारायण अशी नावे पडली. बदरीनाथाचे मंदिर त्यांपैकी नारायण पर्वताच्या छायेत आहे. कलियुग सुरू झाल्यावर नारायण हे स्थान सोडून गेला. जाताना त्याने ब्रह्मादी देवांना तिथे आपली मूर्ती स्थापन करायला सांगितले. मग देवांनी शाळिग्राम शिळेची एक मूर्ती बनवून

ती येथे स्थापली. पण ही मूर्ती अनेकदा स्थानभ्रष्ट झाल्याच्या कथा व आख्यायिका आहेत.

बौद्ध धर्माच्या उदयानंतर व तो धर्म तिबेटात प्रसार पावल्यानंतर तिबेटी लोकांनी या क्षेत्रावर आक्रमण केले आणि हे क्षेत्र नष्टभ्रष्ट करून येथील नारायणाची मूर्तीही नारदकुंडात टाकून दिली. पुढे शंकराचार्यांनी जेव्हा वैदिक धर्माची पुन:प्रतिष्ठा केली, तेव्हा त्यांनी बदरीक्षेत्रात एक मठ स्थापन केला आणि नारदकुंडातील नारायणमूर्ती वर काढून तिची पुनश्च तेथे स्थापना केली.

दुसरी कथा याहून वेगळी आहे. कोण्यातरी काळी बदरीनाथाला यात्रेकरूच येईनासे झाले. त्यामुळे पुजाऱ्याला उपवास पडू लागले. म्हणून त्याने नारायणमूर्ती तप्तकुंडात फेकून पांडुकेश्वराचा रस्ता धरला. कालांतराने घंटाकर्ण नामक एका कोण्या भक्ताच्या अंगात देवाचा संचार झाला आणि त्याने सांगितले की नारायणमूर्ती तप्तकुंडात आहे. मग रामानुजी संप्रदायाच्या एका आचार्याने ती मूर्ती तप्तकुंडातून काढून पुनश्च तिची मंदिरात प्रतिष्ठापना केली.

***नैवेद्य व पुजारी –*** येथे प्रतिदिवशी नारायणाच्या मूर्तीसाठी दोन-तीन मणांचा भात शिजतो. भाताबरोबरच आमटीही असते. तिसऱ्या प्रहरी या भाताचा देवाला नैवेद्य दाखवतात. त्याला राजभोग म्हणतात. या नैवेद्यानंतर तोच भात प्रसाद म्हणून यात्रेकरूंना विकतात. श्राद्धाकरता लागणारे पिंडही त्याच भाताचे तयार मिळतात. बदरीनाथाचा प्रसाद न स्वीकारणारा चांडालच होय आणि तो कधीही शुद्ध होऊ शकणार नाही असे म्हटले आहे.

शंकराचार्यांच्या काळापासून येथील पुजारी नंपूतिरी ब्राह्मण असतो. त्याला रावळ म्हणतात. परंपरेने त्यांच्याच वंशात पूजेचा व सबंध देवस्थानाचा कारभार रावळाच्या हातात असला, तरी त्यावर सरकारी देखरेख आहे. देवस्थानाचे वार्षिक उत्पन्न फार मोठे आहे. देवस्थानाच्या संपूर्ण मालकीची सुमारे २०० व अंशत: मालकीची १५० खेडी आहेत.

***दैनिक पूजा –*** मंदिर सकाळी सहा वाजता भक्तांसाठी दर्शनाला खुले होते. सकाळी ७ वाजल्यापासून ९ वाजेपर्यंत महाभिषेक असतो. हा अभिषेक श्रीरावलजीद्वारा होतो. सव्वा नऊ वाजता 'बालभोग' (खीर) अर्पण केली जाते. साडे नऊ वाजता श्रीमद् भागवतपाठ तसेच गीतापाठ सुरू होतो. दुपारी बारा वाजता महाभोग असतो. महाभोगानंतर माध्यान्हकाळी म्हणजे साडेतीन वाजेपर्यंत मंदिर बंद असते. ३.३० ते ४.३० मंदिरात एकांत सेवा असते आणि ४.३० वाजता पुन्हा मंदिर सर्वांसाठी खुले होते. सायंकाळी ६ नंतर विशेष पूजेला सुरुवात होते. रात्री आठ वाजता भोग (प्रसाद) चढविला जातो. त्यानंतर शयन आरती होते व मग मंदिर बंद होते.

***बदरीनाथाच्या विशेष सेवा –***

अभिषेक, अटका साधारण, अटका विशेष, अष्टोत्तरी, उर्वश्री पूजा, कर्पूर आरती, गद्दी भेट, गीत-गोविंद, चांदी की आरती बडी, चांदी की आरती लघु, जन्माष्टमी उत्सव, नित्य नियम भोग, नित्य नियम भोग (इतर मंदिरांसह), पिंडप्रसाद, भगवद् गीता पाठ, भोग, माता मूर्ती उत्सव, विष्णु सहस्रनाम, विष्णु सहस्रनामावली, वेदपाठ, श्रीमद् भागवतपाठ, श्रीमद् भागवत पाठ (३ सप्ताह)

**स्थायी पूजा –** अष्टोत्तरी, कर्पूर किंवा मंगल आरती, नामावली, श्रीअभिषेक पूजा, श्रीभगवंताला बालभोग, श्री भगवंताला महाभोग, सहस्रनाम अर्चना, सुवर्ण आरती

*टीप :* पूजेच्या दानामध्ये कालानुसार बदल होतो.

**तीर्थे –** या क्षेत्रात पाच तीर्थे असून यात्रेकरूला त्यात स्नान करावे लागते. त्या तीर्थांची नावे

अशी– १) ऋषिगंगा, २) कूर्मधारा, ३) प्रल्हादधारा, ४) तप्तकुंड व ५) नारदकुंड.

तप्तकुंडातील पाणी नेहमी गरम असते. या कुंडाच्या खालच्या अंगाला गरुडशिला, नारदशिला, मार्कंडेयशिला, नरसिंहशिला व वाराहीशिला अशा पाच शिला आहेत.

***केदारनाथ ते बदरीनाथ मार्ग –*** केदारनाथहून परत येताना ज्या मार्गाने केदारनाथला जातो तसाच गौरीकुण्ड, रामपूर या क्रमाने उलट नालाचट्टीपर्यंत येऊन तिथून बदरीनाथकडे जावे लागते.

नालाचट्टीपासून अडीच कि. मी. वर मन्दाकिनी पार करून उषीमठ (उखीमठ)ला येतात. उषी मठापासून एक पायवाट मध्यमेश्वर (मदमहेश्वर)पर्यंत (ह्या स्थानाला द्वितीय केदार मानतात) जाते. हे स्थान २७ कि. मी. वर आहे. या मार्गामध्ये कालीमठ आणि मदमहेश्वर यांचे दर्शन होते. नंतर परत उषीमठ येथे यावे लागते. **हिवाळ्यात केदारक्षेत्र हिमाच्छादित होते तेव्हा केदारनाथाची चलमूर्ती या ठिकाणी आणतात. पूर्ण हिवाळा येथे पूजाअर्चा करतात.** येथे मन्दिरामध्ये बदरीनाथ, तुङ्गनाथ, ओंकारेश्वर, केदारनाथ, उषा, अनिरुद्ध, मान्धाता, सत्ययुग-त्रेता- द्वापार युगातील मूर्ती आणि इतरही अनेक मूर्ती आहेत.

यानंतर गणेशचट्टी, बनियाकुंड, कालीमठ, कालशिला, राकेश्वरी, कोटिमाहेश्वरी (कोटमहेश्वर), तुङ्गनाथ, जंगलचट्टी, पांगरबासा, मण्डलचट्टी, गोपेश्वर, चमोली (लालसांगा), मठचट्टी, छिनका, सियासैन, हाटचट्टी, पीपलकोटी, गरुडगंगा, टंगणी, पाताळगंगा, गुलाबकोटी, कुम्हारचट्टी (हेलंग), खनेटी, झडकूला, जोशीमठ, विष्णूप्रयाग, बलदौडाचट्टी, घाटचट्टी, पाण्डुकेश्वर, हेमकुण्ड, शेषधारा, लामबगड, घोरसिल पूल, रडंग पूल, कांचनगंगा, देवदेखनी, अशा मार्गाने यात्रेकरू येतात. देवदेखनी येथून बदरीनाथ मंदिराचे दर्शन होते.

येथून १.६ कि.मी.वर बदरीनाथाचे मंदिर आहे. अलकनंदेच्या काठाकाठाने पुढे गेले की वसुधाराला जाण्यासाठी रस्ता असून १ दिवसात पुन्हा बदरीनाथला येता येते.

बदरीनाथाची यात्रा पूर्ण करून त्याच मार्गाने यात्रेकरू परत येतात. ज्यांना श्रीनगरहून (पौड गढवाल जिल्हा उत्तर टोक) कोटद्वारला जाऊन परतायचे असते त्यांचा मार्ग असा–

श्रीनगर-पौडी – ६ कि. मी., अध्वानी – १६ कि. मी.,

कलेथ – १४ कि. मी., बांघाट – ४.५ कि. मी.,

द्वारीखाल – ११ कि. मी., डाडामण्डी – १.६ कि. मी.,

दुगड्डा – ९ कि. मी., कोटद्वार – ९ कि. मी.

येथून ९ कि. मी. अंतरावर मालिनी नदीच्या काठी **कण्व मुनींचा आश्रम** आहे. दुष्यन्तपुत्र सम्राट भरताची ही जन्मभूमी आहे. येथून ५ कि. मी.वर **त्रिवेणी नदीच्या काठी महर्षी वसिष्ठ आणि गौतमऋषींचे तपस्या स्थान आहे.**

असे हे बदरीनाथाचे दुर्गम पण हिमालयातील अपूर्व स्थान आहे. बदरीनाथापासून जवळ अशी ब्रह्मकपाल, भविष्यबदरी, महामृत्युंजय, मातामूर्ती, मुचकुंद गुफा, रुद्रनाथ, लक्ष्मीवन, लोकपाल मंदिर, विष्णुप्रयाग, व्यासगुंफा, हनुमानचट्टी, स्वर्गारोहण शिखर, हेमकुंडसाहेब ही अवश्य दर्शन घ्यावे अशी तीर्थक्षेत्रे आहेत.

**बदरीनाथची काही प्रमुख वैशिष्ट्ये अशी आहेत–**

१) बदरीनाथ हे हिमालयातील अत्यंत दुर्गम असे तीर्थस्थान आहे. सर्वजण बदरीनाथ-केदारनाथ अशी एकत्र यात्रा करतात. हरिहर संगमच!

२) हे अत्यंत प्राचीन क्षेत्र आहे, कारण सर्व पुराणांमधे याचा उल्लेख आहे.

३) बर्फाच्छादित असल्यामुळे वर्षातील सहा महिनेच हे दर्शनासाठी खुले असते. तरीही १० ते १५ लाख यात्री प्रतिवर्षी दर्शन घेतात.

४) आदि शंकराचार्यांनी ३॥ फूट लांबीच्या शाळिग्रामापासून बनवलेली मूर्ती येथे स्थापित केली. ही मूर्ती स्वयंभू मानली जाते.

५) मंदिर उत्तरेकडे असले तरी पुजारी केरळमधील नम्बूद्री संप्रदायातील ब्राह्मण आहेत. हीच राष्ट्रीय एकात्मता.

६) ऋषीकेशपासून २९४ कि.मी. वर दुर्गम असलेल्या या स्थानाचा विकास करण्यासाठी मोदी सरकारकडून अनेक योजनांप्रमाणे काम चालू आहे.

७) अलकनंदा या अत्यंत पवित्र नदीच्या काठावर नदीकडे तोंड करून हे मंदिर विराजमान आहे.

८) गंगा नदीचे पृथ्वीवर आगमन झाले या प्रीत्यर्थ 'माता मूर्ती मेळा' हा येथील सर्वात महत्त्वपूर्ण उत्सव. हा आठ दिवस चालतो आणि या कालखण्डात देशभरातील कलाकार आपापल्या कलेचे प्रदर्शन करतात.

९) ऑक्टोबर-नोव्हेंबर मधे जेव्हा मंदिर बंद होते तेव्हा आतमधे ६ महिने पुरेल एवढे तूप घालून ज्योत प्रज्वलित केली जाते. सहा महिन्यांनी जेव्हा द्वार खुले होते तेव्हा या अखंड ज्योतीचे दर्शन घेण्यासाठी तीर्थयात्री मोठ्या संख्येने उपस्थित असतात.

१०) हजारो वर्षे संपूर्ण भारतातील लाखो यात्री श्रद्धेने दर्शनाला जातात हेच हिंदू धर्माचे वैशिष्ट्य.

* * *


## ।। श्रीगणपति अथर्वशीर्ष ।।





गुरुदेव

**शंकर अभ्यंकर**

लिखित

या लोकप्रिय ग्रंथाच्या आठव्या आवृत्तीचे प्रकाशन दि. २८ जानेवारी २०२० या गणेशजयंतीच्या सुमुहूर्तावर.

वाचकांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर

आठवी आवृत्ती

ग्रंथाची एकूण पृष्ठसंख्या
४१६+१६ = ४३२
(डबल क्राऊन)

देणगी मूल्य रु. ५००/-

विशेष सवलत मूल्य रु. २९९/- मात्र

# जगन्नाथपुरी



भारताचे पूर्व दिशेचे पवित्र धाम

# २. जगन्नाथ मंदिर (पुरी)
## (पूर्वेचे धाम)



**भारतातील पवित्रतम चार धामांपैकी पूर्वेचे भव्यदिव्य तीर्थक्षेत्र!**

ओडिशामधील पुरी हा जिल्हा सागरकिनाऱ्यावर आहे. याच्या ईशान्येला जगतसिंगपूर, उत्तर-वायव्य-पश्चिमेला खुर्दा व उरलेल्या सर्व बाजूंनी बंगालचा उपसागर आहे. भुवनेश्वर ते पुरी हा केवळ ५९ कि. मी. चा २०३ क्रमांकाचा रा.म.मा. या जिल्ह्यात आहे. **लिंगराज मंदिर व कोणार्क ह्या दोन अलौकिक मंदिरांव्यतिरिक्त चार धामांपैकी एक म्हणून पुरीचे स्थान थोर आहे.**

ओडिशा व जगन्नाथ याविषयी गोपालबंधूदास या कवीने म्हटले आहे–

'भारत सरसे उत्कल कमल
ता मध्ये केसर पुण्य नीलाचल ।'

अर्थात 'उत्कल (ओरिसा) म्हणजे भारतवर्षाचे सरोवर असून त्यामधील जगन्नाथ म्हणजे हृदयरूप कमळ आहे.'

जगन्नाथ मंदिरातील बलराम-सुभद्रा-जगन्नाथ (अर्थात श्रीकृष्ण) हे काष्ठशिल्प 'पद अंगुली नाइ हात । दारुब्रह्म जगन्नाथ ॥' असे आश्चर्यकारक आहे. अर्जुनपत्नी व अभिमन्यूमाता सुभद्रेचे हे भारतातील एकमेव मंदिर असावे.

ओडिशाची राजधानी भुवनेश्वरापासून ३२ कि. मी. वर समुद्रतीरी वसलेले हे एक प्राचीन तीर्थक्षेत्र असून याला श्रीक्षेत्र, पुरुषोत्तम क्षेत्र अशी अन्यही नावे आहेत. ओडिशा राज्यातील पुरी जिल्ह्यातील दक्षिणेच्या टोकाला हे अतिशय प्रसिद्ध आणि भव्यदिव्य असे तीर्थक्षेत्र आहे. हे मंदिर श्रीकृष्णाला समर्पित आहे. जगन्नाथ शब्दाचा अर्थ जगताचा स्वामी असा होतो. त्यांची नगरी ती जगन्नाथपुरी होय.

**सांस्कृतिक इतिहास –** बदरीनाथ हे सत्ययुगातील धाम, रामेश्वर हे त्रेतायुगातील, द्वारिका हे द्वापार युगातील धाम, तर कलियुगातील पावनकरी धाम म्हणजे पुरी असे मानले जाते. ओडिशात विष्णूच्या चार आयुधांची क्षेत्रे आहेत, त्यांपैकी हे

शंखक्षेत्र होय. याचा आकारही शंखासारखाच आहे. या शंखाकाराच्या पश्चिम भागात वृषभध्वज, पूर्वभागात नीलकंठ, मध्यभागात कपालमोचन आणि अर्द्धासनीदेवी आहे. येथे आठ देवीपीठे आहेत. जगन्नाथ मंदिरात मंगलादेवी, पश्चिमेकडे विमलादेवी, शंखाकाराच्या पृष्ठभागात सर्वमंगलादेवी, पूर्वेकडे मरीची, पश्चिमेकडे चंडिका, उत्तरेकडे अर्द्धासनी आणि लम्बा, दक्षिणेकडे कालरात्री आहे. अशाच प्रकारे वटेश्वर, कपालमोचन, क्षेत्रपाल, यमेश्वर, मार्कंडेयेश्वर, ईशान, बिल्वेश आणि नीलकंठ - अशा आठ रूपात शंकराचेही येथे वास्तव्य आहे.

**पुरी हे शक्तिपीठही मानले जाते.** येथे सतीची नाभी गळून पडली होती. शाक्त पंथाचे लोक त्याला उड्डीयान पीठ म्हणतात. आदि शंकराचार्यांनी स्थापलेल्या चार धर्मपीठांपैकी एक पीठ जगन्नाथ पुरीत आहे. या पीठाला 'गोवर्धन मठ' म्हणतात. प. पू. स्वामी निश्चलानंद सरस्वती हे गोवर्धन मठाचे विद्यमान शंकराचार्य.

पूर्वी या क्षेत्री नीलाचल नावाचा पर्वत होता आणि पर्वतावर नीलमाधव भगवंताची मूर्ती होती. त्याची उपासना प्रत्यक्ष देवताही करत असत. तो पर्वत भूमीत लुप्त झाला आणि देवांनी ती मूर्ती स्वर्गात नेली. पण आजही भगवान नीलमाधवाची आठवण म्हणून या क्षेत्राला नीलाचल म्हणतात. जगन्नाथ मंदिराच्या शिखरावर असलेल्या चक्राला 'नीलच्छत्र' म्हटले जाते. नीलच्छत्राचे दर्शन जिथून-जिथून होते, तो सर्व भाग म्हणजे जगन्नाथपुरीचे क्षेत्र समजले जाते.

या पुण्यक्षेत्राचा उल्लेख वाल्मीकि रामायणात आहे– 'जगन्नाथ ही देवता इक्ष्वाकु कुलदैवत होते.' स्वर्गगमन करताना श्रीराम बिभीषणाला म्हणाला, 'लंकेत रहा. जोवर सूर्य, चंद्र आणि पृथ्वी आहेत, तोवर माझी कथा प्रचलित राहील. तोपर्यंत तुझे राज्यही या भूतलावर राहील. महाबली राक्षसराजा, आमच्या इक्ष्वाकु कुलाची देवता भगवान जगन्नाथ आहे. इन्द्रादी देवताही त्याची नित्य आराधना करतात. तूही त्याचे पूजन कर' (वा. रा. ७.१०८.२९, ३०-३१).

अर्थात हा जगन्नाथ म्हणजे पुरीचा देव की महाविष्णू यावर मात्र मतभेद आहेत. मात्र विशेष असे की, या मंदिराच्या प्राकारात 'बिभीषण बंदपण' नावाचा एक विधी आजही केला जातो. पुराणांनी जगन्नाथपुरीचा उल्लेख पुरुषोत्तम क्षेत्र असा केला आहे. या क्षेत्रात विमला (लक्ष्मी?) देवीचे पूजन होते, असा उल्लेख मत्स्यपुराणाने केला आहे. अग्नी, पद्म, ब्रह्म इत्यादी पुराणात या पुरुषोत्तम क्षेत्रात इन्द्रद्युम्न राजाने जगन्नाथाचे मंदिर उभारल्याचा उल्लेख आढळतो.

वायू पुराणानुसार पुरी हे पितृतीर्थ असून तेथे श्राद्ध केले जाते. नारद पुराणात जगन्नाथाचे दर्शन ज्येष्ठ शुद्ध द्वादशीला करावे, असे म्हटले आहे. ब्रह्म पुराणाने या तीर्थक्षेत्राला सर्वोत्तम म्हटले आहे.

काही संशोधकांच्या मते पुरीचे मंदिर व सर्व परिसर शैव, सौर व देवी संप्रदायांनी व्यापला होता. वैष्णवपूजा नंतर आली.

जगन्नाथाविषयी एक वेगळी आख्यायिका आहे. ती अशी– भारतीय युद्धानंतर जेव्हा श्रीकृष्णाने देहत्याग केला, तेव्हा त्याचा नाभिप्रदेश चितेत जळेना. मग तो भाग समुद्रात सोडण्यात आला. तो वाहत वाहत नीलाचलाजवळ किनाऱ्याला लागला. तिथे इंद्रद्युम्न राजा तप करीत होता. त्याला स्वप्नदृष्टांत झाला व देवाने आदेश दिला, की 'माझ्या देहाचा हा अवशेष तू लाकडी मूर्तीत बसवून त्या मूर्तीची स्थापना कर व तिची उपासना कर.' राजाने त्याप्रमाणे मूर्ती घडवून तिची स्थापना केली, तीच जगन्नाथाची मूर्ती होय. या मंदिरातील

वार्षिक रथयात्रा उत्सव प्रसिद्ध आहे. या मंदिरामध्ये जगन्नाथ, बलराम आणि भगिनी सुभद्रा यांच्या स्वतंत्र अशा तीन मूर्ती आहेत.

जगन्नाथ (पुरी) येथे चैतन्य महाप्रभू आल्यानंतर येथील वैष्णव संप्रदायाची महती वाढत गेली. चैतन्य महाप्रभूंप्रमाणेच अतिबड जगन्नाथदासांनीही आपल्या भावपूर्ण सेवेने जगन्नाथाची महती खूपच वाढविली. (अतिबड जगन्नाथदास, माहिती - भक्तिकोश खण्ड २, भारतीय संत पृ. १५४ ते १५६ अवश्य वाचावे)

असे म्हणतात की, एकदा काञ्चीचा राजा पुरी येथे रथोत्सवासाठी आला होता. त्यावेळी पुरीच्या पुरुषोत्तम नामक राजाला त्याने रथापुढे रस्ता झाडताना पाहिले. त्याला ते कसेतरीच वाटले आणि राजाची भेट न घेता तो काञ्चीला परतला. पुरुषोत्तम राजाला त्यामुळे राग आला. त्याने काञ्चीवर आक्रमण केले. पण पुरुषोत्तम राजाचा पराभव झाला. दुसऱ्या स्वारीत मात्र बलराम व जगन्नाथाच्या कृपाप्रसादामुळे राजाला प्रचंड विजय मिळाला. काञ्चीच्या राजाने पुरुषोत्तम राजाला उदंड धन दिले आणि आपली कन्या पद्मावतीही एका गणेश प्रतिमेसहित दिली. जगन्नाथाच्या मंदिरात ही मूर्ती आजही आहे. जगन्नाथ मंदिरात हा इतिहास कोरला आहे. इतिहासकारांच्या मते ही घटना इ. स. १४७६-७७ मध्ये घडली असावी. त्यावेळी शाल्व नरसिंह काञ्चीचा राजा होता. तेव्हापासून पुरीच्या गजपती राजांबरोबर बलराम-जगन्नाथ युद्धामध्ये सदैव उपस्थित असतात, अशी आख्यायिकाही तयार झाली. रामानंदांच्या शिष्यांनी या क्षेत्रात समतेचा ध्वज उंच उभारून धरला. चैतन्य महाप्रभू, अतिबड जगन्नाथदास यांचा उल्लेख वर आला आहेच. कबीरांचा मठही इथे आहे. राजा प्रतापरुद्रदेव (इ. स. १५-१६ वे शतक) चैतन्यांचा शिष्यच होता.

भारतातील चारधाम तीर्थक्षेत्रे एकात्मतेची प्रतीके आहेत. जगन्नाथपुरीचा गौरव व महिमा 'यावच्चंद्रदिवाकरौ' राहील असाच आहे.

***मंदिर* –** जगन्नाथपुरी या क्षेत्रात हे मंदिर आहे. या मंदिराबद्दलची माहिती असलेले दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. एक म्हणजे सत्स्वरूप दास गोस्वामींचा `A visit to Jagannath Puri' आणि चैतन्य महाप्रभूंचा महानिधी स्वामींनी पूर्ण केलेला 'जगन्नाथ पुरी' हा ग्रंथ!

**पुरी येथील जगन्नाथ मंदिर हे ओडिशातील श्रेष्ठ दर्जाचे मंदिर होय. ओडिशातील जाजपूर हे पार्वतीक्षेत्र, कोणार्क हे सूर्यक्षेत्र, भुवनेश्वर हरक्षेत्र, तर पुरी हे हरिक्षेत्र वा विष्णुक्षेत्र वा पुरुषोत्तम क्षेत्र म्हणून सुविख्यात आहे. भुवनेश्वर लिंगराज मंदिर, कोणार्कचे सूर्यमंदिर आणि पुरीचे जगन्नाथ मंदिर म्हणजे ओडिशाचे धार्मिक वैभव होय. त्यांनाच पूर्वेचा सुवर्ण त्रिकोण म्हणतात. पुरीच्या जगन्नाथ मंदिराला श्रीमंदिर किंवा 'बडा देवल' म्हणतात.** ऋग्वेदात पुढील ऋचा आली आहे,

'अदोयद्दारुप्लवते सिन्धोः पारे अपौरुषम् ।
तदारभस्व दुईणो तेनगच्छ परस्तरम् ॥'
(ऋ. १०.१५५.३)

ऋचेचा शब्दशः अर्थ असा आहे, 'हे दुर्दम्य स्तोत्यांनो, सागरकिनारीच्या अपौरुषेय काष्ठाच्या साह्याने तुम्ही पैलतीरी जा.'

या ऋचेमध्ये समुद्रतीरी तरंगणाऱ्या 'अपौरुषेय काष्ठा'चा (दारु अपूरषम्) निर्देश आढळतो. सायणाचार्यांच्या मते जगन्नाथपुरी येथील पुरुषोत्तममूर्तीच्या उपासनेने वैष्णवलोकप्राप्ती करून घेण्याचा निर्देश येथे अभिप्रेत आहे.

या ऋचेशी साधर्म्य दाखविणारे श्लोक स्कन्द पुराणात (वैष्णव खण्डांतर्गत उत्कलखण्ड वा

पुरुषोत्तमक्षेत्र माहात्म्यामध्ये) आले आहेत. (उत्कल म्हणजेच ओडिशा)

‘अहोतवायं खलु भाग्यराशिः,
येनाविरासीत् भुवि दारु मूर्तिः ।
यस्यात्युपास्तिम् श्रुतिराहमुक्ति-
प्रदामना मुंच विमोहितानाम् ।।
य एष प्लवते दारुः
सिन्धोः पारेह्यपौरुषम् ।
तमुपास्य दुराराध्यम्
मुक्तिं यान्ति सुदुर्लभाम् ।।’

याचा भावार्थ असा की जिथे भगवान लक्ष्मीपती विष्णू मानवलीलेप्रमाणे काष्ठमय विग्रह धारण करून विराजमान आहेत; ज्याच्या दर्शनानेच सर्व तीर्थांचे फळ आणि मोक्षप्राप्तीही होते; ते पुरुषोत्तमक्षेत्र परम पावन आहे.

महाभारताच्या कालखण्डात इथे मंदिर नव्हते. या भूमीला पवित्रवेदी असे म्हणत असत. महाराज इन्द्रद्युम्नाने एक छोटे मंदिर नीलागिरी वा नीलाचल पर्वतावर निर्माण केले. कलिंग, कोशल, उत्कल येथील राजांनी मंदिरासाठी विन्ध्य पर्वतातून पाषाण आणल्याचा उल्लेख ब्रह्मपुराणात आहे. मधल्या दीर्घ कालखण्डानंतर मगधाच्या नंदवंशीय महापदमनंद राजाने जगन्नाथाची मूर्ती मगधात नेली. सुमारे शंभर वर्षांच्या कालावधीनंतर कलिंगाधिपती खारवेल राजाने मगधावर विजय मिळवून जगन्नाथाला माघारी आणले. **इ. स. ८२४ मध्ये केसरी वंशीय महाराज ययाती केसरी याने जगन्नाथाचे सुंदर मंदिर उभारले.** या राजाला प्रजा दुसरा इन्द्रद्युम्न म्हणू लागला. तथापि सागरतीर व खारी हवा यामुळे ते मंदिर काळाच्या ओघात नाश पावले. त्यानंतर इ. स. ११ व्या शतकात ओरिसात गंग या राजवंशाचा उदय झाला. **इ. स. १२ व्या शतकात चोड (वा चोल) गंगदेव राजाने जगन्नाथाच्या भव्य मंदिराचा पाया घातला. इ. स. ११४९ मध्ये गंग वंशातील प्रसिद्ध राजा दुसरा अनंग भीमदेव गादीवर आला. त्याने जगन्नाथाचे भव्य-दिव्य मंदिर पूर्ण केले.** मंगराज राघव देवाला मिळालेल्या ताम्रपत्रावर याचा उल्लेख सापडतो–

‘पादौयस्य धरान्तरिक्षमखिलं
नाभिश्च मुर्वीदिशः ।
श्रोत्रे नेत्र युगं स्वइन्दुयुगलं
उद्भाषि च द्यौ रसौ ।
प्रासादम् पुरुषोत्तमस्य नृपति
र्कोनाम कर्तुम् क्षमः ।
तस्येत्यादि नृपैरुपक्षितमयं
चक्रैऽथ गंगेश्वरः ।।’

***मंदिर रचना –*** हे मंदिर ओडिशातील सर्व मंदिरात उंच मंदिर आहे. याची उंची ६५ मीटर आहे. सूर्य रथातून आकाशमार्ग आक्रमतो ही कल्पना शिल्पकारांनी इथे साकार केली आहे. ६५२’ X ६३०’ फूट अशा विशाल प्राकारात आणि वीस फूट उंचीच्या तटबंदीने संरक्षित असे जगन्नाथाचे पूर्वाभिमुख भव्य मंदिर आहे. या संपूर्ण संकुलात सुमारे १२० मंदिरे आहेत. जगन्नाथ मंदिराचे चार विभाग आहेत.

१) महाद्वार – पूर्वेकडील द्वारावर सिंहाच्या दोन भव्य आकृती असल्यामुळे त्याला सिंहद्वार म्हणतात. तेच महाद्वार होय. त्याच्यासमोर काळ्या पाषाणाचा एक स्तंभ उभा आहे. तो कोणार्कहून आणलेला आहे.

२) विमान (श्रीवत्सखण्डाशाल मंदिर) – गर्भगृहावरील विमानाची उंची २१३ फूट आहे. कळसावर नीलचक्र वा सुदर्शनचक्र आहे. त्याहीवर हिंदू धर्माचा, भागवत व वैष्णव संप्रदायांचा भगवा ध्वज सदैव फडकत असतो. शुभ्र, पांढऱ्या रंगात

झळकणारे विमान म्हणजे 'पांढरा पॅगोडा' म्हणूनही संबोधतात. विमान मंदिरातच चैतन्य महाप्रभूंची रत्नवेदी आहे.

३) मुखशाला (जगमोहन) – विमानाच्या पुढे ऐंशी चौरस फुटांची मुखशाला वा जगमोहन आहे. याचे दक्षिणद्वार मुक्तीमण्डपाकडे, उत्तरद्वार कोठीकडे आणि पूर्वद्वार (जय-विजयद्वार) नाट्यमंदिराकडे उघडते. साडे सात फूट उंचीच्या बैठकीवर जगमोहन आहे. मंदिराचा हा सभामंडप होय. जगमोहनाला लागूनच ६७ फूट चौरस आकाराचे नाट्यमंदिर (यालाच नृत्य मंदिर असेही म्हणतात) आहे. या मंदिराला दक्षिण, उत्तर, आग्नेय, नैर्ऋत्य दिशेला चार द्वारे आहेत. आग्नेय मार्ग स्वयंपाक घराकडे जातो. या मंदिरात भगवंताला बालभोग अर्पण करतात. इथेच देवदासींची नृत्ये, कथा-कीर्तने, जप-तप सर्व इथेच चालते. नाट्यमंदिरातूनच भोगमंडपाकडे जाणाऱ्या मार्गासमोर गरुडस्तंभ आहे.नाट्यमंदिराला लागून भोगमंडप आहे. इथल्या भिंतींवर सुंदर शिल्पे आहेत. दक्षिण, उत्तर व पूर्व दिशांना तीन प्रवेशद्वारे आहेत. इथे भाण्डभोग वा छत्रभोग अर्पण केला जातो.

४) प्रदक्षिणा – मंदिराच्या तटाभोवतीची बाह्य प्रदक्षिणा तर आतून केलेली अंतर्प्रदक्षिणा मानली जाते. मंदिराचे पूर्वद्वार सिंहद्वार, दक्षिणेचे अश्वद्वार, पश्चिमेचे वाघद्वार, तर उत्तरेचे हत्तीद्वार म्हणून ज्ञात आहेत. सिंहद्वार हे प्रमुख असून तेथून येणारा विस्तीर्ण मार्ग बडदाण्ड किंवा जगन्नाथ पथ म्हणून ओळखला जातो.

***गर्भगृह व मूर्ती –*** या मंदिरात जगन्नाथ (कृष्ण), बलराम व सुभद्रा यांच्या ओबडधोबड लाकडी मूर्ती आहेत. या मूर्तींपैकी जगन्नाथ आणि बलराम यांना हात आहेत, पण पाय नाहीत. सुभद्रेला हात नाहीत. सृष्टीच्या निर्मितीसाठी



परमात्म्याला हात वा पाय यांची आवश्यकता नसते, हा त्याचा पारमार्थिक आशय होय. या तिन्ही मूर्तींना फक्त डोळे, नाक, तोंड हे अवयव आहेत. या मूर्तींपैकी बलराम पांढऱ्या रंगाचा, सुभद्रा पिवळ्या रंगाची आणि जगन्नाथ काळ्या रंगाचा आहे. या तिन्ही मूर्ती रत्नाच्या सिंहासनावर सुप्रतिष्ठित केल्या आहेत. या मूर्तींना भक्त सकाळी ८.३० ते ९.३० या वेळात प्रदक्षिणा घालू शकतात.

'पद अंगुलि नाइ हात । दारुब्रह्म जगन्नाथ ॥'

असे त्याच्याबद्दल मागुणिदास या कवीने म्हटले आहे. या दारुब्रह्माचेच (ओंडक्याच्या स्वरूपात असलेल्या देवाचेच) इथे दर्शन घ्यायचे आणि त्याचीच पूजा-प्रार्थना करायची.

**क्षेत्रमाहात्म्य कथा –** पुरीच्या जगन्नाथाविषयीची कथा 'क्षेत्रमाहात्म्या'त दिली आहे. ती अशी–

प्राचीन काळी पुरीमध्ये इंद्रद्युम्न नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या नगरीत मोठमोठ्या इमारती होत्या; पण एखादे देवमंदिर मात्र नव्हते. राजाने नगरातली ती उणीव दूर करायचे ठरवले. थोड्याच काळात त्याने तिथे एक भव्य व कलापूर्ण मंदिर उभे केले. ते मंदिर पुरे होते न होते, तो एक प्रवासी तिथे आला व राजाला म्हणाला–

'राजा, मंदिर तर छान बांधलेस! अशा या कलापूर्ण मंदिरात बसायला योग्य असा एकच

देव आहे आणि तो म्हणजे नीलमाधव!'

राजाने विचारले, 'हा देव कुठे आहे?'

प्रवासी म्हणाला, 'तो नीलाचल पर्वतावर विश्वावसू नावाच्या एका शबरापाशी आहे. इंद्रनील मण्याची ती मूर्ती शबराने एका खोऱ्यात गुप्तपणे ठेवली असून तो नित्य तिथे जाऊन तिची पूजा करतो. राजा, तीच मूर्ती तू तुझ्या या मंदिरात स्थापण्यासाठी घेऊन ये.'

मग राजाने विद्यापती नावाच्या एका दूताला नीलमाधवाच्या शोधासाठी पाठवले. मोठ्या कष्टाने त्याने त्या मूर्तीचा शोध लावला. मग तो परत राजाकडे आला. राजाने त्याच्या हाताखाली एक सैन्यतुकडी देऊन त्याला ती मूर्ती आणायला पाठवले; पण विद्यापती पुनश्च तिथे जातो, तर ती मूर्ती तिथून अदृश्य झाली होती. त्यामुळे त्याला तिथून रिक्त हस्ताने परतावे लागले. राजाला या गोष्टीचे दुःख झाले. त्याच रात्री स्वप्नात येऊन नीलमाधवाने राजाला म्हटले–

'हे राजा, तुला अहंकार झाला होता. तो शबर माझा भक्त होता. त्याच्याकडून तू मला हिरावून आणणार होतास. पण तुझा गर्व मला आवडला नाही. तुला जर माझी खरीखुरी आवड असेल, तर तू शंभर अश्वमेध कर. म्हणजे मी तुझ्या राज्यात एका चंदनी ओंडक्याच्या रूपाने प्रकट होईन. त्यावर पद्म आणि चक्र ही चिह्ने दिसली, की तीच माझी मूर्ती असे तू समज.'

त्या आदेशाप्रमाणे इंद्रद्युम्न राजाने एकेक करून शंभर अश्वमेध पुरे केले (याचा उल्लेख महाभारतात आहे). त्यानंतर थोड्याच दिवसांत एक चंदनी ओंडका पुरीजवळच्या समुद्रकिनाऱ्याला लागला. राजाने त्यावरच्या पद्म-चक्र या खुणा पाहिल्या. त्याने तो ओंडका राजवाड्यात आणला. राजाला त्यातून एक सुंदर विष्णुमूर्ती घडवायची होती. पण कोणत्याही कलाकाराची रंधा-पटाशी त्याच्यावर चालेचना. राजा त्यामुळे चिंतेत पडला. एवढ्यात अनंत नावाचा एक म्हातारा मूर्तिकार तिथे आला. तो साक्षात विश्वकर्मा होता. तो राजाला म्हणाला,

'हे राजा, मला देवळाच्या गाभाऱ्यात एकवीस दिवसापर्यंत एकटा कोंडून ठेव. देवळाचे सर्व दरवाजे बंद कर. ही अट पाळलीस, तर मी या ओंडक्याची मूर्ती घडवीन. एकवीस दिवस पूर्ण झाल्यावर तू गाभाऱ्याचा दरवाजा उघड.'

राजाने ती अट मानली आणि त्या कारागिराला ओंडक्यासह गाभाऱ्यात कोंडून ठेवले. पण गुंदीचा राणीच्या मनात विकल्प उत्पन्न झाला. ती राजाला म्हणाली, 'हा कलाकार कदाचित चोरही असू शकेल. एवढ्या मोठ्या देवळात तो एकटा राहणार; कदाचित देवळाच्या नक्षीत जडलेली सोन्या-रुप्याची फुले काढून घेऊन तो पसारही होईल. तुम्ही एकदा तो काय करतो ते पाहाच!'

राजाने दोन आठवडे राणीच्या बोलण्याला दाद दिली नाही. पण तिच्या वारंवार टोचणीमुळे त्याच्याही मनात शंका उत्पन्न झाली आणि एक दिवस राजाने अचानक जाऊन गाभाऱ्याचे दार उघडले. पाहतो, तर हात-पाय नसलेला जगन्नाथाचा मुखवटा तिथे होता. त्याचे डोळे वटारलेले होते आणि मूर्तिकार मात्र अदृश्य झाला होता. मूर्तीचे ते डोळे पाहून राजा घाबरला. त्याने देवाची प्रार्थना केली. 'प्रभो, माझ्या चुकीबद्दल मला क्षमा कर.' त्यावर त्या मूर्तीच्या मुखातून शब्द उमटले,

'हे राजा, प्रथम अहंकार धरलास म्हणून तुझी इंद्रनील मण्याची मूर्ती तुला लाभली नाही. आता राणीच्या शंकेखोरपणाला बळी पडलास म्हणून मी असा अपूर्ण, अर्धवट अवस्थेत राहिलो. पण झाले ते झाले. तू आता याच स्वरूपात माझी मंदिरात प्रतिष्ठा कर. अशाही स्थितीत मी तुझ्या

भक्तिभावाला समाधान देईन.'

याच कथेचा दुसरा एक पर्याय आहे आणि त्यात समुद्राच्या तीरावरचा वटवृक्ष तोडून विश्वकर्म्याने त्याच्या तीन मूर्ती घडवल्या, असा उल्लेख स्कन्द पुराणात आहे.

वैष्णव लोक जगन्नाथपुरीला वैष्णव क्षेत्र मानतात व तिथल्या तीन मूर्तींना कृष्ण, बलराम आणि सुभद्रा असे समजतात. कृष्णसंगे कित्येक ठिकाणी बलराम असतो आणि स्त्री असायची ती राधा किंवा रुक्मिणी; पण **कृष्ण, बलराम व सुभद्रा हे त्रिकूट मात्र अपवादात्मकच होय. असे अन्यत्र कुठेही आढळत नाही.** असे हे एकमेव मंदिर भारतात आहे.

**दर्शन क्रम –** जगन्नाथ मंदिराच्या पूर्वेकडे सिंहद्वार, दक्षिणेकडे अश्वद्वार, पश्चिमेकडे व्याघ्रद्वार आणि उत्तरेकडे हस्तिद्वार आहे.

जय-विजयद्वारात जय-विजयच्या मूर्ती आहेत. त्यांचे दर्शन करून, त्यांची अनुमती घेऊनच मुख्य मंदिरात दर्शनासाठी जायचे असते.

सिंहद्वाराच्या समोर कोणार्कहून आणून स्थापन केलेला अरुणस्तंभ आहे. याला प्रदक्षिणा घालून सिंहद्वाराला प्रणाम केल्यावर, आत प्रवेश केल्यावर उजव्या बाजूला दारातच जगन्नाथाची मूर्ती सर्वांच्या दर्शनार्थ खुली आहे. परधर्मीयसुद्धा या मूर्तीचे दर्शन करू शकतात.

तिथून पुढे गेल्यावर एका छोट्या मंदिरात विश्वनाथलिंग आहे. कोणी एक ब्राह्मण काशीला जाऊ इच्छित होता, पण जगन्नाथाने त्याला स्वप्नात येऊन दर्शन दिले की मंदिरातील लिंगाच्या पूजेनेच त्याला विश्वनाथाची पूजा केल्याचे फळ प्राप्त होईल.

मंदिराच्या पुढे गेल्यावर एक वटवृक्ष आहे, त्याला कल्पवृक्ष म्हणतात. त्या वृक्षाखाली वटपत्रशायी बालमुकुंदाचे दर्शन घडते. या वटवृक्षाची परिक्रमा केली जाते. तिथून जवळच गणेशाचे मंदिर आहे. या गणेशाला सिद्धगणेश म्हटले जाते. जवळच सर्वमंगला देवीचे मंदिर आहे.

जगन्नाथ मंदिराच्या मुख्य द्वारासमोरच मुक्तिमंडप आहे. या स्थानाला ब्रह्मासन म्हणतात. यज्ञातील प्रधान आचार्य म्हणून ब्रह्मा येथे आला होता. या मुक्तिमंडपात स्थानिक विद्वान ब्राह्मण बसण्याचा परिपाठ आहे.

मुक्तिमंडपाच्या पाठीमागच्या बाजूला मुक्तनृसिंहाचे मंदिर आहे. मुक्तनृसिंह हा येथील क्षेत्रपाल आहे. या मंदिराच्या जवळच रोहिणीकुंड आहे. कुंडाच्या जवळच विमलादेवीचे मंदिर आहे. हे येथील शक्तिपीठ आहे.

येथून थोडे पुढे गेल्यावर लक्ष्मीचे मंदिर आहे. मंदिरात लक्ष्मीची मुख्य मूर्ती आहे. जवळच शंकराची आणि लक्ष्मी-नारायणाच्याही मूर्ती आहेत. या मंदिराच्या जगमोहनात (सभामंडपात) कथा, निरूपण, शास्त्रचर्चा होत असतात.

लक्ष्मी मंदिराजवळच सूर्यमंदिरही आहे. मंदिरात सूर्य, चंद्र आणि इंद्र यांच्या छोट्या-छोट्या मूर्ती आहेत. कोणार्क मंदिरापासून आणलेली सूर्याची प्रतिमा या मंदिरात एका गुप्त ठिकाणी ठेवली आहे.

सूर्यमंदिराजवळ पातालेश्वर महादेवाचे सुंदर मंदिर आहे. याचे माहात्म्य खूप आहे. येथे उत्तरामाणी देवीची मूर्ती आहे. येथून जवळच ईशानेश्वर मंदिर आहे. ईशानेश्वराला जगन्नाथाचा मामा म्हणून संबोधले जाते. या लिंगाच्या समोर जी नन्दीची मूर्ती आहे, त्या मूर्तीतून गंगेचा गुप्त प्रवाह निघतो. तिथे नखाने आघात केला तरी पाणी बाहेर येते.

येथून पुढे मुख्य मंदिराचे एक द्वार बाहेरच्या बाजूला जाण्यासाठी आहे. या द्वाराला वैकुंठद्वार

म्हणतात. वैकुंठद्वाराच्या जवळच वैकुंठेश्वर महादेवाचे मंदिर आहे. येथे एक बाग आहे. बारा वर्षांनी ज्या वेळेला जगन्नाथाची मूर्ती बदलली जाते, तेव्हा जुन्या मूर्तीला येथे समाधी अवस्था प्राप्त करून दिली जाते.

**जगन्नाथ रथयात्रा उत्सव –** प्रतिवर्षी आषाढ शुद्ध द्वितीयेला प्रारंभ होणारा हा उत्सव देशातील फार मोठा उत्सव असून लाखो भाविक दरवर्षी या उत्सवासाठी एकत्र येतात. जगन्नाथाचा रथ आपल्या हातांनी ओढण्यासाठी गर्दी करतात. या रथाच्या चाकाखाली चिरडून मेलेल्यांना मोक्ष मिळतो, अशा अंधश्रद्धेमुळे जुन्या काळी कित्येक भाविक यात्रेकरू रथापुढे पडून प्राणत्यागही करीत असत. आता ही प्रथा बंद झाली आहे. या पावन उत्सवाला रथयात्रा, घोषयात्रा, गुंदीचा यात्रा, नवदिनात्मिका, पतितपावन महोत्सव अशीही नावे आहेत.

या उत्सवात जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा यांच्या मूर्ती मंदिरातून बाहेर काढल्या जातात. या मूर्ती इतक्या जड व प्रचंड आहेत की, त्यांना वाहून नेण्यासाठी सहा सशक्त पुजारी लागतात. या तिन्ही देवतांना नंतर तीन उत्तम कोरीव व सजवलेल्या रथात स्थानापन्न केले जाते. या रथाला दोर लावून हजारो भक्त ओढतात. आषाढ शुक्ल प्रतिपदेला (जून-जुलै महिन्यात) या रथयात्रेला प्रारंभ होतो. सिंहद्वारापासून ही रथयात्रा सुरू करतात. जगन्नाथ मंदिरापासून गुंदीचा मंदिरापर्यंत ग्रँट रोडवरून ही रथयात्रा ३ कि. मी. संपन्न होते. या मूर्ती गुंदीचा मंदिरात नऊ दिवस ठेवल्या जातात आणि दशमीला परत आणल्या जातात. याला 'बाहुदा यात्रा' अर्थात् परतीची यात्रा असे म्हणतात. या यात्रेच्या वेळेस हिंदू नसलेल्यांनाही दर्शन घेता येते. एकादशीच्या दिवशी तिन्ही मूर्तींना सुवर्ण वेषात सजविले जाते. बडदाण्ड अथवा जगन्नाथ पथावर रथातच या मूर्ती राहतात. द्वादशीला पुन्हा मंदिरात सुप्रतिष्ठित होतात. प्रथम बलराम व सुभद्रा आत जातात. जगन्नाथाला मात्र भक्तांच्या अनुमतीनेच आत जावे लागते.



**जगन्नाथाचा रथ –** जगन्नाथाच्या रथाला 'नंदीघोष' असे म्हणतात. हा ४५ फूट उंच असून याला १८ चाके आहेत. लाल-पिवळ्या रंगात हा रथ रंगवलेला आहे. जगन्नाथाचा सारथी मातली मानला जातो. रथाच्या शिखरावर चक्र व गरुड अधिष्ठित आहेत. शुभ्र रंग दिलेले चार लाकडी घोडेही याला जोडले जातात. या रथाचा पालक साक्षात भगवान नरसिंह होय.

**बलराम रथ –** बलरामाचा रथ ४५ फूट उंच असून त्याला १६ चाके आहेत. याला 'तालध्वज' असे म्हणतात. हा रथ लाल आणि हिरव्या रंगात रंगवलेला आहे. हा रथ ताल फळांनी आच्छादिलेला असतो. या रथाला काळ्या रंगाचे चार लाकडी घोडे जोडलेले असतात. सारथ्याचे नाव तालध्वज, पालक अनन्तशेष आणि रथशिखरावर ताल आहे.

**सुभद्रेचा रथ –** सुभद्रेचा रथ ४३ फूट उंच असून त्याला १४ चाके आहेत. याचे नाव 'पदमध्वज' असे आहे. लाल आणि काळ्या रंगाने हा सुशोभित असतो. या रथाचा सारथी अर्जुन व पालकरक्षिका वनदुर्गा आहे. प्रत्येक रथावर बाजूला

अनेक देवता असतात. कळस सोडून या रथांच्या सर्व बाजू दरवर्षी नव्याने बनवल्या जातात. ही अतिशय जुनी अशी परंपरा आहे.

**पहंडी –** म्हणजे मूर्तींना मंदिरातून आणून रथात स्थापन करणे. हा या उत्सवातील सर्वात रंगतदार भाग असतो. पहिल्यांदा मंदिरातून सुदर्शनचक्र आणून सुभद्रेच्या रथात स्थापिले जाते. तदनंतर बलराम, सुभद्रा व जगन्नाथ यांच्या मूर्ती त्यांच्या त्यांच्या रथात ठेवल्या जातात. थोडक्यात गर्भगृहातील रत्नवेदीपासून रथापर्यंतच्या पदयात्रेला पहंडी म्हणतात. मूर्तींना रथावर चढविण्यासाठी केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण शिडीला चार माल म्हणतात. शेवटी ओडिशाचा राजा (गजपती गौडेश्वर) रथाची पुढची जागा सोनेरी दांडा असलेला झाडू हातात घेऊन झाडतो. ओडिशाचा गजपती वंश स्वत:ला जगन्नाथाचा दास समजतो. या सेवेला 'छेरा पहँरा' आणि राजाला 'ठाकुर राजा' म्हणण्याची रूढी आहे. हा रथ अत्यंत धीम्या गतीने व प्रचंड गर्दीतून जात असल्यामुळे तो पहिल्या दिवशी गुंदीचा मंदिरापर्यंत पोहचू शकत नाही, तर सूर्यास्त झाल्यावर जिथपर्यंत रथ पोहचला असेल तिथेच थांबतो व दुसऱ्या दिवशी गुंदीचा मंदिरापर्यंत जातो. गुंदीचा मंदिर म्हणजे प्राचीन अश्वमेध यज्ञाची पीठस्थळी आहे. म्हणून या जागेला यज्ञवेदी असेही म्हणतात. रथांचा क्रम बलराम, सुभद्रा व शेवटी जगन्नाथाचा असा आहे. तिन्ही रथांपुढे अनेक भजनी मंडळी 'हरे कृष्ण, हरे राम'चे संकीर्तन मांडतात. मृदंगमंजिरी निनादत राहतात. वाटेतच जगन्नाथाला 'पक्का भोग' अर्पण केला जातो. असंख्य भक्तगण रथावर नारळ फेकतात. रथावरील लोक नारळ फोडून तो प्रसाद तिथेच भक्तांना देतात. वाटेत 'अर्धाशिनी माउसी माँ मंदिर' आहे. तिथे रथ थोडा वेळ थांबतात. इथे 'पोड पीठा'चा भोग जगन्नाथाला अर्पण केला जातो. बलखण्डी नावाच्या जागेवरही रथ काही काळ थांबतो. कारण राजा बली इथे जगन्नाथाच्या दर्शनाला येतो, अशी भक्तांची दृढ श्रद्धा आहे. गुंदीचा मंदिराजवळच जनकपूर किंवा इंद्रद्युम्नप्रासाद नावाचे स्थान आहे. तिथपर्यंत हा रथ जातो. जगन्नाथाला भेटण्यासाठी लक्ष्मीदेवी तिथे येते, अशी समजूत आहे.

श्री जगन्नाथाला गुंदीचा मंदिरात सात दिवस सादर सुप्रतिष्ठित केले जाते. राजा इन्द्रद्युम्नाच्या पत्नीचे नाव गुंदीचा होते. ती विष्णूची परमभक्त होती. ज्यावेळी जगन्नाथाची प्रतिष्ठापना श्री मंदिरात झाली, त्यावेळी प्राचीन काळी या नीलमाधवाची पूजा विश्वावसू शबर करत होता. गुंदीचा राणीला याचे वैषम्य वाटले. तिची भावभक्ती पाहून जगन्नाथाने तिच्या घरी प्रतिवर्षी नऊ दिवस येण्याचे वचन दिले. त्यानुसार जगन्नाथ गुंदीचा मंदिरात जातो.

रामायण-महाभारतात रथारोहणाचे अनेक उल्लेख आहेत. प्रल्हादाने विष्णूचा रथ ओढल्याचा उल्लेख पुराणात आहे. देवदेवतांनी रथयात्रेचे अनुष्ठान केले होते. कॅप्टन ब्रूटेन (इ.स.१६३३), बर्नियर (इ.स.१६६७), ॲलेक्झांडर हॅमिल्टन (इ.स.१७२७), स्टर्लिन (इ.स.१८१८) व त्यानंतर फर्गसन व विल्यम हंटर या सर्वांनी पुरीच्या रथोत्सवाचे वर्णन लिहिले आहे. इ.स. १८ व्या शतकारंभी मुसलमान आक्रमकांमुळे ही रथयात्रा 'टिकली' आणि 'पारला' या गावांमधे संपन्न होत असे आणि नंतर आत्ता आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम् येथे प्रचंड उत्साहात साजरी होते. पारला राजा नरहरी नारायण देव आणि त्याचा पुत्र वीर पद्मनाभ नारायण देव यांच्या आश्रयामुळे रथोत्सव खंडित झाला नाही. धर्मांध औरंगजेबाने पुरीच्या रथोत्सवावर बंदी घातली होती; पण महन्त रामदयती गोस्वामी दीनानाथ नृसिंहाच्या प्रयत्नातून रथोत्सवाला

मान्यताही मिळाली.

जगन्नाथाचा रथोत्सव म्हणजे मानवी देह व त्याच्या आत्मोन्नतीचे प्रतीक आहे. शरीर रथ आहे. इंद्रिये घोडे, मन म्हणजे लगाम, बुद्धी ही सारथी, तर आत्मा रथी असल्याचे कठोपनिषदात सांगितले आहे. जगन्नाथाच्या रथाची निर्मिती करण्यासाठी गुणकार, रथकार, लोहकार, छन्दकार, रूपकार, चित्रकार, सूचीकार अशा सात कलाकारांना अखण्ड श्रम करावे लागतात. मानवालाही देहातील सप्त चक्रांवर (मूलाधार ते सहस्त्रार) प्रभुत्व मिळविल्यावरच आत्मदर्शन होते. रथांना जोडलेले चार घोडे चार पुरुषार्थांचे प्रतीक होय. म्हणून या रथोत्सवात अनेक भक्त काही ओळी पुन: पुन्हा म्हणतात.

**'देख रहे हो रथ पर्वत्वत,**
**सहज चले नहिं तिल भर ।**
**भक्ति-भाव के कम्पनसे ही,**
**रथ चलता हिल हिल कर ।**
**धर्म, अर्थ और काम मोक्ष के,**
**रस्से रथ से जोड़े ।**
**गति के सूचक लगे सु-रथ में,**
**सुभग चारही घोडे ।।'**

हा रथ यात्रेनंतर मोडला जातो.

नवीन रथ निर्माण करण्याचा संकल्प अक्षय्य तृतीयेला गजपती गौडेश्वर महाराज एका सुप्रसिद्ध आचार्यांच्या मार्गदर्शनाखाली करत असत. आचार्य आणि सूत्रधर (उत्तम सुतार) रथासाठी उपयुक्त वृक्ष शोधून त्यापासून रथ सिद्ध करत असत. आता मात्र ही प्रथा राहिलेली नाही. तालचरचे महाराजच नवीन रथासाठी उत्तम लाकूड पाठवितात.

फाल्गुन शुद्ध द्वादशीला गोविंद-द्वादशी म्हणतात आणि तो जगन्नाथाचा जन्मदिवस मानतात. या तिथीला जेव्हा पुष्य नक्षत्र असते, तेव्हा पुरीला समुद्रस्नानासाठी यात्रा जमते.

***इतर उत्सव –***

***चंदन यात्रा*** – या यात्रेमध्ये देवतांना नरेंद्र सरोवरामध्ये नौकानयनासाठी नेले जाते. येथे या मूर्तींना चंदनाच्या पाण्याने स्नान घातले जाते. हा उत्सव ४२ दिवस चालतो. पहिल्या २१ दिवसांना 'बाह्य चंदन' असे म्हणतात. या दिवसांमध्ये राम, कृष्ण, मदन, मोहन, लक्ष्मी, सरस्वती यांना नौकाविहारासाठी नेले जाते. पुढच्या २१ दिवसांना 'भीतर चंदन' असे म्हटले जाते. ही यात्रा एप्रिलमध्ये असते.

***झूलनयात्रा*** - श्रावण शुद्ध दशमी ते पौर्णिमेपर्यंत मदनमोहनाच्या उत्सव मूर्तीला लक्ष्मी-सरस्वतीसह झूलन मंडपात ठेवतात ह्या उत्सवासाठी भक्तांची गर्दी असते.

***तिलकोत्सव*** - पूर्णिमा स्नानानंतर देवतांच्या मस्तकावरील सुवर्णमण्याचा टिळा काढलेला असतो. तो श्रावण अमावस्येला पुन्हा लावतात तोच तिलकोत्सव होय.

***दमनक चतुर्दशी*** – यादिवशी भगवंताने दमनासुराला ठार केले. हा असुर वृक्षरूपाने मातला होता.

***दोलयात्रा*** – फाल्गुन शुद्ध दशमी ते पौर्णिमेपर्यंत जगन्नाथाला लक्ष्मी-सरस्वतीसह पालखीत बसवून जगन्नाथ वल्लभ मठापर्यंत नेण्यात येते. पौर्णिमेला गोविन्द दोल वेदीवर मूर्ती आणतात. यावेळी होळीचा रंगोत्सव खेळला जातो.

याशिवाय गणेश चतुर्थी, राधाष्टमी, वामन जन्म, इंद्रगोविंदपूजा, सातपुरी अमावस्या असे अनेक अन्य उत्सवही पुरीच्या मंदिरात प्रतिवर्षी संपन्न होतात.

***नवकलेवर उत्सव*** – जगन्नाथाची पहिली मूर्ती विसर्जित करून नवीन मूर्ती प्रस्थापित केली जाते. अधिक आषाढ येतो, तेव्हाच या नवीन

मूर्ती घडवल्या जातात. म्हणजेच दर ८, ११ किंवा १९ वर्षांनी हा योग येतो.

या विधीला नवकलेवर तथा ब्रह्मपरिवर्तन असे म्हणतात. नवकलेवर म्हणजे नवीन शरीर धारण करणे. हा नियम मानवाला लागू आहे. परमात्म्याला नाही. मग जगन्नाथाच्या मंदिरात ही प्रथा कोठून आली? ज्यावेळी यदुवंशाचा-यादववंशाचा नाश झाला, त्यावेळी भगवान श्रीकृष्णाने द्वारकेचा त्याग केला आणि तो प्रभासक्षेत्री आला. तिथेच विश्राम करत असताना जरा शबराचा बाण त्याच्या पायात लागला. ही घटना अधिक आषाढ महिन्यातील होती. भगवंतांनी कृष्ण चतुर्दशीला आपला देह टाकला. त्यामुळे अधिक आषाढातच नवकलेवर निर्माण करतात. शिल्पशास्त्रानुसार लाकडाची अर्चनामूर्ती दहा बारा वर्षांपेक्षा अधिक काळ ठेवू नये. बदलावी. ज्या वर्षात अधिक आषाढ येतो, त्यावर्षी चैत्र शुद्ध दशमीलाच माध्याह्नी एक विशेष पूजा करतात. विशिष्ट प्रकारच्या माळा तिन्ही मूर्तींना अर्पण करतात. त्यानंतर सेवक वर्गाचे चार गट करून नवकलेवरसाठी नवीन उत्तम लाकूड(दारू) शोधण्यासाठी बाहेर पाठविले जातात. सर्वप्रथम गजपती गौडेश्वराकडे सर्वजण जातात. गौडेश्वर त्यातील एकालाच विश्वावसु शबर म्हणून नियुक्त करतो. मग जगन्नाथवल्लभ मठ, पुरीमाधव मार्गावरून 'दारूसंधान यात्रा' सुरू होते.

पुरीचे क्षेत्र पुरुषोत्तम क्षेत्र म्हणून सुविख्यात आहे. या क्षेत्राच्या रक्षिका अष्टशक्ती आहेत. त्यापैकी मंगलादेवी प्रधान मानली जाते. प्राची नदीच्या काठी सिद्ध मठात येऊन सर्वजण मंगलादेवीची काही दिवस निराहार उपासना करतात. लाकूड(दारू) निवडण्याचा दृष्टांत मंगलादेवीच देते. मग सर्व सेवकगण वृक्ष निवडीसाठी बाहेर पडतात. जगन्नाथासाठी मठ, आश्रमाजवळील चार प्रधान फांद्या असलेला शंख-चक्र-गदांकित व नागनिवास असलेला वृक्ष; बलभद्रासाठी सात फांद्यांचा वृक्ष; सुभद्रेसाठी पाच पाकळ्यांच्या कमळांचे चिन्ह असलेला वृक्ष; सुदर्शनासाठी बेल वृक्षाचे सानिध्य असलेला वृक्ष अशी वृक्षांची निवड केली जाते. असे वृक्ष सापडल्यावर परिसर स्वच्छ करून मंडप घालून 'वनयाग' करतात. यज्ञकुण्डात सहस्राहुती दिली जाते. यज्ञकुण्डाजवळ पुरीहून आणलेल्या सुदर्शनाची स्थापना करतात. या समाप्तिनंतर वृक्षतोडीला प्रारंभ होतो. सेवकगण तत्पूर्वी वृक्षाला सात प्रदक्षिणा करतात. निर्जल उपवासही होतो. विद्यापती पदारुढ अधिकारी सर्वप्रथम सोन्याच्या कुऱ्हाडीचा घाव घालतो. नंतर विश्वावसू शबर चांदीच्या कुऱ्हाडीचा घाव घालतो. नंतरच लोखंडाच्या कुऱ्हाडीने वृक्ष तोडतात. मूर्तीसाठी आवश्यक ते लाकूड बाजूला काढून वृक्षाचा उरलेला भाग जमिनीत पुरला जातो. मूर्तीचे लाकूड रेशमी वस्त्रात गुंडाळून, पूजन करून, वाजत गाजत, संकीर्तनाच्या कल्लोळात, पुरीच्या मंदिराच्या उत्तर द्वारातून आत आणतात व चार वेगळ्या ठिकाणी ठेवतात. ज्येष्ठ पौर्णिमेपर्यंत हे लाकूड तसेच ठेवतात. त्या दिवशी पूजेच्या मूर्तींना स्नान घालून 'अणसर घर' येथे आणतात. नवीन लाकडालाही स्नान घालतात. चंदनाचा लेप देतात. अंकुररोपण यज्ञ झाल्यावर पुढे पंधरा दिवस नवीन मूर्ती करण्याचे पवित्र कार्य रात्रंदिवस चालते. जगन्नाथाची मूर्ती चक्राकार, बलरामाची शंखाकार, तर सुभद्रेची पद्माकार बनवितात. सुदर्शनचक्राची मूर्ती गदाकार आहे. यांचे रंग अनुक्रमे मेघश्यामवर्ण, शुभ्र, पिवळा व लाल असतो. जगन्नाथाच्या ठायी ब्रह्मतत्त्व स्थापण्यासाठी त्याच्या हृदयात एक नाभी तयार केली जाते. मग वैदिक ब्राह्मणांच्या मंत्रघोषात जीवन्यास करतात. आषाढाच्या प्रतिपदेला या

मूर्तींना रथात बसवून मंदिरात चारी दिशांना फिरविले जाते. आषाढ शुद्ध चतुर्दशीला मध्यरात्री नवकलेवर वा ब्रह्मपरिवर्तन सोहळा होतो. एका गुप्त कक्षात पुष्प, तुळस, शुद्ध कस्तुरीसह देव असतात. ज्या व्यक्तीची निवड ब्रह्मपरिवर्तनासाठी होते, त्याचे डोळे वस्त्राने पूर्ण बंद करतात. ज्या जगन्नाथाच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात येते, त्या मूर्तीच्या नाभीतून ब्रह्मतत्त्व काढून नवीन मूर्तीत स्थापण्याचे कार्य ही व्यक्ती करते. असे कार्य करणारी व्यक्ती पुढे फार काळ जिवंत राहू शकत नाही असे म्हणतात. तरीही हे जगन्नाथकार्य करण्यासाठी भक्तश्रेष्ठात स्पर्धा असते. जुन्या मूर्तींना कोइल वैकुंठ येथे लताकुंजात भूमीखाली समाधी देतात. त्यावेळी पुजारी व सेवकगण अंगाला तेल लावून मार्कण्डेय पुष्करिणीत स्नान करतात. अपरंपार शोकही करतात. तेराव्या दिवशी ब्रह्मभोजन असते. नवीन मूर्तींचा नेत्रोत्सव, नवयौवन दर्शन, रथयात्रा या कार्यक्रमाला प्रारंभ होतो.

***नीलाद्रि महोदय*** – वैशाख शुद्ध अष्टमीला भगवान जगन्नाथाची सर्वप्रथम प्रतिष्ठापना झाली म्हणून या दिवशी जगन्नाथाला राजोपचारासहित अभिषेक करतात.

***बलभद्रजन्म*** - श्रावण पौर्णिमेच्या बलराम जन्मोत्सवात सुवर्णतंतूची राखी देवाला बांधतात, यावेळची सन्ध्यारती फारच सुंदर असते.

***सहस्त्रकुंभ अभिषेक*** - आश्विन कृष्ण अष्टमीपासून पुढे सोळा दिवस श्रीदुर्गेला अभिषेक करतात. महादेवी विमलेच्या मंदिरात याच दिवशी बोलपूजेचा प्रारंभ होतो.

***स्नानयात्रा*** – स्नानयात्रा म्हणजे मुख्य मूर्तींना स्नान घातले जाते. ज्येष्ठी पौर्णिमेच्या दिवशी हा उत्सव असतो. तीनही देवता सुदर्शन चक्राबरोबर स्नानमंडपात आणल्या जातात. तिथे १०८ पात्रांनी या देवतांना स्नान घातले जाते. यानंतर या देवतांना पुन्हा मंदिरात आणून १५ दिवसांचा एकांतवास दिला जातो. कारण या स्नानामुळे त्यांना शैत्याची बाधा होते. ती बरी होण्यासाठी त्यांना हा एकांतवास आवश्यक असतो. जेव्हा जगन्नाथ १५ दिवस दिसत नाहीत, त्याला 'अनवसर' अशी संज्ञा योजली जाते. या कालखंडात त्या मूर्तींना स्वतंत्र निवासस्थानात ठेवले जाते आणि त्यांना औषधी अन्न दिले जाते. या अनवसर काळात असे म्हटले जाते की, जगन्नाथाला ताप येतो म्हणून त्याला फळाचा रस आणि हलके अन्न दिले जाते. जगन्नाथाचे शरीर स्वच्छ केले जाते आणि त्या मूर्तींना परत रंगवले जाते. यालाच 'अंगराग' असे नाव आहे. याला बरोबर दोन आठवडे लागतात. या उत्सवालाही 'नवयौवन' असे म्हटले जाते. याचाच अर्थ आता जगन्नाथ पुन्हा तरुण होतो.

***हरिशयनी एकादशी*** - रथोत्सवाचे एक अंग आषाढ शुद्ध एकादशीला तिन्ही मूर्तींना सुवर्ण वेष चढविला जातो.

**परिसरातील तीर्थे** – जगन्नाथ पुरीतील जलतीर्थ, इंद्रद्युम्न सरोवर, चक्रतीर्थ, महोदधी (समुद्र), मार्कंडेय सरोवर आणि चंदन तलाव, रोहिणीकुंड, लोकनाथ सरोवर, श्वेतगंगा

**परिसरातील मंदिरे** – एमार मठ, कपोतेश्वर मंदिर, कबीर मठ, कानवत हनुमान मंदिर, केदारेश्वर मंदिर, गंगा माता मठ, गम्भीरामठ (श्रीराधाकान्तमठ), गुंडीचा मंदिर, गोवर्धन पीठ, गौडीय मठ, चक्रनारायण मंदिर, चातक पर्वत गौडीय मठ, तोटा गोपीनाथ मंदिर, नरसिंह मंदिर, नरेंद्र सरोवरमंदिर, बलिहर चंडी, बेडी हनुमान मंदिर, रामचंडी, लोकनाथ महादेव मंदिर, वालुकेश्वर शिवमंदिर, श्वेतकेशव मंदिर, साक्षी गोपाल मंदिर, सिद्धबकुल, सोनार

गौरांग मंदिर, हरिदास समाधी

**असे हे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि कोट्यवधी भक्तांचे परम श्रद्धेय स्थान पवित्र चार धामांपैकी जगन्नाथपुरी.**

**याची वैशिष्ट्ये अशी–**

१) जगन्नाथ मंदिरावरील ध्वज ज्या दिशेला वारा वाहतो त्याच्या विरुद्ध दिशेला फडकतो. असे का ते वैज्ञानिकही सांगू शकले नाहीत.

२) या मंदिराची उंची २१४ फूट आहे. त्यामुळे जवळून शिखराचे दर्शन घेताच येत नाही. पण या शिखराची सावली दिवसभरात कधीही कोठे पडत नाही.

३) मंदिराच्या शिखरावर लावलेले सुदर्शनचक्र अष्टधातूंपासून बनवले आहे. अतिशय पवित्र आहे. हे नेहमी आपल्याकडे मुख असलेलेच दिसते.

४) सामान्यत: दिवसा वारे समुद्रावरून जमिनीकडे वाहतात आणि संध्याकाळी त्या विरुद्ध. पण पुरीत याच्याबरोबर विरुद्ध असते.

५) या मंदिराच्या शिखराजवळ कोणताही पक्षी उडताना वा बसताना दिसत नाही.

६) ५०० आचारी प्रसाद बनवतात. २० लाख भक्त भोजन करतात. एक कण सुद्धा कधी वाया जात नाही. ७ भांडी अन्न शिजविण्यासाठी एकावर एक ठेवली जातात. पण सर्वात वरच्या भांड्यातील अन्न आश्चर्य म्हणजे प्रथम शिजते.

७) मंदिराच्या सिंहद्वारातून पहिले पाऊल आत टाकताच समुद्राचा आवाज ऐकू येणे बंद होते. तसेच बाहेर स्वर्गद्वाराजवळ जळणाऱ्या प्रेतांचा वासही येत नाही.

८) रथयात्रा आषाढ महिन्यात ५ किलोमीटर पसरलेल्या पुरुषोत्तम क्षेत्रातच संपन्न होते.

९) जगन्नाथपुरीचे रक्षण हनुमानजी करतात. त्यांनी कोठे जाऊ नये म्हणून स्वर्णबेडीने त्यांना प्रभूने बद्ध केले. सागरतीरावर बेदी हनुमान मंदिर आहे.


१०) शीख सम्राट महाराजा रणजितसिंहाने अमृतसरच्या सुवर्णमंदिरापेक्षाही अधिक सोने या मंदिराला दान दिले.

असे हे अद्भुत मंदिर भारताची शान आहे.

* * *




**'संपूर्ण भारतच एक तीर्थक्षेत्र आहे!'**
**– गुरुदेव**



**संपूर्ण भारतातील तीर्थक्षेत्रे व मंदिरे यांची राज्याप्रमाणे, जिल्ह्याप्रमाणे अकारविल्हे माहिती देणारा दुर्मिळ ग्रंथ.**

**भारतातील सर्व तीर्थक्षेत्रे आणि मंदिरांचे समग्र दर्शन!**

**देणगी मूल्य आहे रु. ५०००/- (डबल डेमी पृष्ठसंख्या १४२४)**

**सवलत देणगी मूल्य**
**केवळ रु. १९९९/- (टपाल खर्चासह)**

***वाचकांनी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा.***

# द्वारका



भारताचे पश्चिम दिशेचे पवित्र धाम

# ३. द्वारका
## (पश्चिमेचे धाम)



गुजरात राज्य फार फार भाग्यवंत आहे. कारण ही भूमी पूर्णावतार भगवान श्रीकृष्णाच्या वास्तव्याने पुनित झाली आहे. भृगूकुलाने या भूमीत दीर्घकाल तपश्चर्या केली आहे. द्वारका, डाकोर इत्यादी तीर्थक्षेत्रांनी व मंदिरांनी गुजरातच्या मातीला भक्तीचा गंध दिला आहे. द्वारका तर भारताच्या चार धामांपैकी एक आहे.

**'द्वारका-पंढरी देखे नही,**
**चढे न गिरि गिरनार ।**
**ज्योतिशिवजी गणेश ना तो,**
**जानो जननी भार ।।'**

**भारतातील सप्तपुरींपैकी एक प्राचीन तीर्थक्षेत्र आणि पवित्रतम चार धामांपैकी पश्चिमेचे तीर्थक्षेत्र!** यालाच 'द्वारावती' असेही म्हणतात. हे प्राचीन क्षेत्र गुजरात राज्यातील जामनगर जिल्ह्यात जामनगरपासून १४८ कि. मी. अंतरावर समुद्रकिनारी वसलेले आहे. हे सौराष्ट्रातील उखामंडल तालुक्यात गोमतीच्या काठी आहे. **हिंदू धर्मातील हे अत्यंत पवित्र क्षेत्र आहे.**

येथे अनेक प्राचीन मंदिरे असून यामधील द्वारकाधीश मंदिर, भद्रेश्वर आणि रुक्मिणीमंदिर ही तर ख्रिस्त युगाच्याही अगोदर बांधली गेली आहेत हे सिद्ध झाले आहे. या नगरीचे अनेक उल्लेख संस्कृत वाङ्मयात आढळतात. महाभारत, स्कन्द पुराण, विष्णु पुराण, भागवत इत्यादींमध्ये या नगरीचे उल्लेख येतात. ८ व्या शतकात आदि शंकराचार्यांनी येथे द्वारकेचे पीठ स्थापन केले. गुप्त, पल्लव, मैत्रक, आणि चालुक्य या वंशातील सर्वच राजांना द्वारकेचे आकर्षण वाटत आले आहे. हे सर्व तेथील मंदिरांच्या स्थापत्यात आणि मूर्तिकलेत प्रतिबिंबित झाले आहे. द्वारकेच्या जन्माष्टमी उत्सवाच्या वेळेस येथे प्रचंड यात्रा भरते. येथे असलेला समुद्र हेही पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरते. **हिंदूंच्या सात मोक्षदायक पुऱ्यांमध्ये आणि**

**चार पवित्र धामांमध्ये द्वारकेची गणना होते.** भगवान श्रीकृष्णाची नगरी म्हणून हिंदूंना द्वारकेविषयी प्राचीन काळापासून अपरिमित प्रेम वाटत आले आहे.

**द्वारकेची प्राचीनता –** कंसवधानंतर मथुरेवर जरासंध आणि कालयवन यांचे दुहेरी आक्रमण आल्यामुळे कृष्णाने स्वपक्षीय यादवांसह राजस्थानमार्गे रैवतक पर्वताचा पायथा गाठला आणि तिथे सागरतीरावर विश्वकर्म्याच्या हस्ते द्वारका नगरीची उभारणी केली, असे पुराणांनी सांगितले आहे. महाभारत, हरिवंश आणि वायू, विष्णू, भागवत, वराह, स्कंद इत्यादी पुराणे या ग्रंथांत द्वारकेची विस्तृत वर्णने आढळतात. हिला द्वारावती, द्वारवती, द्वारमती, वनमालिनी इत्यादी पर्यायनामे आहेत. या नगरीभोवती असलेल्या तटाला अनेक द्वारे होती, म्हणून हिला द्वारका, द्वारावती इत्यादी नावे मिळाली, असे अनेक पौराणिक उल्लेखांवरून दिसते. 'कृता द्वारवती नाम बहुद्वारा मनोरमा' अनेक द्वारांनी युक्त अशी द्वारवती नावाची मनोरम नगरी निर्माण केली, असे हरिवंशात म्हटले आहे (१०.३४). 'चतुर्वर्णानां मोक्षद्वाराणि सन्ति यत्रेति।' जिथे चारही वर्णांची मोक्षद्वारे खुली आहेत, ती द्वारवती होय, अशीही एक व्युत्पत्ती आढळते.

हरिवंशकाराने प्राचीन द्वारकेच्या विस्ताराचे आणि अभेद्यतेचे वर्णन केले आहे, ते असे–

अप्रमेयां महोत्सेधामगाधपरिखायुताम् ।
प्राकारवरसम्पन्नां सुधापाण्डुरलेपनाम् ॥
तीक्ष्णयन्त्रशतघ्नीभिर्हेमजालैश्च भूषिताम् ।
आयसैश्च महाचक्रैर्ददर्श द्वारकां पुरीम् ॥
अष्टयोजनविस्तीर्णामचलां द्वादशायताम् ।
द्विगुणोपनिवेशां च ददर्श द्वारकां पुरीम् ॥
अष्टमार्गमहारथ्यां महाषोडशचत्वराम् ।
एकमार्गपरिक्षिप्तां साक्षादुशनसा कृताम् ॥
(हरिवंश विष्णुपर्व ९८.२४, २५, २७, २८)

'द्वारकेभोवती विस्तीर्ण, उत्तुंग आणि चुन्याने रंगविलेले तट होते. तटांना लागून खोलच खोल खंदक होते. तटांवर आग ओकणारी तोफांसारखी अस्त्रे, लोखंडी चक्रे आणि सोन्याच्या जाळ्या होत्या. द्वारकेचा विस्तार आठ योजने (सुमारे ६० कि.मी.) रुंद आणि बारा योजने (सुमारे ९० कि.मी.) लांब एवढा होता. ती दोन प्रकारच्या उपनिवेशांनी (उपनगरांनी) युक्त होती. तिच्यामध्ये आठ मोठे मार्ग होते आणि सोळा मोठे चौक होते. तिला (सागराने तीन बाजूंनी वेढलेले असल्यामुळे) एकच प्रवेशमार्ग होता.

पौराणिक वर्णनानुसार प्राचीन द्वारकेचा विस्तार शत योजनांपर्यंत होता. तिच्यात गगनचुंबी प्रासाद होते. त्याच्या शिखरांना सुवर्णाची झळाळी होती. त्यामुळेच तिला लोक 'सोन्याची द्वारका' म्हणत होते. आपसांतील संघर्षात यादवांचा नाश झाल्यावर श्रीकृष्णाने प्रभासक्षेत्री देहत्याग करून अवतारसमाप्ती केली आणि त्यानंतर समुद्राने द्वारकेला सर्व बाजूंनी ग्रासून टाकले अशी भागवत पुराणाची कथा आहे. द्वारका ही भगवान श्रीकृष्णाची ५००० वर्षांपूर्वीची राजधानी. मथुरा सोडल्यावर कृष्णाने द्वारकेत शंभर वर्षे व्यतीत केली.

भागवतामध्ये द्वारकेचे वर्णन आले आहे. जेव्हा नारदाने श्रीकृष्णाची भेट घेतली तेव्हा त्यांना द्वारका अशी दिसली– 'द्वारकेत अनेक बगीचे वेगवेगळ्या फुलांनी बहरलेले होते. अनेक वृक्ष विविध फळांनी लगडलेले होते. उत्तम संगमरवरापासून बनवलेले नऊ लाख प्रासाद या नगरीत होते. प्रासादांचे दरवाजे चांदीचे बनवलेले होते. येथील खांब हे रत्नांनी मढवलेले होते. यात नीलमणी व हिरे यांचाही वापर केलेला होता. राजप्रासादातील जमीन अत्यंत सुशोभित होती. मोठाल्या इमारती, चौक,

छोटे-मोठे रस्ते आणि सर्व निवासी इमारती या अत्यंत स्वच्छ होत्या. विशिष्ट अंतरावर मोठे वृक्ष लावण्यात आले होते ज्याच्यामुळे पांथस्थांना सावली मिळत असे. द्वारकेमध्ये प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण ज्या राजप्रासादात राहत असत त्या संकुलात अनेक प्रासाद बांधले गेले होते. स्वत: विश्वकर्म्याने याचे स्थापत्य बनवले होते, ज्यामध्ये त्याने स्वत:चे सर्व कौशल्य व कला पणाला लावली होती. सोळा हजारपेक्षाही अधिक राजगृहे कृष्णाच्या स्त्रियांसाठी बांधलेली होती. या राजगृहांचे खांब प्रवालांचे होते आणि छतावर रत्ने जडवलेली होती. दोन खांबाच्या मधील कमानींवर वेगवेगळ्या रत्नांनी नक्षीकाम केलेले होते. मोत्यांच्या घोसांनी मढवलेले असे विहार कुंज ठिकठिकाणी त्या राजगृहात शोभून दिसत होते. राजगृहातील सर्व लाकडी वस्तू हस्तिदंताने मढवलेल्या होत्या, त्यात सोने व हिरेही जडवलेले होते. विविध प्रकारच्या रत्नाच्या दिव्यांमुळे राजप्रासादातील अंधार नाहीसा होत असे. असे हे या नगरीचे वैभव होते.

**सध्याची द्वारका –** सध्या मात्र द्वारका हे अरबी समुद्राच्या काठावर गुजरातमधील एका छोट्या द्वीपावर वसलेले एक छोटेसे गाव आहे. येथील हवा हिवाळ्यात अतिशय छान आणि उन्हाळ्यात मात्र फार गरम असते. अत्यंत शांत आणि गजबजाट नसलेले असे हे गाव आहे. सनक, मरीचि, अत्री व अंगिरस आणि इतर अनेक ऋषींनी येथे तपश्चर्या केली.

श्रीकृष्णाची द्वारका बुडाल्यानंतर श्रीकृष्णाचा नातू वज्रनाभ याने सागरतीरावर नवी द्वारका उभारली, तीच सध्याची द्वारका होय, अशी पुराणांची माहिती आहे. त्याने आपल्या आजोबांच्या स्मरणार्थ येथे छत्री उभारली व हरि मंदिरही बांधले. इ.स.पू. १०० मध्ये या मंदिराचा पूर्वेकडचा भाग बांधला गेला असे इकडच्या एका ब्राह्मी भाषेतील शिलालेखात लिहिलेले आहे. त्यानंतर ३०० वर्षांनी मूळ छत्रीखाली श्रीकृष्णाची मूर्ती स्थापन करण्यात आली.

**द्वारकेत द्वारकाधीशाचे मंदिर प्रमुख आहे.** रणछोडजीच्या मंदिराशिवाय द्वारकेत अनेक पुरातन मंदिरे होती. परंतु इ. स. १४६० मध्ये गुजरातचा सुलतान महंमूद बेगडा याने त्या बहुतेक मंदिरांचा विध्वंस केला. वाघेर जातीचे चाचे या मंदिरांच्या आश्रयाने त्रास देतात, याचे निमित्त साधून पुढे इ. स. १८१६ मध्ये इंग्रजांनी त्या मंदिरांचा समूळच नाश केला. पुढे **इंग्रजांकडून हा भाग गायकवाडांकडे आल्यावर त्यांनी मूळ मंदिरांच्या जागी नव्या मंदिरांची उभारणी केली.**

**द्वारकेत गोमतीच्या जलाचे स्नान, गोमयाचे लेपन, गोदान, गोपीचंदनाचा टिळा आणि गोपीनाथाचे दर्शन या पाच प्रकारांचे विशेष महत्त्व मानले जाते.** गोमतीवर नऊ पक्के घाट आहेत. दंड, मुंड व दम हे येथील यात्राविधान होय. दंड म्हणजे यात्राकर भरणे, मुंड म्हणजे क्षौर करणे आणि दम म्हणजे अंगावर तप्तमुद्रा घेणे. पण ही तप्तमुद्रेची प्रथा गायकवाडांनी कायद्याने बंद केली आहे.

आदि शंकराचार्यांनी भारताच्या चार दिशांना जी चार धर्मपीठे स्थापन केली, त्यांपैकी शारदापीठ नामक धर्मपीठ द्वारकेत आहे. शंकराचार्यांनी आपल्या निर्वाणापूर्वी एक महिना या पीठावर सुरेश्वराचार्यांची नियुक्ती केली होती. प. पू. स्वामी स्वरूपानन्द सरस्वती हे द्वारकेच्या शारदा पीठाचे विद्यमान शंकराचार्य आहेत. **पश्चिम भारतात धर्मनिष्ठा जागविण्याचे व टिकविण्याचे मोठे कार्य शारदापीठाने केले आहे.**

द्वारका ही यात्रिकांच्या वर्दळीने नेहमीच

गजबजलेली असते. रामानुजाचार्य, मध्वाचार्य, ज्ञानेश्वर, वल्लभाचार्य इत्यादी अनेक महापुरुषांनी द्वारकेची यात्रा केली होती. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी यांचे परमगुरु चांगदेव राऊळ हे महाराष्ट्रीय सत्पुरुष त्रेसष्ट वर्षे द्वारकेतच राहिले होते. त्यामुळे महानुभावीय लोक त्यांना 'द्वारावतीचे चांगदेव राऊळ' म्हणून ओळखतात. गुजरातचे नरसिंह मेहता हे रणछोडजीचेच भक्त होते. मीराबाईही त्यांच्याच भक्तीत रंगलेल्या होत्या.

**द्वारकाधीश मंदिर – विष्णूच्या १०८ दिव्यदेशांपैकी एक.** द्वारका या क्षेत्रात अनेक मंदिरे आहेत; पण त्यातील द्वारकाधीश मंदिर मुख्य आहे. द्वारकाधीशाच्या मूर्तीत भगवान श्रीकृष्णाने आपली सर्व कला, ऐश्वर्य, संपत्ती आणि आत्मतत्त्व संक्रमित केले. मंदिर दर्शनासाठी पहाटे ५ वाजल्यापासून खुले होते. हे मंदिर गोमतीच्या काठी आहे. द्वारका शहराच्या मध्यभागी हे मंदिर आहे. द्वारकाधीश म्हणजे द्वारकेचा राजा असा जो कृष्ण त्याचे हे मंदिर. या मंदिराच्या शिखरावर ८४ फूट लांबीचा ध्वज फडकत असतो. ध्वजावर सूर्य व चंद्र यांची प्रतीके कोरलेली आहेत. कृष्णाचा नातू वज्रनाथ याने हे मूळ मंदिर 'हरिगृह' (जेथे कृष्ण राहत असे) येथे बांधले. मंदिराला स्वर्गद्वार व मोक्षद्वार या नावाची दोन मुख्य द्वारे आहेत. एका प्रवेशद्वारातून जाऊन, भगवंताचे दर्शन घेऊन दुसऱ्या प्रवेशद्वारातून उतरून गेले की दर्शन पूर्ण झाले, असे म्हणतात.

द्वारकाधीश श्रीकृष्णाचे मुख्य मंदिर भुरकट रंगाच्या पाषाणाचे असून त्यावरील शिल्पकला उत्तम दर्जाची आहे. त्यावर गुप्त, पल्लव आणि चालुक्य काळातील वास्तुशैलीचा प्रभाव आहे. मंदिराचे गर्भगृह विशेष मोठे असून जवळ जवळ पुढच्या सभामंडपाएवढे असावे. हे मंदिर भव्य आणि उत्तुंग आहे. याचे जोते ९० X २० फूट आहे. मंदिराची उंची १५०' (सुमारे ५० मी.) असून शिखरावर सुवर्णकळस आहे. त्यावरील केशरी ध्वजाचे कापड ५२ गज लांबीचे आहे. ध्वज पुरविण्याचा मान परंपरेने एका विशिष्ट घराण्याकडे असून दरवर्षी मकरसंक्रांतीला तो बदलण्यात येतो. संपूर्ण मंदिर ७२ दगडी स्तंभांवर आधारलेले असून त्यात लाकूड किंवा लोखंडाचा वापर केलेला नाही. सभामंडप प्रशस्त असून तो ६० खांबांवर उभा आहे. मात्र हे खांब जवळ-जवळ असल्याने प्रशस्तपणा जाणवत नाही. सभामंडपात कृष्णजीवनातील कालियामर्दन, रासक्रीडा, गीताकथन इ. प्रसंग चितारलेले आहेत. हा सभामंडप आठ मजली उंच आहे.

चौथ्या मजल्यावर शक्तिमातेचे मंदिर आहे. पाचव्या मजल्यावर 'लाडव मंदिर' आहे. समुद्राने द्वारका गिळली तेव्हा हे 'लाडव मंदिर' पाण्यावर राहिले होते असे म्हणतात. या पाचव्या मजल्यावरून सबंध द्वारका नगरीचे व समुद्राचे विलोभनीय दृश्य दिसते. वरच्या मजल्यांवर ठरावीक वेळी प्रवेश दिला जातो. या जगत्मंदिराला चार द्वारे असून प्रदक्षिणामार्ग भिंतीच्या मधून जातो. गर्भद्वाराला चांदीचा दरवाजा असून आतील द्वारकाधीश श्रीकृष्णाचे दर्शन परमावधीचा आनंद देते.

ऐश्वर्यपूर्ण अशा द्वारकाधीशाच्या मूर्तीवर असलेले अलंकार, हिरेमाणकांनी जडवलेला मुकुट व मुखावरील दैवी हास्य भक्तांचे देहभान हरपून टाकते.

**मूर्ती –**

येथील रणछोडरायाची सुमारे मीटरभर उंचीची चतुर्भुज मूर्ती रजतपीठावर विराजमान आहे. ती गंडकीपाषाणाची काळ्या रंगाची असून विविध दागिने व रेशमी वस्त्रांनी बरीचशी झाकलेली आहे.



मूर्तीपुढे चांदीची प्रभावळ असून प्रखर दिव्यांच्या झोतात ती झळाळून जाते. तिचे ऐश्वर्य दोन डोळ्यांमध्ये सामावणेही अवघड जाते.

द्वारकाधीश कृष्णाचे वर्णन पुढील श्लोकात आले आहे–

'कस्तुरी तिलकं ललाटपटले
वक्षस्थले कौस्तुभम् ।
नासाग्रे वरमौक्तिकम् करतले
वेणु करे कंकणम् ॥
सर्वांगे हरिचन्दनं सुललितं,
कंठे च मुक्तावलि ।
गोपस्त्री परिवेष्टितो विजयते,
गोपाल चूडामणि ॥'

येथे श्रीकृष्णाला रणछोडजी म्हणतात. जरासंध आणि कालयवन यांना गुंगारा देऊन रण सोडून श्रीकृष्ण इथे आला म्हणून त्याला हे नाव कौतुकाने पडले. रणछोडजीचे सर्व पूजोपचार रामानुजाने आखून दिलेल्या पद्धतीप्रमाणे चालतात.

रामानुजाचार्य, कबीर, ज्ञानेश्वर महाराज, समर्थ रामदास, तुलसीदास, चैतन्य महाप्रभु, मीराबाई, नरसी मेहता अशा उच्च कोटीच्या संतांनी याचे दर्शन घेतले. सभामंडपाच्या एका कोपऱ्यात बलरामाची मूर्ती आहे. मत्स्य, वराह, नरसिंह, परशुराम, ब्रह्मा, सावित्री इ. देवदेवतांबरोबर बुद्धाचीही मूर्ती येथे आहे. द्वारकाधीशासमोर त्याची आई देवकी हिचे मंदिर आहे.

***पूजाविधी*** – द्वारकाधीशाची पहिली मंगलारती सकाळी ७ वाजता होते. त्यानंतर संपूर्ण शृंगार झाल्यावर साडेदहा वाजता शृंगार आरती व १२ वाजता 'राजभोग' होऊन साडेबारा वाजता मंदिर बंद होते. सायंकाळी पाच वाजता 'उत्थापन' होते आणि संध्याआरती सायंकाळी साडेसात वाजता होते. देवाची शयन आरती रात्री साडेआठ वाजता होऊन मंदिर रात्री साडेनऊ वाजता बंद होते. मंदिर दर्शनासाठी पहाटे ६ वाजल्यापासून खुले होते.

रणछोडजीच्या मंदिराच्या सभामंडपाच्या एका कोपऱ्यात बलरामाची मूर्ती आहे. वरच्या मजल्यावर अंबादेवी आहे. जवळच्याच एका वाड्यात कृष्णाच्या अष्ट नायिकांच्या मूर्ती आहेत. तिथे कुशेश्वर महादेवाचे एक मंदिरही आहे. कुशेश्वराचे दर्शन घेतले नाही तर ही यात्रा अपूर्ण समजली जाते. मंदिरातील तळघरात कुशेश्वर शिवलिंग आणि पार्वतीची मूर्ती आहे.

द्वारकेची रणछोडजीची मूळ मूर्ती बोडाणा भक्त डाकोरला घेऊन गेला. ती मूर्ती आता डाकोरमध्ये आहे. या घटनेनंतर सहा महिन्यानंतर दुसरी मूर्ती लाडवा गावात एका विहिरीत मिळाली. तीच मूर्ती आता मंदिरात विराजमान आहे.

या द्वारकाधीश मंदिराच्या दक्षिणेकडे भगवान त्रिविक्रमाचे मंदिर आहे. यात त्रिविक्रमाच्या व्यतिरिक्त राजा बली आणि सनकादी चार कुमारांच्या छोट्या मूर्ती आहेत. येथेच एका कोनाड्यात गरुड मूर्तीही आहे. द्वारकाधीशाच्या मंदिराशेजारीच देवकीचे मंदिर आहे. त्याच्याच पुढे वेणीमाधवचे मंदिर आहे.

मुख्य मंदिराच्या मागच्या बाजूला पूर्वेकडे राधिका, जांबवती, सत्यभामा, लक्ष्मी, सरस्वती आणि लक्ष्मी-नारायण यांच्या मूर्ती आहेत. येथे भक्तीचा अत्युत्कट आविष्कार पहायला मिळतो. सकाळी ६ ते १२.३० व सायं. ५ ते रात्री ९ या काळात दर्शनासाठी मंदिर खुले असते. हिंदू धर्मावर इतर धर्मातील लोकांचा पूर्ण विश्वास असल्याचे प्रतिज्ञापत्र भरून घेऊन मगच परधर्मियांना आत सोडले जाते. द्वारकाधीश मंदिराच्या बाहेरच्या बाजूस लक्ष्मीनारायण मंदिर आहे. त्याच्या जवळच वासुदेव मंदिर आहे. येथेच स्वर्णद्वार नावाचे एक नवीन स्थान आहे. त्यात कलापूर्ण अशी भीत्तिचित्रे आहेत.

**परिक्रमा –** द्वारकाधीश मंदिरापासून द्वारकापुरीच्या परिक्रमेला प्रारंभ होतो. मंदिरापासून पश्चिम गोमतीचा घाट, संगम घाट मग उत्तरेकडे चक्रतीर्थ, पुढे रत्नेश्वर महादेव, सिद्धनाथ महादेव, ज्ञानकुंड, जुनी रामवाडी, दामोदर कुंड मग एक मैल अंतरावर रुक्मिणी मंदिर, भागीरथी धारा तिथून परतताना कृकलास कुंड (कैलास कुंड), सूर्यनारायण मंदिर, भद्रकाली मंदिर, जय-विजय, निष्पाप कुंडाहून परत द्वारकाधीश मंदिरात येऊन परिक्रमा समाप्त केली जाते.

**परिसरातील मंदिरे –** अनिरुद्ध मंदिर, गीताभवन, गोमती, गोमती घाटावरील मंदिरे

**द्वारकेतील इतर मंदिरे –** निष्पाप सरोवर, प्रद्युम्न मंदिर, राम-लक्ष्मण किंवा सांब मंदिर, रुक्मिणी मंदिर, शारदा पीठ, सिद्धेश्वर महादेव मंदिर अशी द्वारकेतील इतर मंदिरे अवश्य पहावीत अशीच आहेत. यापैकी रुक्मिणी मंदिर व शारदापीठ ही महत्त्वाची.

**रुक्मिणी मंदिर –** द्वारकेपासून सुमारे अडीच कि. मी. अंतरावर खाडीच्या किनाऱ्यावर श्रीकृष्णाची पट्टराणी रुक्मिणी हिचे पुरातन मंदिर आहे. शिल्पकलेने नटलेले १२ व्या शतकातील हे मंदिर प्रेक्षणीय आहे. आधी प्रश्न असा पडतो की श्रीकृष्णाची पट्टराणी असूनही तिचे मंदिर पतीपासून एवढे दूर का?

रुक्मिणीला कृष्णाची पट्टराणी असल्यामुळे गर्व झालेला होता. त्यात ती दिसायलाही फार सुंदर होती. श्रीकृष्ण एकदा दुर्वास ऋषींना भोजनाचे निमंत्रण देण्यास गेला. ह्या वेळेस रुक्मिणीही बरोबर होती. दुर्वास ऋषी म्हणाले 'सध्या मी एका विशिष्ट धार्मिक कृत्यात व्यस्त आहे. शास्त्र नियमाप्रमाणे प्राण्यांनी ओढलेल्या वाहनात मी बसू शकत नाही. तेव्हा तुम्ही दोघे रथ ओढून नेणार असलात तर येईन आणि तोही अधेमधे न थांबता.' कृष्णाने ते मान्य केल्यावर, रुक्मिणीला मान्य करावे लागले. त्याप्रमाणे कृष्ण-रुक्मिणी दुर्वासाला रथात बसवून रथ ओढू लागली. कोमल अंगाची रुक्मिणी वाटेत थकली. तिला तहान लागली. ती थांबली. तेव्हा श्रीकृष्णाने पायाचा अंगठा जमिनीत दाबून पाणी काढले. ते पाणी ती प्यायली व पुन्हा दोघे रथ ओढू लागले. पण रथ थांबल्यामुळे आज्ञेचा भंग झाला म्हणून शीघ्रकोपी दुर्वास संतापले. त्यांनी तिला शिक्षा सुनावली. ते म्हणाले 'मला न विचारता तू रथ थांबविलास त्याचे प्रायश्चित्त म्हणून तू १२ वर्षे कृष्णापासून दूर रहा आणि तपश्चर्या कर.'

त्याप्रमाणे पुढे या स्थानी १२ वर्षे रुक्मिणी कृष्णापासून दूर राहिली व तिने येथे तप केले. म्हणून हे रुक्मिणीचे मंदिर द्वारकाधीशाच्या जगत्मंदिरापासून इतके दूर आहे. कठोर तपश्चरणामुळे रुक्मिणीचा अहंकार मावळला. शिवाय या प्रसंगामुळे इथे भगवंताच्या अंगठ्यापासून जमिनीतून गंगा प्रकट झाली म्हणून या स्थानाला 'चरणगंगा' स्थान म्हणून गौरवितात.



हे मंदिर ५२१९ वर्षांपूर्वीचे आहे. तेथे भारतीय पुरातत्त्व विभागाने 'संरक्षित ऐतिहासिक ठेवा' म्हणून फलक लावलेला असून त्यावर हे कोरीव मंदिर बारा किंवा तेराव्या शतकातील आहे असे नमूद केलेले आहे. भुरकट रंगाच्या पाषाणात एका चबुतऱ्यावर हे मंदिर उभारलेले आहे. गर्भगृह, घुमटाचे छत असलेले सभागृह व पुढे छोटा स्वागतकक्ष अशी याची रचना आहे. या शिल्पमंदिराला चहूबाजूंनी कोरीवकाम केलेले आहे. पण ऊन, खारा वारा, पाऊस इ. नैसर्गिक प्रक्रियेमुळे ते झिजत चालले आहे. मंदिर पश्चिमाभिमुख आहे. सुमारे ४ मी. लांबी-रुंदीच्या गाभाऱ्यात रुक्मिणीची अलंकारांनी नटलेली संगमरवरी मोहक मूर्ती आहे. ही मूर्ती मात्र नंतरच्या काळातील वाटते. तिचे आसन भद्रपीठ घाटाचे असून त्याची उंची एक मीटर व लांबी तीन, साडेतीन मीटर आहे. त्यावर विविध देवदेवतांची शिल्पे कोरलेली आहेत. प्रवेशद्वारात गणेशमूर्ती व दोन्ही बाजूला उपासक युगुले कोरलेली आहेत. प्रदक्षिणामार्गावर याच्या पूर्वेला नरसिंहाची सुंदर मूर्ती आहे; तर दक्षिणेस अष्टभुजा वैष्णवीची मूर्ती आहे. सभामंडपात सहा सुंदर तैलचित्रे लावलेली आहेत. सभामंडपासमोर चौथऱ्यावरच रुक्मिणीचा भाऊ रुक्मी व हनुमंत यांची छोटी मंदिरे आहेत.

**शारदा पीठ –** जगत्मंदिर किंवा द्वारकाधीश मंदिराजवळ आद्य शंकराचार्यांनी स्थापन केलेले शारदापीठ आहे. त्या मंदिरात श्री शंकराचार्यांनी पादुका स्थापन केलेल्या आहेत. बौद्ध मतवादी मंडनमिश्र व आद्य शंकराचार्य यांच्यातील धर्मचर्चा (वादस्पर्धा) इतिहासात प्रसिद्ध आहे. श्री शंकराचार्यांकडून हार पत्करल्यानंतर त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले होते. श्री शंकराचार्यांनी त्यांचे नवे नाव सुरेश्वराचार्य असे ठेवले आणि याच शारदापीठाचा पहिला अधिपती म्हणून त्यांची नेमणूक येथे केली होती. त्या ऐतिहासिक धर्मचर्चेत मंडनमिश्रांची पत्नी सरस्वती ही निर्णय देणारी न्यायदेवता होती. तिची विद्वत्ता आणि त्या तिघांचा एकमेकांवरील विश्वास या गोष्टी खरोखर अद्वितीय अशा आहेत. आठव्या शतकातील ही घटना आहे. मंडनमिश्र पराजित झाल्यानंतर, त्यांच्या पत्नीने पुन्हा शंकराचार्यांबरोबर वाद केला. जेव्हा तीही हरली तेव्हा तिने जलसमाधी घेतली. येथील शारदापीठात संस्कृत अकादमी, भारतीय संशोधन मंदिर, वेदभवन, कला महाविद्यालय, आयुर्वेदिक दवाखाना इ. विभाग आहेत.

**बेट द्वारका –** गुजरातमध्ये गोमती द्वारकेपासून ३० कि. मी. ईशान्येकडे (पूर्वोत्तर) कच्छच्या खाडीत एक छोटेसे द्वीप आहे. हे द्वीप म्हणजेच बेट असल्यामुळे याला 'बेट द्वारका' असे म्हटले जाते. अरबी समुद्राच्या मध्ये ओखा बंदरापासून जवळच हे बेट आहे. येथे पोहोचण्यासाठी २० मिनिटे बोटीने प्रवास करावा लागतो. १२ योजने जमीन श्रीकृष्णाने सागराकडून 'द्वारका' बांधण्यासाठी घेतली. त्यातील राहिलेला काही शेषभाग म्हणजे बेटद्वारका.

***परिक्रमा* –** बेट द्वारकेची परिक्रमा समुद्र

किनारी असलेल्या चरण- गोमतीपासून, नवग्रह चरण, पद्मतीर्थ, कल्पवृक्ष, कालिया नाग अशी येऊन शंख नारायणाचे दर्शन घेऊन पूर्ण होते.

***प्रवास*** – बेट द्वारकेला जाण्यासाठी ओखाहून बोटीनेच जावे लागते. ओखापर्यंत येण्यासाठी द्वारकेहून दर अर्ध्या तासाने बसेस आहेत.

***श्रीकृष्ण महाल*** – द्वीपात प्रवेश केल्यावर एका विशाल चौकात दोन मजल्याचे तीन आणि तीन मजल्याचे पाच महाल आहेत. दारातून आत गेल्यावर सरळ पूर्वेकडे गेल्यावर उजव्या बाजूला श्रीकृष्णाचा महाल आहे. श्रीकृष्ण महालाच्या पूर्वेच्या बाजूला प्रद्युम्नाचे मंदिर आहे. मध्ये रणछोडजीचे मंदिर आहे आणि त्याच्या दुसऱ्या बाजूला त्रिविक्रमाचे मंदिर आहे. या मंदिराच्या पुढील बाजूला पुरुषोत्तमाचे, देवकीचे आणि माधवाचेही मंदिर आहे. द्वारकाधीशाच्या मंदिरातील मूर्ती रेखीव आहेत. श्रीकृष्णाची येथील मूर्ती काळ्या पाषाणाची आणि सुमारे मीटरभर उंचीची आहे. तिला राजवस्त्रे व अलंकार चढवून खूपच आकर्षक केलेली आहे. हे मंदिर सकाळी सूर्योदयाला दर्शनासाठी खुले होऊन दुपारी बंद होते. संध्याकाळी ५ वाजता पुन्हा उघडते तेव्हा प्रचंड गर्दी असते. येथे बलराम-म्हणजे दाऊजीचेही मंदिर आहे. या बेट-द्वारकेत सुदाम्याने श्रीकृष्णाची भेट घेतली होती.

श्रीकृष्ण महालाच्या जवळच सत्यभामा आणि जाम्बवतीचे महाल आहेत. जवळ साक्षीगोपाळाचे मंदिर आहे तर उत्तरेकडे रुक्मिणी आणि राधेचे मंदिर आहे.

बेट द्वारकेत रणछोड सागर, रत्न तलाव, कचारी तलाव, शंख-तलाव अशी अनेक जलाशये आहेत तसेच मुरली मनोहर, हनुमान टेकडी, देवी मंदिर, नवग्रह मंदिर, नीलकंठ महादेव इत्यादी अनेक मंदिरे आहेत.

***शंख नारायण मंदिर*** – शंखोद्धार तीर्थाजवळ शंख नारायणाचे मंदिर आहे. श्रीकृष्ण महालापासून साधारण अर्धा मैल अंतरावर शंखोद्धार तीर्थ आहे. येथेच शंख सरोवर आणि शंख नारायणाचे हे मंदिर आहे. असे समजले जाते की येथेच श्रीकृष्णाने शंखासुराचा वध केला होता. शंख नारायणाची मूर्ती देवांच्या दशावतारामधील मूर्तींपैकी एक आहे. येथे वल्लभाचार्य महाप्रभूंची बैठक आहे.

***आसपासची तीर्थे*** – गोपीतलाव, नागेश्वर

**या द्वारकेची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आपण पुन्हा थोडक्यात पाहू–**

१) हे द्वारकाधीश मंदिर जगत मंदिराच्या रूपात स्थापित आहे, जो द्वारकेचा राजा कृष्ण त्याची पूजा येथे केली जाते.

२) ७२ स्तंभांचे ५ मजली मंदिर जवळजवळ २५०० वर्षांपूर्वीचे प्राचीन आहे. १५-१७ शताब्दीत याचा विस्तार केला गेला. अजूनही उत्तम स्थितीत आहे.

३) हे 'पुष्टिमार्गी' मंदिर आहे.

४) आदि शंकराचार्यांनी याचे दर्शन घेतले आणि याला चार धामांपैकी एक असे महत्त्व प्राप्त झाले.

५) मंदिरावरील ध्वजावर सूर्यचंद्र आहेत. हे जणू असे दर्शवितात की जोपर्यंत पृथ्वीवर चंद्रसूर्य आहेत तोपर्यंत कृष्ण राहणारच. हा ध्वज दिवसातून ५ वेळा बदलला जातो.

**असे हे अद्भुत कृष्णमंदिर, प्रत्येकाने एकदा तरी दर्शन घ्यावेच असे!**

* * *

# रामेश्वर



भारताचे दक्षिण दिशेचे पवित्र धाम

# ४. रामेश्वरम्

## (दक्षिणेचे धाम)

**भारतातील अत्यंत महत्त्वाचे व चार धामांपैकी दक्षिणेचे पवित्र आणि भव्यदिव्य तीर्थक्षेत्र!**

तमिळनाडूतील रामनाथपुरम् जिल्ह्यातील प्रसिद्ध क्षेत्रस्थान.

तमिळनाडू हे भारतातील मोठ्या राज्यांपैकी एक, तमिळ भाषिकांचे, उत्तमोत्तम मंदिरांचे राज्य आहे. भारतीय द्वीपकल्पाच्या दक्षिण टोकावर असलेले हे राज्य, याच्या पूर्वेला बंगालचा उपसागर, दक्षिणेला हिंदी महासागर असून पश्चिमेला केरळ आणि कर्नाटक राज्य तर उत्तरेला आन्ध्रप्रदेश आहे. सुंदर समुद्रकिनारे, नक्षीदार गोपुरांची भव्य मंदिरे, जीवनदायी नद्या, धबधबे, ऐतिहासिक स्थळे, कला, संस्कृती, परंपरा यांचे विलोभनीय दर्शन या राज्यात होते.

उत्तम आदरातिथ्य करणाऱ्या द्राविड संस्कृतीची परंपरा लाभलेले हे राज्य आहे. याला किमान २००० वर्षांची सांस्कृतिक परंपरा आहे. 'तमिळ' ही भारतातील जुनी, वाङ्मयीन भाषा आहे. हे राज्य मंदिरांचे असून येथील सहस्रावधी मंदिरांनी काळावर स्थापत्यशास्त्राचा, सत्कार्याचा ठसा उमटवला आहे.

या राज्याला १००० कि. मी. चा अप्रतिम समुद्रकिनारा लाभला आहे. अनेक संप्रदाय, परंपरेची तीर्थक्षेत्रे येथे आहेत. अनेक प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळेही आहेत. **चेन्नईजवळील तिरुक्कलुकुंडरम्, कांचीपुरम्, मदुराई जवळील पलानी आणि दक्षिण टोकाचे चार धामांपैकी एक रामेश्वरम् ही पवित्र तीर्थक्षेत्रे आहेत.**

'उत्पन्ना द्राविडे साऽहं' असे स्वत: भक्ती सांगते. भक्तीचा उगमच या भागात झाला.



तमिळनाडू राज्याच्या दक्षिण पूर्व भागात वसलेल्या या रामनाथपुरम् जिल्ह्याला भरपूर समुद्रकिनारा लाभला आहे.

रामनाथपुरम् जिल्ह्यात भारतातील चारधाम यात्रेतील रामेश्वर हे महत्त्वाचे तीर्थस्थान येते.

दक्षिण तमिळनाडूमध्ये वसलेल्या या जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण ऐतिहासिक महत्त्व असलेले रामनाथपुरम् हे शहर आहे.

रामनाथपुरम् शहर चेन्नईपासून ५२८ कि. मी. वर आहे. रामनाथपुरम्च्या अगदी जवळचा विमानतळ मदुराई येथे आहे.

रामनाथपुरम्पासून पूर्वेकडे ५० कि. मी. वर रामेश्वर या बेटावर हे पवित्र क्षेत्र आहे. भारतीय द्वीपकल्पाच्या दक्षिण दिशेला, आग्नेयेस अगदी टोकाला रामेश्वर हे बेट आहे. बेटाचा आकार

शंखासारखा असून हे बेट ५५ कि. मी. X १२ कि. मी. आहे. बेटावर जाण्यासाठी पंबनची खाडी ओलांडावी लागते. **हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आणि चार धामातील दक्षिणधाम आहे.** यात्रा म्हटली की लोकांच्या तोंडून 'काशी-रामेश्वर' ही जोड नावे बाहेर पडतात. यावरून या क्षेत्राच्या माहात्म्याची कल्पना येते.

**शिवलिंगाची कथा –** रामाची पदचिन्हे असल्यामुळे हे बेट पवित्र मानले जाते. रामेश्वर म्हणजे रामाने स्थापलेले शिवलिंग होय. रामचंद्राने येथे शिवलिंग का स्थापले, त्याची कथा अशी –

रामाने लंकेवर स्वारी करून रावणाचा वध केला व तो गंधमादन पर्वतावर येऊन काही काळ विसावला. अगस्त्यादी ऋषींनी त्याचे सहर्ष स्वागत केले. पण रामप्रभूचे मुखमंडल त्यांना खिन्न दिसले. रामाने लंकेवर विजय मिळवला खरा; पण त्या आनंदापेक्षा आपण रावणाला म्हणजेच एका ब्राह्मणाला मारले आणि ब्रह्महत्या या महापातकाचे धनी झालो, हे दु:खच रामाच्या अंतराला त्या वेळी जाळीत होते. ऋषींनी त्या दु:खाचे कारण विचारल्यावर रामाने आपली मनोव्यथा त्यांना निवेदन केली. ती ऐकून अगस्ती ऋषींनी ब्रह्महत्यानिरसनार्थ सागरतीरावर लिंगस्थापना करण्याचा रामाला आदेश दिला. त्यासाठी ज्येष्ठ शुद्ध दशमीचा मुहूर्तही काढून दिला. रामाने मग दिव्य लिंग आणण्यासाठी हनुमंताला कैलासावर पाठवले. हनुमंत कैलासावर गेला पण त्याला भगवान शंकराचे दर्शन होईना म्हणून त्याने तप आरंभले. कालांतराने शंकर प्रकट झाला आणि त्याने हनुमंताला आपले दिव्य लिंग दिले. पण विलंब झाल्यामुळे मारुतीला मुहूर्ताची वेळ साधता आली नाही. त्या वेळी सीतेने एक वालुकामय लिंग बनवून दिले. ऋषींच्या आदेशानुसार रामाने मग त्याचीच स्थापना केली. तेच हे रामेश्वरलिंग होय. स्थानिक लोक त्याला रामनाथलिंग असे म्हणतात.

हनुमंत परतल्यावर जेव्हा त्याला रामाने लिंग स्थापन केलेले दिसले तेव्हा त्याला फार दु:ख झाले. मग रामाने त्याला स्थापित लिंगाच्या जवळच त्याने आणलेल्या लिंगाची स्थापना करायला सांगितले. तसेच त्याने स्थापलेल्या लिंगाचे दर्शन घेतल्यावाचून यात्रिकांना रामेश्वरदर्शनाचे फल मिळणार नाही, असेही त्याला आश्वासन दिले. मग हनुमंताने कैलासावरून आणलेल्या दिव्य लिंगाची स्थापना केली. या लिंगाला 'काशी-विश्वनाथ किंवा हनुमदीश्वर' असे नाव आहे. रामाने आदेश दिला की प्रथम याची पूजा केली जावी.

रामेश्वरपासून २५ कि. मी. लांब या क्षेत्राचे नाव 'गन्धमादन' असे होते. परंतु कलियुगाच्या प्रारंभी गन्धमादन पर्वत पाताळात गेला. या ठिकाणी वारंवार देवता येत असत म्हणून या क्षेत्राला 'देवनगर' असेही नाव होते. महर्षी अगस्तींचा आश्रमही येथे होता. तीर्थयात्रा करत करत बलरामही या ठिकाणी आला होता. तसेच पांडवही या क्षेत्री आले होते. अनादि कालापासून हे क्षेत्र देव, ऋषी आणि महापुरुषांची श्रद्धाभूमी ठरलेले आहे.

या समुद्रकाठावरच्या रामलिंगेश्वराची देखरेख एका झोपडीतील एक साधू करीत असे. श्रीलंकेचा राजा 'पराक्रमबाहू' एकदा या ठिकाणाहून जात असताना या रामलिंगेश्वराचे दर्शन त्याला झाले. पुढे झोपडीतील या लिंगासाठी १२ व्या शतकांत तेथील साधूंनी एक छोटे मंदिर बांधले. हे मूळचे मंदिर गर्भगृह असे समजले जाते. तेव्हा पासून रामाचा नाथ म्हणजे ईश्वर तथा परमेश्वर म्हणून 'रामेश्वर' असे नाव प्रचलित झाले.

रामनाथपुरम्च्या 'सेतुपती राजांनी' या मंदिराच्या उभारणीत वेळोवेळी महत्त्वाचा हातभार लावला. विविध मंदिरे व गोपुरे यांची भर त्यामुळे पडली.

मदुरेचा राजा 'विश्वनाथ नायक' यानेही नंदी मंडप व मंदिराच्या इतर भागाच्या उभारणीचे काम केले. तसेच अनेक धनिक व धार्मिक व्यक्तींनीही भरघोसपणे आर्थिक सहाय्य केले. अशा प्रकारे आजच्या अत्युत्कृष्ट, भव्य मंदिराच्या उभारणीला शतकानुशतके लागली.

**रामेश्वर मंदिर –** रामेश्वर तीर्थक्षेत्री हे शिवमंदिर असून ते रामनाथस्वामी या नावानेही ओळखले जाते. शिवाची उपासना प्रत्यक्ष रामाने केली. हे मंदिर लोकप्रिय आहे. चैतन्य महाप्रभू येथे आले होते. समुद्रापासून थोडे पुढे गेल्यावर उजव्या बाजूला शहराच्या मध्यभागी हे मंदिर आहे.

रामेश्वरला पोहोचल्यावर यात्रेकरू प्रथम लक्ष्मणतीर्थात स्नान करतात. या तीर्थाच्या चोहोबाजूंना पायऱ्या असून, त्याच्या मध्यभागी एक मंडप आहे. येथे स्नान करून शुचिर्भूत होऊन मगच रामेश्वरच्या दर्शनास जातात.

***रचना* –** रामेश्वराचे मंदिर बेटाच्या पूर्व किनाऱ्यावर आहे. मंदिर द्राविड शिल्पपद्धतीने बांधलेले आहे. हे मंदिर प्रचंड असून, विस्तार आणि भव्यता या बाबतीत त्याच्याशी बरोबरी करणारे दुसरे मंदिर भारतात नाही. १५ एकरावर या मंदिराचा परिसर पसरलेला आहे. मंदिराचे आवार उत्तुंग भिंतींनी बंदिस्त आहे. या आवाराची पूर्व-पश्चिम लांबी ८२५ फूट आणि दक्षिणोत्तर रुंदी ६५७ फूट आहे. मंदिराच्या चारही बाजूंना चार गोपुरे आहेत. त्यांपैकी पूर्वद्वारावरील गोपुराला दहा मजले असून, ते १६० फूट उंच आहे. पश्चिम द्वारावरील गोपुराला सात मजले आहेत. चारही गोपुरांवर असंख्य मूर्ती कोरलेल्या आहेत. आतील मंदिरात तीन विस्तीर्ण दालने असून, ती भव्य स्तंभांच्या रांगांनी विभागलेली आहेत. या दालनांची उंची इतकी आहे की देवाच्या उत्सवमूर्तीच्या मिरवणुकीतील हत्ती अंबारीसह चालला तरी छताच्या हंड्या-झुंबरांना व दिव्यांना त्याचा धक्का लागत नाही. प्रत्येक दालनाची लांबी ४०० फूट असून, रुंदी १७ ते २१ फूट आहे. या दालनांच्या घडणीत वापरलेल्या अनेक शिळा चाळीस- चाळीस फूट लांबीच्या आहेत. भिंतींना लागून मूर्तींच्या पंक्ती बसवलेल्या आहेत. रामेश्वरमंदिरात एकूण २२ तीर्थे असून, त्यांपैकी ६ तीर्थे सर्वात बाहेरच्या तिसऱ्या दालनात आहेत.

या विशाल मंदिराची पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण लांबी इतकी विस्तृत आहे की ती तटाची भिंत पाहून मन आश्चर्यचकित होते. एकूण दक्षिणेकडील गोपुरांची मांडणी-धाटणी व शिल्प अगदी वेगळ्या प्रकारचे आढळते. तसेच उत्तर व दक्षिण दरवाजावरही उंच गोपुरे आहेत.

***प्रवेशद्वार* –** मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळच नुकताच म्हणजे १९७४ साली बांधलेला सेतुपती मंडप आहे. हा मंडप रामनाथपुरम् चा राजा सेतुपतीने ३ लाख रुपये खर्च करून बांधला व ७२ गावे पूजा-अर्चा करण्यासाठी बांधून दिली. सेतुपती राजाच्या पित्याचा एक पुतळाही या मंडपात आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ एक शिलालेख आहे. त्यावर स्वामी विवेकानंदानी १८९७ साली मंदिराला भेट दिल्यावर त्यावेळी प्रभावित होऊन काढलेले गौरवोद्गार येथे कोरले आहेत. यांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, 'I have great pleasure in gratifying to the politeness and ready service of the priests and supervisors of the temple.'

प्रथम या मंदिरात प्रवेश केल्यावर ऐटीत झुलणारा गजराज दिसतो.

***लिंग* –** मंदिराच्या तिसऱ्या दालनात रामेश्वरलिंग

आहे. त्याच्या समोरच मृण्मय व श्वेतवर्ण असा भला मोठा नंदी आहे. या नंदीची उंची १५ फूट, लांबी ८ फूट व रुंदी ९ फूट आहे. नंदीजवळच सुवर्णाच्या पत्र्याने मढवलेला गरुडस्तंभ आहे. पार्वतीचे मंदिर स्वतंत्र आहे. शिव व पार्वती या दोघांच्या उत्सवमूर्ती सुवर्णाच्या आहेत आणि उत्सवप्रसंगी त्यांना पाठीवर मिरवणारा नंदीही सुवर्णाचाच आहे. रामेश्वराच्या ज्योतिर्लिंगावर शेषाची फणा आहे.



**प्रदक्षिणा मार्ग –** या मंदिरातील सर्व प्रदक्षिणा मार्गाची लांबी १२३३ मीटर असून हे जगातील अद्वितीय मंदिर आहे असे मानतात. याच्या छतावर रंगीत नक्षीकाम आहे. प्रदक्षिणा मार्गाच्या दोन्ही बाजूला स्तंभांची रांग आहे ती नजरेत मावत नाही. यात एकूण १२१२ दगडी स्तंभ आहेत. हे स्तंभ अलौकिक शिल्पकृतीने सजले आहेत. इ. स. १७४० ते १७७० मध्ये हे बांधकाम झाले. पूर्वीच्या काळी वाहतुकीची विशेष साधने नसताना सुद्धा दुरून प्रचंड दगडी शिळा आणून त्या प्रमाण बद्ध आकारात घडवून, स्तंभ उभे करणे ही किती कठीण गोष्ट होती हे कळते. खरोखरच प्रगत द्राविड शिल्पकलेचा परमोत्कर्ष म्हणजे हे मंदिर! मंदिराचा दरवाजा व छत यासाठी लंकेहून १३ मीटर लांबीच्या अखंड शिला आणून वापरल्या आहेत.



**दैनंदिन कार्यक्रम –** पहाटे साडेचार-पाचच्या सुमारास पुजारी शंख आणि जयघंटा यांचा नाद करतो. त्याच वेळी गायन-वादन सुरू होते. त्यानंतर पुजारी, देवस्थानचे इतर अधिकारी व देवदासी महामंडपात येतात. रामेश्वराच्या पूजेच्या वेळी नैवेद्यासाठी जो भात वगैरे लागतो, त्यासाठी संबंधित अधिकारी आचाऱ्यांना शिधा काढून देतात. साडेपाचच्या सुमाराला पूजेची सर्व तयारी पूर्ण होते. नैवेद्याचा स्वयंपाकही तयार होतो. नंतर गर्भगृहाचा दरवाजा उघडतात. पुजारी गायक-वादकांसह पार्वतीच्या मंदिराकडे जातात व स्तोत्रे गाऊन शिवाला जागे करतात. मग शय्येवरील शिवाची सुवर्णमूर्ती पालखीत ठेवतात आणि वाद्यांच्या घोषात पालखी मिरवीत रामेश्वराच्या मंदिरात नेतात. त्यावेळी देवदासी पालखीपुढे नृत्य करते. सुवर्णमूर्ती अर्धमंडपात ठेवतात. मग पुजारी गर्भगृहात जाऊन लिंगावरील निर्माल्य बाजूला करतो आणि पूजेचा संकल्प करतो. एकजण मंदिरातील मोठा हंडा तिसऱ्या प्राकारात असलेल्या विहिरीच्या पाण्याने भरतो. या पाण्याने पुजारी लिंगाला स्नान घालतो. मग त्याला दोन वस्त्रे नेसवतो. मग तो लिंगाची पूजा करतो आणि हत्तीच्या पाठीवरून आणलेल्या अन्नाचा त्याला नैवेद्य दाखवतो. ही पूजा साधारण सहाच्या सुमारास संपते. या पूजेच्या वेळी गर्भगृहाच्या दारावर पडदा टाकलेला असतो.

दुसरी पूजा सकाळी सातच्या सुमारास सुरू होते. ही पूजा भाविकांना बघता येते. तिसरी पूजा सकाळी नऊ वाजता सुरू होते. या वेळी हत्तीच्या पाठीवरून पाण्याची घागर मिरवीत आणतात आणि त्या पाण्याने लिंगाला स्नान घालतात. नंतर

पंचामृताने व शहाळ्याच्या पाण्याने स्नान घालतात. या वेळी देवाला मुगाच्या खिचडीचा नैवेद्य दाखवतात. त्यानंतर लिंगाला चांदीचे डोळे जडवतात.

अशाच पूजा दुपारी, संध्याकाळी आणि रात्री होतात. रात्रीची पूजा झाल्यावर शिवाची सुवर्णाची मूर्ती पालखीतून पार्वतीच्या मंदिरात नेतात. या वेळी पुत्रकामना असणाऱ्या स्त्रिया शिवाला साष्टांग नमस्कार घालतात. कारण या दर्शनाने पुत्रप्राप्ती होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

या देवालयाच्या परिसरात सर्व तीर्थे वास करतात, असा समज आहे. प्रत्येक तीर्थाची पुष्करणी आहे. राम, सीता आणि लक्ष्मण ही कुंडे देवालयाच्या बाहेर आहेत. याच कुंडांवर यात्रेकरू स्नान, श्राद्धविधी वगैरे धार्मिक कृत्ये करतात.

येथे कोणालाही शिवलिंगाची पूजा करता येत नाही. जे काही देवाला वाहणे असेल, ते पुजाऱ्याजवळ द्यावे लागते. गाभारा आणि सभामंडप एकाच पातळीत आहेत. शिवलिंग गाभाऱ्यात उच्च स्थानी आहे. त्यामुळे दुरूनही त्याचे दर्शन होते.

**मंदिर पहाटे चार ते दुपारी एक आणि दुपारी तीन ते रात्री नऊ वाजेपर्यंत दर्शनार्थ उघडे असते.** गाभाऱ्यापर्यंत अहिंदूंना प्रवेश नाही पण मंदिराच्या परिसरात ते हिंडू शकतात. रामनाथ लिंगाचे दर्शन घेण्यासाठी अर्धा तास नेहमीच्या दिवशी रांगेत उभे राहावे लागते.

### आवारातील इतर मंदिरे –

**हे मंदिर चक्रव्यूहाप्रमाणे रचलेले आहे,** बनविले आहे. याची रचना मोठी विलक्षण आहे. रामेश्वराव्यतिरिक्त येथे पार्वती, षडानन, गणपती व काशी विश्वेश्वर यांची स्वतंत्र मंदिरे आहेत. उपदैवते तर असंख्य असून, त्यात नंदिकेश्वर, रामपंचायतन, नवग्रह, विशालाक्षी, अन्नपूर्णा व सप्त मातृका यांचीही स्वतंत्र मंदिरे आहेत.

रामेश्वर मंदिराच्या बाहेरच्या प्राकाराचे बाहेर एका सभामंडपांत उजव्या बाजूस एक छोटेसे मारुतीचे मंदिर आहे. पूर्वेकडून महाद्वारातून मंदिरांत शिरतांना प्रथम मारुतीचे म्हणजेच रामभक्ताचे दर्शन घ्यावे लागते. प्रवेशद्वाराच्या गोपुरातून आत शिरले म्हणजे 'रामेश्वर' देवालयाची प्रचंडता व भव्यता व स्वच्छता ध्यानांत येते. व मन थक्क होते. आतील मोठ मोठे नक्षीदार उंच उंच खांब व त्या वरील एकसंध दगडी फरशीचे छप्पर भव्य व सुंदर दिसते. सर्व दालनांचे तक्त पोशीचे दगड १२ मी. रुंदीचे, १२ मी. लांबीचे व १.५ मी. उंचीचे आहेत. या देवस्थानाचे विशेष म्हणजे सर्व मंदिर दगडी आहे. यात लाकडाचा अंशही नाही. रामेश्वर बेटात दगड मुळीच नाहीत जिकडे तिकडे बारीक पांढरी वाळू सर्वत्र आढळते. या पवित्र मंदिरासाठी दुसरी कडून, लांबून लांबून अजस्त्र काळे पत्थर आणून त्यापासून तीन तीन पुरुष उंचीचे खांब, फरशा, तक्ते इत्यादी बनवून त्यावर नक्षीकाम करून हे मंदिर पंबन बेटाच्या ईशान्येस साधारण उंचवट्यावर बांधून काढले आहे. मंदिराचा गाभारा इतर काही कामासाठी कोलंबोहून आणलेल्या दगडांनी बांधला आहे. इतके मोठे आणि भव्य मंदिर साऱ्या भारतात दुसरे नाही. हे मंदिर मदुराई येथील भव्य मीनाक्षी मंदिरापेक्षाही मोठे आहे. या मंदिरातील आवारांत निरनिराळ्या ठिकाणी एकूण २४ पवित्र जलांचे विहिरी तथा कुंड आहेत. बहुतेक कुंडांचे पाणी गोड व मधुर आहे. फक्त ३-४ कुंडांचे पाणी खारट आहे. मंदिरात पार्वतीच्या मंदिराचा भाग निराळा आहे. शिवाय काशी विश्वेश्वर, वीरभद्र, गणपती, मारुती, नवग्रह इत्यादी कितीतरी मंदिरे आहेत. ही सारी मंदिरे रामेश्वर मंदिराच्या आवारातच आहे. प्राकारात पार्वती, विष्णु, हनुमान, राम, लक्ष्मण, सीता यांची उपमंदिरे आहेत. रामेश्वराचे लिंग कमरे इतके उंच आहे. पिंड गंडकी शिळेची असून, लिंग मात्र वाळूचे असून त्याच्यापुढे २ पुरुष उंचीचा चुना व वाळू यांनी बनविलेला नंदी व त्याचे मागे उंच पितळी गरुड स्तंभ आहे.

या मंदिराची उभारणी प्रामुख्याने रामनादच्या सेतुपती राजघराण्याने केलेली आहे. सांप्रतचे मंदिर इ. स. १४१४ मध्ये उदयन सेतुपतीने लंकेचा परराजशेखर याच्या साहाय्याने उभारले आणि पुढे तीन साडेतीनशे वर्षे सेतुपती घराण्यातील राजपुरुषांनीच त्याचा विस्तार केला. देवाची पहिली पूजा याच घराण्याची असते. येथील उपाध्ये महाराष्ट्रीय ब्राह्मण आहेत. त्यांच्या पूजेच्या पाळ्या ठरलेल्या आहेत.

येथे बाराही महिने यात्रिकांची गर्दी असते. भाविक यात्रेकरू येथील चोवीस पवित्र तीर्थांत क्रमाने स्नान करतात आणि रामेश्वराला काशीहून आणलेल्या गंगाजलाने अभिषेक करतात. तसेच, रामेश्वरापासून १९.२ कि. मी. दूर असलेल्या सेतुबंधावरील सेतू (वाळू) आणून व तो सेतू रामेश्वर मंदिरातील सेतुमाधवाजवळ ठेवून त्याची पूजा करतात. हा सेतू प्रयाग येथील त्रिवेणीसंगमात विधिपूर्वक विसर्जित केल्यानंतरच या यात्रेची खरी सांगता होते, अशी श्रद्धा आहे. या श्रद्धेमुळेच हजारो वर्षे आसेतुहिमाचल भारतवर्षाचे एकात्म्य अनंत आघात होऊनही टिकून राहिले आहे.

***उत्सव*** – येथील मंदिरात साप्ताहिक, मासिक व वार्षिक असे अनेक उत्सव होत असतात. प्रत्येक शुक्रवारी रात्री पार्वतीच्या पालखीची मिरवणूक निघते. पालखीवर चार दिशांना असलेले चार लाकडी गरुड पार्वतीवर फुले उधळतात व तिला चार माळा अर्पण करतात. महाशिवरात्रीला येथे फार मोठा उत्सव होतो. हा फेब्रुवारी- मार्च महिन्यात दहा दिवस चालतो. दहा दिवस रोज निरनिराळ्या वाहनातून उत्सवमूर्तीची मिरवणूक निघते. ज्येष्ठात रामलिंगप्रतिष्ठा होते. आषाढात भरणी नक्षत्रावर रामेश्वराचा दहा दिवस उत्सव होतो. श्रावण शुद्ध प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत पार्वतीच्या विवाहाचा सोहळा चालतो.

तेव्हाच तिरुकल्याणम् उत्सव असतो. तसेच वैशाखात वसंतोत्सव व आश्विनात नवरात्राचा उत्सव होतो. कार्तिक शुद्ध षष्ठीला कार्तिकस्वामीचा वाढदिवस होतो. दुसऱ्या दिवशी त्याचा ब्रह्मदेवाच्या कन्या वळ्ळी व देवसेना यांच्याशी विवाह होतो. मोठ्या उत्सवांसाठी लांबलांबचे यात्रेकरू इथे येतात. त्यातल्या त्यात आदि अमावास्या या आषाढातील उत्सवाला इथे फार मोठी यात्रा भरते.

**परिसरातील पवित्र स्थळे –**

अग्नितीर्थ, आदि जगन्नाथ मंदिर, एकान्त राम मंदिर, कोदण्डराम स्वामी मंदिर, कोदी तीर्थ, गन्धमादन, जटातीर्थ, दर्भशयन मंदिर, नवनायकी अम्मन्, पापहारेश्वर मंदिर, बिभीषण तीर्थ, भैरव तीर्थ, रामझरोका, रामतीर्थ.

**रामेश्वर मंदिरातील चोवीस तीर्थे –** रामेश्वराच्या दर्शना अगोदर यात्री या चोवीस तीर्थांत स्नान करतात. मंदिराच्या आतील बाजूला २२ तीर्थे आहेत. आणि समुद्राजवळील अग्नितीर्थ आणि त्या जवळील अगस्त्यतीर्थ अशी मिळून एकूण चोवीस तीर्थ होतात. यातील अगस्त्यतीर्थ सर्वश्रेष्ठ मानले जाते. अग्नितीर्थात स्नान केल्याने पापापासून मुक्ती मिळते. रामेश्वर मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी येथे स्नान करण्याची परंपरा आहे. बहुतेक भाविक पहिल्या दिवशी समुद्रस्नान करतात. या तीर्थातील माधवतीर्थ आणि शिवतीर्थ ही सरोवरे आहेत. तर महालक्ष्मीतीर्थ आणि अगस्त्यतीर्थ या विहिरी आहेत. चोवीस तीर्थे पुढील प्रमाणे– माधवतीर्थ, गवयतीर्थ, गवाक्षतीर्थ, नलतीर्थ, नीलतीर्थ, गन्धमादनतीर्थ, ब्रह्महत्याविमोचन तीर्थ, गङ्गातीर्थ, यमुनातीर्थ, गयतीर्थ, सूर्यतीर्थ, चंद्रतीर्थ, शंखतीर्थ, चक्रतीर्थ, अमृतवापी तीर्थ, शिवतीर्थ, सरस्वतीतीर्थ, सावित्रीतीर्थ, गायत्रीतीर्थ, महालक्ष्मीतीर्थ, अग्नितीर्थ, अगस्त्यतीर्थ, सर्वतीर्थ, कोटितीर्थ. स्कंदपुराणात या सर्व तीर्थांच्या उत्पत्ती कथा आहेत. या तीर्थातील जलाने केलेल्या स्नान-मार्जनाचे खूप माहात्म्य आहे.

***लक्ष्मणतीर्थ –*** रामेश्वरला पोचल्यावर यात्रेकरू प्रथम लक्ष्मणतीर्थात स्नान करतात. या तीर्थाच्या चोहोबाजूंना पायऱ्या असून त्याच्या मध्यभागी एक मंडप आहे.

रामेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर पश्चिमेकडे १.६ कि. मी. अंतरावर हे तीर्थ आहे. लंकेहून परतताना श्रीराम जेव्हा इथे आला तेव्हा त्याने इथेच पहिल्यांदा स्नान केले.

लक्ष्मण तीर्थाच्या उत्तरेकडे एक मंडप असून त्याला लागून जवळच लक्ष्मणेश्वर शिवमंदिर आहे. असे म्हणतात की लक्ष्मणेश्वराची स्थापना लक्ष्मणाने केली होती. भाविक यात्री येथे तर्पण-श्राद्धादी कर्मे करतात.

***समुद्रकिनारा –*** रामेश्वर मंदिरासमोरच्या रस्त्याने थोडे अंतर गेल्यावर लगेचच समुद्र किनारा लागतो. येथे अथांग समुद्र शांत वाटतो. रामाच्या पवित्र चरणकमलाने पुनीत झालेल्या या तीर्थक्षेत्री सूर्यास्त खरोखरच रमणीय व आल्हाददायक वाटतो.

या स्थानाला भेट देऊन कृतकृत्य होणारे प्रवासी, प्रांत वेगळा, भाषा वेगळी, गावे, जाती, धर्म, सारे काही वेगळे, स्त्री असो वा पुरुष असो, तरुण असो वा वृद्ध, मुलगा असो वा मुलगी असो प्रत्येक जण समुद्र स्नान करण्यांत गुंग असतो. विविधतेत एकात्मतेचा साक्षात्कार येथेही होतो.

रामेश्वरचे तीर्थक्षेत्र व तसेच भारतातील इतर तीर्थक्षेत्रे भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक आहे.

सेतुबंध येथे मूळ सेतू रामाने बांधला. येथे धर्माने तप करून शिव वाहन प्राप्त करून घेतले. येथे धर्माच्याद्वारे स्थापित 'पुष्करिणी' आहे. महर्षि 'गालवां'ची ही तपोभूमी आहे. येथे समुद्र फार उथळ आहे. येथून थोड्या अंतरावर 'महिषमर्दिनी' देवीचे देऊळ आहे.

***साक्षी विनायक –*** रामेश्वर-पंबन रस्त्यावर रामेश्वरपासून साधारणपणे दीड मैल अंतरावर वनविनायक मंदिर आहे. मंदिरात साक्षी विनायकाची मूर्ती आहे. रामेश्वर यात्रा करून जाताना याचे दर्शन घेण्याची पद्धत आहे.

***सीताकुण्ड –*** रामेश्वरपासून ८ कि. मी. दूर समुद्रकिनारी हे तीर्थ आहे. येथील पाणी गोड आहे. असे म्हणतात की सीता पूर्वजन्मी वेदवती होती आणि तिने याच ठिकाणी तपस्या केली होती. हे स्थान तंकच्चिमठम् स्थानकापासून उत्तरेकडे १.६ कि. मी. वर आहे.

लक्ष्मण कुंडापासून रामेश्वरला जाताना सीताकुण्ड लागते. या कुंडाला 'विल्लुरनी' असेही म्हणतात. सीतेला तहान लागल्यावर रामाने भूमीत एक बाण सोडला. तेव्हा भूमीत पडलेल्या छिद्रातून पाण्याचा झरा सुरू झाला. हे पाहून सीतादेवीला परमानंद झाला. तेच हे सीतादेवीचे पवित्र कुंड आहे. या शिवाय वेताळवर्ध तीर्थ, पापविनाशिनी तीर्थ ही दोन्ही तीर्थे 'मंडपम्' या स्थानकापाशी आहेत.

हे ठिकाण रामेश्वर येथे एका नाथ रामस्वामीच्या देवळाजवळ आहे. या ठिकाणी 'लक्ष्मी' सदा वास करते असे म्हणतात.

हे ठिकाण 'तिरुपलानी' नावाच्या गावात असून तेथे जाण्यास मोटारी आहेत. समुद्र ओलांडून लंकेस जाण्यापूर्वी रामाच्या सैन्याच्या तळ प्रथम 'तिरुपलानी' येथेच पडला होता. रावणाचा भाऊ बिभीषण याने रामाची भेट प्रथम येथेच घेतली होती. राक्षसी वृत्तीचा रावण असल्यामुळे व त्याचा भाऊ बिभीषण हा सत्त्वगुणी, सज्जन असल्यामुळे तो सत्त्वगुणी रामास आपण होऊन भेटावयास आला व पुढे त्याने रावणाविरुद्ध, भावाविरुद्ध रामाला मदत केली. तसेच याच ठिकाणी गालव ऋषींनी घोर तपश्चर्या केली होती, त्यामुळे विष्णूने त्याला मुक्त केले.

***सीतातीर्थ –*** लक्ष्मण तीर्थाहून स्नान करून परतताना रस्त्याच्या डाव्या बाजूला सीतातीर्थ नावाचे कुंड आहे. येथे आचमन-मार्जन केले जाते. येथे जवळच पञ्चमुखी हनुमानाचे मंदिर आहे. त्याच्या समोरच्याच मंदिरात राम-लक्ष्मण-सीतेच्या मूर्ती आहेत.

***सेतुमाधव –*** लक्ष्मी व भगवान विष्णु, राजाची कन्या व सेतुमाधवाचा अवतार घेऊन, सेतुबंधावर एकमेकांवर प्रेम करीत व गुप्तपणे वास करीत. विष्णु तथा सेतुमाधवला राजाने बंदीत ठेवले. परंतु त्याच्या मुलीची स्थिती पाहिल्यावर त्याला प्रेमाचे संबंध समजले. तेव्हा राजाने सेतुमाधवला मुक्त करून सेतुमाधवचे मंदिर बांधले.

महोदधी म्हणजे हिंदी महासागर शांत आहे. बंगालचा उपसागर म्हणजे रत्नाकर म्हणजेच गंगासागर आणि सिंधुसागर तथा अरबी समुद्र उच्छृंखल आहे. म्हणून रामेश्वर येथे ब्राह्मण व क्षत्रिय या गुणांचा संगम आहे. असे सारे मानतात.

***स्फटिकलिंङ्ग –*** रामेश्वराचे एक सुंदर स्फटिकलिंग आहे. **त्याचे दर्शन प्रात:काली ४.३० ते ५ या वेळातच करायचे असते.** भाविक यात्री या लिङ्गाचे दर्शन घेऊन मग स्नानादी कृत्य करतात. हे स्फटिकलिङ्ग अत्यंत स्वच्छ आणि पारदर्शी आहे. मंदिर उघडल्यावर प्रथम या लिङ्गाची पूजा होते. मूर्तीवर दुधाचा अभिषेक करताना स्पष्ट दर्शन होते.

**रामेश्वरम्ची काही प्रमुख वैशिष्ट्ये अशी–**

१) रामेश्वर सेतू खूप प्राचीन आहे. परंतु मंदिर ८०० वर्षांपूर्वीचे व भव्य आहे.

२) रामेश्वर मंदिराचा सरळ लांबलचक रस्ता विश्वातील सर्वात मोठा रस्ता आहे. हा उत्तर-दक्षिण १९७ मीटर व पूर्व-पश्चिम १३३ मीटर आहे. याच्या बाहेरील तटाची उंची ९ मीटर तर रुंदी ६ मीटर आहे. प्रवेशद्वाराचे गोपूर ३८.४ मीटर उंच आहे. मंदिराचा परिसर ९ एकर पसरलेला आहे.

३) या मंदिराच्या प्राकारात शेकडो खांब आहेत. जे एकसारखे वाटतात पण जवळ जाऊन बारकाईने पाहिले तर प्रत्येक खांबावरील वेलबुट्टी वेगळी आहे हे लक्षात येते.

४) या मंदिराची परिक्रमा करायला तीन प्राकार आहेत. यांची लांबी चारशे फूटापेक्षा अधिक आहे. दोन्ही बाजूला ५ फूट उंचीच्या देवड्या आहेत आणि या चबुतऱ्यांवर मोठ्या खांबांच्या लांबच लांब ओळी आहेत. ही अद्भुत कारागिरी पाहून विदेशी पर्यटकसुद्धा स्तिमित होतात.



५) रामनाथ मंदिराजवळ कोठेही पर्वत नाही. मंदिरासाठी काही लाख टन दगड लागले ते समुद्रातून नावांमधून लंकेतून आणले गेले.

६) येथून धनुष्कोटी तीर्थापासून श्रीरामांनी बांधलेल्या लंकेपर्यंतच्या सेतूच्या खुणा आजही नासाने काढलेल्या चित्रात स्पष्ट दिसतात.

७) रामेश्वरपासून दीड किलोमीटरवर असलेल्या गंधमादन पर्वतावरून हनुमंताने लंकेकडे जाण्यासाठी उड्डाण केले होते.

८) रामेश्वरम्ची यात्रा करणाऱ्या प्रत्येकाच्या मनात प्रत्येक ठिकाणी रामकथा जागृत होते. श्रीरामांनी स्थापित केलेल्या त्या शिवलिंगासमोर कृतार्थतेने हात जोडले जातात.

* * *

## हे पाठ कराच!

# ।। श्रीसूक्तम् ।।

*(अधिक महिना हा पुरुषोत्तम मास. या कालावधीमध्ये आदित्य परिवारातील सर्वांनी एकत्रितपणे, एका वेळी विष्णुसहस्त्रनाम पठण केले आणि नंतर लगेच आलेल्या नवरात्रात व पुढे कोजागिरी पौर्णिमेपर्यंत श्रीसूक्त पठण केले. श्रीसूक्त अर्थासहित सर्वांसाठी)*

**श्रीगणेशाय नमः । श्रीमहालक्ष्म्यै नमः ।**

**अथ ध्यानम् ।**

**अरुणकमलसंस्था तद्रजःपुञ्जवर्णा ।**
**करकमलधृतेष्टाभीतियुग्माम्बुजाता ।**
**मणिमुकुटविचित्रालङ्कृतिः पद्ममाला ।**
**भवतु भुवनमाता संततं श्रीः श्रियै नः ।।**

उगवतीच्या लाल रंगाप्रमाणे असलेल्या कमळामधे बसलेली, त्यातील रजःकणांप्रमाणे वर्ण असलेली, हातात कमळ असलेली, इष्ट आणि धैर्य देणारी, मणिमुकुट आणि वेगवेगळे अलंकार ल्यालेली, पद्ममाला धारण केलेली अशी भुवनाची माता लक्ष्मी आम्हाला सतत ऐश्वर्य देवो.

**हरिः ॐ हिरण्यवर्णां हरिणीं**
**सुवर्णरजतस्त्रजाम् ।**
**चन्द्रां हिरण्मयीं लक्ष्मीं**
**जातवेदो म आ वह ।।१।।**

हे अग्ने (जातवेद), सोन्यासमान वर्ण असणाऱ्या, सर्व पातकांचे हरण करणाऱ्या (हरिणीसमान सुंदर, चपळ असणाऱ्या), सोन्या-चांदीच्या माळा धारण करणाऱ्या, चंद्राप्रमाणे (शीतल) असलेल्या सुवर्णमय लक्ष्मीला माझ्यासाठी आवाहन कर. (अग्नी हा मानव व देव यांच्यामधील वाहक दुवा आहे. म्हणून त्याच्या जवळ ही प्रार्थना!

**तां म आ वह जातवेदो**
**लक्ष्मीमनपगामिनीम् ।**
**यस्यां हिरण्यं विन्देयं**
**गामश्वं पुरुषानहम् ।।२।।**

हे अग्ने, त्या कधीही दूर न जाणाऱ्या (अविनाशी) लक्ष्मीला माझ्यासाठी आवाहन कर, जिच्याकडून मला धन, गाय, घोडा तसेच पुरुष (नातलग, मित्र) मिळावेत.

**अश्वपूर्वां रथमध्यां हस्तिनादप्रमोदिनीम् ।**
**श्रियं देवीमुपह्वये श्रीर्मा**
**देवी जुषताम् ।।३।।**

जिच्या मिरवणुकीत सुरुवातीला घोडे, मध्यभागी रथ आहेत (जी रथात बसलेली आहे), जेथे हत्ती नाद करत आहेत, अशा लक्ष्मीला मी आमंत्रित करतो. ती देवी मजवर कृपा करो.

**कां सोस्मितां हिरण्यप्राकारामार्द्रां**
**ज्वलन्तीं तृप्तां तर्पयन्तीम् ।**
**पद्मेस्थितां पद्मवर्णां**
**तामिहोपह्वये श्रियम् ।।४।।**

जिचे हास्य चमकदार आहे, जी सुवर्णमखरात विराजमान आहे, जी मायाळू आहे, तेजस्वी आहे, स्वतः तृप्त असून इतरांनाही तृप्त करते, जी कमळात स्थानापन्न झाली असून तिची कांती कमळाप्रमाणे आहे, अशा लक्ष्मीला मी येथे आमंत्रित करतो. ती देवी मजवर कृपा करो.

**चन्द्रां प्रभासां यशसा ज्वलन्तीं**
**श्रियं लोके देवजुष्टामुदाराम् ।**
**तां पद्मिनीमीं शरणमहं प्रपद्ये अलक्ष्मीर्मे**
**नश्यातां त्वां वृणे ।।५।।**

चंद्रासमान आभा असलेली, जिचे यश देदीप्यमान आहे. तिन्ही लोकात देव जिची पूजा करतात, जी उदार आहे, अशा या लक्ष्मीला मी शरण जातो. माझे दारिद्र्य नष्ट होवो अशी तुला प्रार्थना करतो.

**आदित्यवर्णे तपसोऽधि जातो**
**वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः ।**
**तस्य फलानि तपसा नुदन्तु मायान्तरायाश्च**
**बाह्या अलक्ष्मीः ।।६।।**

हे सूर्याप्रमाणे कांती असलेल्या देवी, तुझ्या तपश्चर्येतून निर्माण झाला बेलाचा वृक्ष. त्याची फळे तपाच्या बलाने (माझ्या) अंतरीचे अज्ञान व बाहेरचे दैन्य दूर करोत. (बेलाची पाने आणि फळे अत्यंत औषधी व शंकराचा वास असलेली आहेत.)

**उपैतु मां देवसखः कीर्तिश्च मणिना सह ।**
**प्रादुर्भूतोऽस्मि राष्ट्रेऽस्मिन्**
**कीर्तिमृद्धिं ददातु मे ।।७।।**

देवांचा मित्र (कुबेर) कीर्ती आणि जडजवाहिर यांचेसह मजकडे येवो. मी या देशात उत्पन्न झालो आहे. या राष्ट्रासाठी तो मला कीर्ती आणि उत्कर्ष देवो.

**क्षुत्पिपासामलां ज्येष्ठामलक्ष्मीं नाशयाम्यहम् ।**
**अभूतिमसमृद्धिं च सर्वां निर्णुद मे गृहात् ।।८।।**

भूक, तहान, अस्वच्छता (रूपी) थोरल्या अलक्ष्मीचा मी नाश करतो. संकटे, अपयश या सर्वांना माझ्या घरातून दूर हाकलून दे.

**गन्धद्वारां दुराधर्षां नित्यपुष्टां करीषिणीम् ।**
**ईश्वरीं सर्वभूतानां तामिहोपह्वये श्रियम् ।।९।।**

जी सुवासांचे प्रवेशद्वार आहे, जिच्यावर आक्रमण दुरापास्त आहे, जेथे नित्य समृद्धी नांदते आणि जी संपन्नतेचे अवशेष सोडते, अशा त्या सर्व प्राणिमात्रांच्या स्वामिनी लक्ष्मीला मी येथे आमंत्रित करतो.

**मनसः काममाकूतिं वाचः**
**सत्यमशीमहि ।**
**पशूनां रूपमन्नस्य मयि श्रीः**
**श्रयतां यशः ।।१०।।**

(माझ्या) मनीच्या इच्छा-आकांक्षांची पूर्ती, वाणीचा सच्चेपणा, पशू, सुंदर रूप आणि अन्न जिच्यामुळे मिळते, ती लक्ष्मी मला यश देवो.

**कर्दमेन प्रजाभूता मयि सम्भव कर्दम ।**
**श्रियं वासय मे कुले मातरं**
**पद्ममालिनीम् ।।११।।**

जनांसाठी कर्दम ऋषी हाच आधारभूत आहे. हे कर्दमा (लक्ष्मीचा पुत्र), तू मजबरोबर रहा. माता लक्ष्मीला माझ्या कुळात स्थापित कर.

**आपः सृजन्तु स्निग्धानि**
**चिक्लीत वस मे गृहे ।**
**नि च देवीं मातरं श्रियं**
**वासय मे कुले ।।१२।।**

जलातून स्निग्धता निर्माण होऊ दे. हे चिक्लीत ऋषी! माझ्या घरात निवास कर. (आणि तुझ्याबरोबर) माता लक्ष्मीलाही माझ्या कुलात स्थापन कर.

**आर्द्रां पुष्करिणीं पुष्टिं**
**पिङ्गलां पद्ममालिनीम् ।**
**चन्द्रां हिरण्मयीं लक्ष्मीं**
**जातवेदो म आवह ।।१३।।**

हे अग्ने, कमळांच्या तलावाप्रमाणे रसपूर्ण असणाऱ्या, (जनांचे) पोषण करणाऱ्या, सोनेरी वर्णाच्या, कमळांचा हार घातलेल्या, चंद्रासारख्या (शीतल), सुवर्णमय लक्ष्मीला तू मजसाठी आवाहन कर.

**आर्द्रां यः करिणीं यष्टिं सुवर्णां हेममालिनीम् ।**
**सूर्यां हिरण्मयीं लक्ष्मीं**
**जातवेदो म आवह ।।१४।।**

हे अग्ने, जी आर्द्र (जगताच्या निर्माणाला) आधार देणारी आहे, कमळांचा हार घातलेल्या सूर्याप्रमाणे तेजस्वी आहे, अशा सुवर्णमय लक्ष्मीला तू मजसाठी आवाहन कर.

**तां म आवह जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम् ।**
**यस्यां हिरण्यं प्रभूतं गावो दास्योऽश्वान्**
**विन्देयं पुरुषानहम् ।।१५।।**

हे अग्ने, दूर न जाणाऱ्या (मजसवे कायम निवास करणाऱ्या), जिच्यात (जिच्यामुळे) मला भरपूर धन, गायी, सेवक, घोडे मिळतील अशा लक्ष्मीला तू मजसाठी आवाहन कर.

**यः शुचिः प्रयतो भूत्वा जुहुयादाज्यमन्वहम् ।**
**सूक्तं पञ्चदशर्चं च श्रीकामः**
**सततं जपेत् ।।१६।।**

जो (शरीराने) पवित्र व भक्तीने परिपूर्ण असलेला (साधक) दररोज तुपाने हवन करील, (त्याचे मनोरथ पूर्ण होतील.) लक्ष्मीची आकांक्षा असणाऱ्याने या सूक्ताची पंधरा कडवी नित्य पठण करावीत.

**पद्मानने पद्मऊरू पद्माक्षि पद्मसम्भवे ।**
**तन्मे भजसि पद्माक्षि येन**
**सौख्यं लभाम्यहम् ।।१७।।**

कमळाप्रमाणे (सुहास्य) मुख, कोमल मांड्या, (विशाल) नेत्र असलेल्या, कमळात जन्मलेल्या पद्माक्षी, तू माझा स्वीकार कर, जेणेकरून मला सुख मिळेल.

**पद्मानने पद्मिनि पद्मपत्रे पद्मप्रिये**
**पद्मदलायताक्षि ।**
**विश्वप्रिये विश्वमनोऽनुकूले त्वत्पादपद्मं**
**मयि संनिधत्स्व ।।१८।।**

जिचे मुख कमळाप्रमाणे आहे, जिच्या हातात कमळ आहे, कमळ जिला अत्यंत प्रिय आहे, कमळाच्या पाकळीप्रमाणे जिचे डोळे आहेत, सर्व विश्वाला (विष्णूला) जी प्रिय आहे, जी श्रीविष्णूंच्या मनाला अनुकूल आहे, अशा श्रीलक्ष्मी! तू तुझे चरणकमल मजजवळ ठेव.

**अश्वदायि गोदायि धनदायि महाधने ।**
**धनं मे जुषतां देवि सर्वकामांश्च**
**देहि मे ।।१९।।**

घोडे, गायी, संपत्ती देणाऱ्या समृद्धीच्या देवते, मजवर धनाची कृपा कर, माझे सर्व मनोरथ पूर्ण कर.

**पुत्रपौत्रं धनं धान्यं हस्त्यश्वाश्वतरीरथम् ।**
**प्रजानां भवतु माता आयुष्मन्तं**
**करोतु मे ।।२०।।**

(हे देवी), तू सर्व जनांची माता आहेस. तू मला मुलगे, नातू, संपत्ती, धान्य, हत्ती, घोडे, गायी, रथ दे. मला उदंड आयुष्य दे.

**धनमग्निर्धनं वायुर्धनं सूर्यो धनं वसुः ।**
**धनमिन्द्रो बृहस्पतिर्वरुणो**
**धनमश्विना ।।२१।।**

(तुझ्याच कृपेने) अग्नी, वारा, सूर्य, आठ वसू, इंद्र, गुरु (बृहस्पती), वरुण हे धनवान झाले आहेत.

**वैनतेय सोमं पिब सोमं पिबतु वृत्रहा ।**
**सोमं धनस्य सोमिनो मह्यं**
**ददातु सोमिनः ।।२२।।**

हे गरुडा, तू सोमरस पी, इंद्रानेही सोमरस प्राशन करावा. सोमरसरूपी धनाच्या धारणकर्त्यांनी मला सोमरस द्यावा.

**न क्रोधो न च मात्सर्यं न लोभो**
**नाशुभा मतिः ।**
**भवन्ति कृतपुण्यानां**
**भक्त्या श्रीसूक्तजापिनाम् ।।२३।।**

श्रीसूक्ताचे नित्य पठण करणाऱ्या पुण्यवान

भक्तांच्या मनात राग, मत्सर, लोभ, वाईट विचार येत नाहीत.

**सरसिजनिलये सरोजहस्ते**
**धवलतरांशुकगन्धमाल्यशोभे ।**
**भगवति हरिवल्लभे मनोज्ञे त्रिभुवनभूतिकरि**
**प्रसीद मह्यम् ।।२४।।**

कमळात निवास करणाऱ्या, हाती कमळ धरणाऱ्या, पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करणाऱ्या, सुगंधी माळांनी सजलेल्या, रमणीय, तिही लोकांना संपन्नता देणाऱ्या, श्रीविष्णूची प्रिय भार्या असणाऱ्या, देवी मजवर कृपा कर.

**विष्णुपत्नीं क्षमां देवीं**
**माधवीं माधवप्रियाम् ।**
**लक्ष्मीं प्रियसखीं देवीं**
**नमाम्यच्युतवल्लभाम् ।।२५।।**

श्रीविष्णूची भार्या, पृथ्वी रूपिणी, माधवाची प्रिय पत्नी तुलसी (माधवी), अच्युताची पत्नी अशा देवीला मी नमस्कार करतो.

**ॐ महालक्ष्म्यै च विद्महे**
**विष्णुपत्न्यै च धीमहि ।**
**तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात् ।।२६।।**


आम्ही महालक्ष्मीला जाणून घेतो, विष्णुपत्नीचे ध्यान करतो. ती लक्ष्मी आम्हाला प्रेरणा देवो.

**श्रीर्वर्चस्वमायुष्यमारोग्यमाविधाच्छोभमानं**
**महीयते ।**
**धनं धान्यं पशुं बहुपुत्रलाभं**
**शतसंवत्सरं दीर्घमायुः ।।२७।।**

(श्रीलक्ष्मी कृपेकरून) संपत्ती, बल, आयुष्य, आरोग्य, धन, धान्य (गाई-बैलादी) पशु, अनेक पुत्र, शंभर वर्षांचे दीर्घायुष्य यांनी आमचे जीवन समृद्ध होवो.

**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।**
**इति श्रीसूक्तम् ।।**

* * *



## श्रीमहालक्ष्मीची आरती

**जय देवी जय देवी जय महालक्ष्मी ।**
**वससी व्यापकरूपे तू स्थूलसूक्ष्मी ।।धृ.।।**

**करविरपुरवासिनी सुरवर मुनिमाता ।**
**पुरहर वरदायिनी मुरहराप्रियकांता ।।**
**कमलाकारे जठरी जन्मविला धाता ।**
**सहस्रवदनी भूधर न पुरे गुण गाता ।।१।।**
**मातुलिंग गदा खेटक रविकिरणी ।**
**झळके हाटक वाटी पीयुषरसपाणी ।।**
**माणिकरसना सुरंगवासना मृगनयनी ।**
**शशिकरवदना राजस मदनाची जननी ।।२।।**
**तारा शक्ति अगम्या शिवभजका गौरी ।**
**सांख्य म्हणती प्रकृति निर्गुण निर्धारी ।।**
**गायत्री निजबीजा निगमागम सारी ।**
**प्रकटे पद्मावती निजधर्माचारी ।।३।।**
**अमृतभरिते सरिते अघदुरिते वारी ।**
**मारी दुर्घट असुरा भव दुःस्तर तारी ।।**
**वारी मायापटल प्रणमत परिवारी ।**
**हे रूप चिद्रूप दावी निर्धारी ।।४।।**
**चतुराननें कुश्चित कर्माच्या ओळी ।**
**लिहिल्या असतील माते माझे निजभाळी ।।**
**पुसोनि चरणातळी पदसुमने क्षाळी ।**
**मुक्तेश्वर नागर क्षीरसागर बाळी ।।५।।**

# सूक्तपठण – एक अनुभव

– सौ. विशाखा निरंजन बिळगी

दुष्काळात तेरावा महिना अशी म्हण आहे.

संपूर्ण जगावर महामारी कोसळली व करोनाच्या ह्या विलगीकरणाच्या काळातच नेमका अधिक महिना आला.

गुढीपाडवा, रामनवमी, श्रावण महिना, गौरीगणपती, सगळेच सण-उत्सव निराशेच्या सावटाखाली आपापल्या घरात पार पडले.

पण अधिक महिना आला तो मात्र सर्वांनाच एक नवी ऊर्जा देणारा ठरला, तो अपर्णाताईंच्या ह्या विष्णुसहस्त्रनाम पठणाच्या एका वेगळ्याच संकल्पामुळे!

प्रथम एक ग्रूप, मग दुसरा, मग तिसरा आणि म्हणता म्हणता चार ग्रूपमधून जवळजवळ हजार जण सहभागी झाले आणि ही आधुनिक सामूहिक विष्णुसहस्त्रनाम पठणाची संकल्पना वातावरणात नादब्रह्म निर्माण करणारी झाली.

आधी जप, मग स्तोत्रपठण, मग परिपाठ आणि त्यावर चिंतन अशी चतु:सूत्री अधिक महिन्यामध्ये साकार झाली आणि एक अनामिक बळ देऊन गेली.

पाठोपाठ घटस्थापनेला श्रीसूक्ताच्या संकल्पाने श्रद्धा दृढावली. स्तोत्रांमधील आर्तता मनाला सात्विक व आशादायी अधिष्ठान देती झाली.

विष्णुसहस्त्रनाम पठण, त्यानिमित्ताने वेद, उपनिषदे, उच्चारशास्त्र, स्मृतिग्रंथ, पुराण यांची अपर्णाताईंनी करून दिलेली ओळख यामुळे अधिक महिना खऱ्या अर्थाने पुरुषोत्तम मास होऊन सार्थकी लागला.

संकल्पापूर्वी गुरुदेवांनी त्यांच्या आशीर्वाद देणाऱ्या चित्रफितीत ह्या स्तोत्राची पार्श्वभूमी सांगितली होती त्यात त्यांनी सांगितले होते ते असे...

'युधिष्ठिर आणि भीष्मांना जे पाच प्रश्न विचारले, त्या पाच प्रश्नांची उत्तरे म्हणजे विष्णुसहस्त्रनाम.'

१) ज्या श्रेष्ठ दैवतांची उपासना मानवाने करावी असं एक मात्र दैवत कोणतं?

२) सर्व मानवमात्रांचे एकमेव आश्रयस्थान किंवा अधिष्ठान कोणतं?

३) मानवाला त्याच्या कर्माचे उत्तमात उत्तम फळ मिळावं म्हणून कोणाची स्तुती, पूजा करावी?

४) या सृष्टीमधील सर्वश्रेष्ठ धर्म कोणता?

५) कोणता जप करावा म्हणजे मानवाचे जन्म-मृत्यूचे चक्र तुटून त्याला मोक्ष प्राप्त होईल?

या पाच प्रश्नांची उत्तरे देताना भीष्मांनी युधिष्ठिराला विष्णू आणि विष्णुसहस्त्रनाम सांगितले आहे.

शेवटी समर्थांचे वचन सांगून गुरुदेवांनी म्हटले होते की, 'बहु नेम करू नये आणि केला नेम टाकू नये.'

त्याप्रमाणे जवळजवळ सर्वांनी आपला नेम पूर्ण केला. या काळात काहीजणांना करोनाला तोंड द्यावे लागले, काहीजणांची हृदय शस्त्रक्रिया झाली. विष्णुकृपेने सर्वच त्यातून बाहेर आले.

अपर्णाताई, तुम्ही दिलेले परिपाठ हे सतत उपयोगी पडतील असे, पुढच्या पिढीला सांगता येतील असे आणि कायम स्मरणात ठेवावेत असे तर आहेतच, परंतु त्यावर अभ्यास करताना बुद्धीला विचारांची चालना, बोटांना लिहिण्याचा व्यायाम मिळाला. आणि दुष्काळात तेरावा महिना ही म्हण बदलून करोनातील हा अधिक महिना, स्वाध्यायाने सार्थकी लागला.

हरिचिंतनाचा ध्यास लागुनि, पुरुषोत्तममास सार्थकी लागला.

आपणा उभयतांस मन:पूर्वक धन्यवाद! व सादर नमस्कार.

* * *

# बोधाची व तृप्तीची उजळणी

– सौ. प्राजक्ता नितीन जोशी

अत्यंत दुर्धर व कठोर महामारीच्या सावटाखाली गेले कित्येक महिने जगत असताना, काही जवळचे, ओळखीपाळखीतले लोक गमावल्याचे दुःख सोसत असताना मध्येच सुखाची एक लाट यावी त्याप्रमाणे पूजनीय गुरुदेव व सौ. अपर्णा माउली यांनी आमच्यासाठी आखलेल्या विष्णुसहस्रनाम व श्रीसूक्त पठण या दोन उपक्रमातून सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात आम्हाला आत्यंतिक समाधान व शांतता लाभली.

समर्थ रामदास म्हणतात, 'आपुला काळ सार्थक केला । रघुनाथकीर्तिमधें बुडाला । भूमंडळीं उधरिला। बहुत लोक ।।' (श्रीमत दासबोध १६-१-२०) या ओवीप्रमाणेच पू. गुरुदेव व माउलींनी आम्हाला पुरुषोत्तम मास व लगोलग आलेल्या नवरात्रीत भगवद्भक्तीचे अभ्यंग स्नान घातले. दि. १८ सप्टेंबर २०२० रोजी पुरुषोत्तम मासाला प्रारंभ झाला, तेव्हापासून ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत आम्हा सर्व आदित्य प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांच्या, सुहृदांच्या घरात, मनात भगवद्भक्तीचा अखंड वर्षाव होत होता. 'अंतरी गेलिया अमृत । बाह्य काया लखलखीत ।।' (श्रीमत दासबोध ८-९-१) या समर्थांच्या ओवीप्रमाणेच आमच्यातील प्रत्येकजण त्यात नखशिखांत न्हाऊन निघाला असेल यात शंकाच नाही.

विष्णुसहस्रनाम व श्रीसूक्त पठण या उपक्रमांमध्ये आठशेहून अधिक भगवद्भक्तांनी सहभाग घेतला. हे पठण इतर सामान्य समूहांसारखे व्हॉटस् ॲपवरून झाले असले तरी त्याचे परिणाम असामान्य होते. त्यात निव्वळ सहभाग नव्हता तर दृढ श्रद्धेने आचरलेले ते एक व्रत होते. विष्णुसहस्रनाम पठणासाठी सायंकाळी ४ ची वेळ निश्चित करण्यात आली पण त्या अगोदर ५ मिनिटांचे 'ओम नमो भगवते वासुदेवाय' हे नामस्मरण आखून दिले होते. 'परमेश्वराची अनंत नामे । स्मरतां तरिजे नित्यनेमें । नामस्मरण करितां, येमें-। बाधिजेना।।' (श्रीमत् दासबोध ४-३-१९). नामस्मरणाचे महत्त्व आपण पूजनीय गुरुदेवांच्या प्रवचनांतून कायम श्रवण केले आहे, त्यामुळे सौ. काकूंनी दिलेले नामस्मरण करताना मन, चित्त, बुद्धी व अहंकार श्रीविष्णू चरणांशी एकरूप व्हायचे. दिवसभराच्या दगदगीने त्रासलेले मन शांत व्हायचे आणि श्रीचरणी स्थिरावायचे. यातील महत्त्वाचा आणि आश्चर्यकारक मुद्दा असा की प्रत्येकजण आपापल्या घरी बसून हे नामस्मरण व पठण अगदी ठरवून दिलेल्या वेळेतच करत होता. पठण पूर्ण झाल्यावर सर्वजण नमस्कार चिन्हाची पावती व्हाटस ॲपवर टाकत असत त्यामुळे प्रत्येकालाच आपण सामूहिक पठण करत असल्याचा अनुभव मिळाला.

सौ. अपर्णाकाकूंच्या आवाजातील विष्णु-सहस्रनाम व डॉ. आदित्य अभ्यंकरदादांनी विशिष्ट कलात्मक पद्धतीने डिजाईन केलेल्या श्रीविष्णू मूर्तीचे मागील पडद्यावरील अत्यंत तेजस्वी चित्र ह्या दोनही गोष्टी पठणाचे सर्वोत्कृष्ट बिंदू होते. अत्यंत स्पष्ट उच्चार, सावकाश चाल व पडद्यावरील काळजीपूर्वक सरकणारी अक्षरे यामुळे विष्णुसहस्रनामासारख्या म्हणायला कठीण असणाऱ्या श्लोकांची आम्हाला गोडी लागली. यासाठी पूजनीय गुरुदेव व सौ. अपर्णा माउली

यांचे आम्ही आजन्म ऋणी राहू! हा पठण विडिओ यूट्यूबवर कुणालाही, कधीही ऐकता, बघता येऊ शकतो ही किती सुंदर गोष्ट! विष्णुसहस्रनाम पठण झाल्यावर सौ. काकूंच्या सुचनेनुसार आम्ही घरातील देवांना दूध-साखरेचा नैवेद्य अर्पण करत असू. चित्तात दाटणारे आत्यंतिक समाधान, मनात व घरात शांतता, सात्त्विक वातावरणाची निर्मिती, मनात नकळत घोळणारे श्लोक, रोज ४ वाजता एका जागी बसून हे सात्विक कार्य करण्याचा केलेला नियम, खरोखरीच एकदाही त्यात विघ्न न येणं हे सर्वच दैवी अनुभव आमच्यातील प्रत्येकानेच या दरम्यान अनुभवले. एक महिना दुपारी अगदी नियमितपणे व आवडीने विष्णुसहस्रनाम पठण सर्वांनी केले परंतु त्याची गोडी इतकी वाढत गेली की बऱ्याच जणांनी हा उपक्रम पुरुषोत्तम मास संपल्यावर देखील सुरू ठेवला. दैवी शक्ती व सद्गुरू कृपा या दोन्हीचा हा मंगल प्रसादच नव्हे काय!

पुरुषोत्तम मासानंतर लगोलग या वर्षी देवीचा उत्सव म्हणजेच नवरात्र होते व देवीची उपासना करण्याची ही सुवर्ण संधी सर्वांनाच मिळावी या सात्त्विक उद्देशाने अगोदरच सौ. अपर्णाकाकूंनी 'श्रीसूक्त, तंत्रोक्त देवीसूक्त व अर्गला स्तोत्र पठणाचा उपक्रम' आखून ठेवला होता. नवरात्रीचे नऊ दिवस व पुढे ३१ ऑक्टोबर म्हणजे कोजागरी पौर्णिमेपर्यंत हे पठण आम्हा सर्वांकडून देवी दुर्गा मातेनेच करून घेतले. ह्या उपक्रमातही ५०० च्या वर देवी भक्तांनी सहभाग घेतला. ज्यांच्या घरात घट बसले, देवी दुर्गा मातेचे आगमन झाले, त्यांना तर नऊ दिवस अक्षरश: सात्त्विक मेजवानी होती. या पठणात देखील सौ. अपर्णाकाकूंनी पहिली ५ मिनिटे देवीचे नामस्मरण व नंतर २० मिनिटे पठणासाठी आयोजिली होती. सौ. अपर्णाकाकूंच्या आवाजातील तीनही स्तोत्रे डॉ. आदित्यदादांनी तयार केलेली देवीची विविध रूपातील चित्रफीत आणि अत्यंत सुश्राव्य अशी देवीची शेवटी म्हटली जाणारी आरती, हे या पठणाचे केंद्रबिंदू होते. देवीला घरोघरी रोज गोडाचा नैवेद्य तर दाखविला जात होताच परंतु यावर्षी आपल्या भक्तांकडून हे सत्त्वपूर्ण सुग्रास भोजन करून देवी माता देखील प्रसन्न झाली असेल यात किंचितही शंका नाही.

महिनाभर शिस्तीत विष्णुसहस्रनाम पठण केल्यानंतर देवीची ही उपासना करताना आम्ही शिस्तीत होतोच त्यामुळे उलट हे उपक्रम संपल्यावर मनाला व चित्ताला अजून सात्त्विक हवे आहे अशी भूकही जाणवत होती. ही सात्त्विक भूक सदैव राहावी म्हणून परमार्थाचा स्वार्थ साधायला सद्गुरू सांगतात, 'भल्यानें परमार्थी भरावें । शरीर सार्थक करावें । पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ती करुनी।।' (श्रीमत दासबोध १-९-२७)

खरंतर या भक्तिमय उपक्रम मालेची सुरुवात ३ वर्षांपूर्वी सौ. अपर्णा काकूंनी सुभाषितमाला, भर्तृहरीचे नीतिशतक, विदुरनीती यातील अत्यंत सुंदर सुभाषिते दररोजच्या मननासाठी देण्यापासून सुरुवात झाली. दैनंदिन जीवनातील सुखदु:खांच्या रहाटगाडग्यातून जाताना ही सुभाषिते मार्गदर्शक ठरली. खरंतर प्रत्येक सुभाषित हे शांतपणे बसून अभ्यास, मनन व चिंतन करण्यासारखे होते परंतु प्रपंच मगरमिठीतून म्हणावा तसा वेळ या मननाला आम्हाला देता आला नाही.

परंतु सद्गुरु सर्वच जाणतात, म्हणूनच की काय काकूंनी ३० आदित्यव्रतींना निवडक सुभाषितांवर आपले चिंतन मांडण्यास प्रवृत्त केले. त्यानुसार दररोज एका आदित्यव्रतीने आपले चिंतन

सर्वांसमोर मांडले. या उपक्रमाचे सौ. अपर्णाकाकूंनी 'सुप्रभात सुविचार' असे यथायोग्य नामकरण केले. आपल्या मनावर कोरली गेलेली सुभाषिते निवडायची व त्यावर आपले चिंतन लेखस्वरूपात मांडायचे असे त्याचे स्वरूप होते. म्हणजेच या लेखांच्या माध्यमातून इतरांना देखील सुभाषितांची उजळणी होईल व त्या अनुषंगाने मनन घडेल हा उद्देश! आणि सर्व आदित्यव्रतींनी आपापले चिंतन अतिशय सुंदर पद्धतीने सादर केले.

या उपक्रमा दरम्यान आदित्यव्रतींच्या विविध भावना, पूजनीय गुरुदेव व माऊलींवर असणारे प्रेम, संत वाङ्मयावरील श्रद्धा, आदित्य प्रतिष्ठान व गुरुबोधांवर असणारा दृढ विश्वास, गुरुदेवांनी दाखविलेल्या मार्गावरून चालत राहण्याची धडपड, वैश्विक संत विद्यापीठ लवकरात लवकर उभे राहावे म्हणून मनोमन होणारी प्रार्थना इ. अनेक पैलू दिसले. काहींनी तर थोडक्या शब्दांत मांडलेला त्यांचा जीवनालेख, पू. गुरुदेव व आदित्य प्रतिष्ठानशी आध्यात्मिक नाते जुळल्यानंतर आयुष्यात झालेला बदल अतिशय मनमोकळेपणाने मांडला. काहींचे लेख इतके अभ्यासपूर्ण होते की सर्व सुभाषितांचे पुन्हा एकदा मनन आमच्याकडून घडले. पू. गुरुदेव व त्यांचे वाङ्मय ह्यांच्या सुसंगात आल्याने प्रत्येकाच्या भाषेवर झालेला सुवासिक परिणाम प्रत्येक लेखातून जाणवत होता.

ज्येष्ठ आदित्यव्रतींनी लिहिलेले अभ्यासपूर्ण लेख हे त्यांच्या अनुभवाच्या, श्रवण, मननाच्या शब्दरत्नांनी अलंकारित झालेले होते, तर युवा मंडळ आदित्यव्रतींचे लेख हे चालू वर्तमान परिस्थिती व सुभाषितांमधील तत्त्वज्ञान यांची सांगड घालणारे अतिशय प्रॅक्टिकल असे होते. त्यामुळे आम्हा वाचकांना दोनही प्रकारचे अनुभव घेता आले. येथे काही विशेष अलंकार त्या विचार रत्नांची आठवण म्हणून देत आहे–

'हे रोज वाचनात येणारे सुविचार आम्हाला स्वत:कडे बघण्यासाठी प्रवृत्त करत होते. स्वत:चे आचरण कसे आहे व ते कसे असले पाहिजे याचा आम्ही नकळत शोध घेत होतो. आत्मउन्नतीकडे नेणारी ही सुभाषिते आम्हाला रोज प्रेरणादायी आहेत.' – सौ. अनुराधा तळपदे

'सुभाषितं ही ज्ञानाचे कोशच आहेत. ज्यांना म्हणी येतात, ते व्यवहारात सहसा फसत नाहीत असं कुठे तरी वाचलं होतं. तसं असेल तर ज्यांना सुभाषितं येतात त्यांचं चित्त मूढ राहणारच नाही. ते परमार्थाची वाटचाल निश्चित करतील असं वाटतं.' – सौ. मुग्धा बापट

'ही सर्व सुभाषितं केवळ आपल्या आत्मोन्नतीसाठी आणि आपल्या सर्वांना सात्त्विक कर्ता होण्यासाठी अपर्णा आई नित्य-नेमाने पाठवत होत्या. या सुविचारांमुळे दैनंदिन जीवनात सार-आसर, नित्य-अनित्य, योग्य-अयोग्य अशी विवेकाची टाचणी मला सापडली.' – श्री. निलेश जालनावाला

'सुभाषितात म्हटल्याप्रमाणे आई व गुरुदेव वेळोवेळी शहाणे करत असतात. आपण कसे वागावे, कसे बोलावे, आचरण कसे ठेवावे इत्यादी सर्व गोष्टी सांगत असतात. या सर्वांतून मी नियोजन, एखाद्या गोष्टीसाठी घेतलेला ध्यास, त्यासाठी लागणारा अभ्यास, सातत्य, नीटनेटकेपणा या सर्व गोष्टी शिकले.' – सौ. मधुरा अभ्यंकर

'प्रत्येकालाच आपले शरीर सुदृढ ठेवण्यासाठी जसे चांगल्या पौष्टिक, सात्त्विक अन्नाची गरज, आवश्यकता असते. तद्वतच आपले मन, बुद्धी सात्त्विक राहण्यासाठी सद्‌विचारांनी युक्त अशा वाङ्मयाची नितांत गरज असते. असे सर्व वाङ्मय आपल्या सर्व आदित्यव्रतींना गुरुदेव आणि गुरुपत्नी

सौ. अपर्णाहिनींकडून सतत मिळत आले आहे.' – सौ. स्वाती कुलकर्णी

'मनात आलं प्रतिष्ठानचे कुटुंबप्रमुख, पिता या नात्याने गुरुदेव ज्ञानभांडार प्रदान करतात आणि त्यातील दालने आपण मातेच्या ममतेने रोज हळुवाऽऽर उघडून देता. यामुळे शुद्ध, सात्त्विक विचारांचा हवाहवासा वाटणारा प्रवाह अखंड मिळत राहतो. हातून सत्कर्मच घडावं अशी ओढ लागते. मन व्यापक होतं. त्यात विश्वकुटुंबाचा विचार स्थिरावू लागतो. व्यष्टी-व्यष्टी घडते आणि समष्टीच्या हिताचे चिंतन करू लागते.' – सौ. रश्मी तुळजापूरकर

'या सर्वातून मला काय शिकायला मिळाले? एक म्हणजे सर्व वाङ्मयीन कलाकृतींमधून मिळालेला माझ्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तीला आचरणात आणण्यायोग्य असा उपदेश. दुसरे महत्वाचे म्हणजे हा उपदेश अत्यंत व्यस्त जीवन असलेल्या अपर्णाताई सतत तीन वर्षे न चुकता दररोज सुविचार पोस्ट करतात, आपल्या संस्थेतल्या सर्वांना काहीतरी असे वाचायला मिळाले पाहिजे की त्याने त्यांची प्रगती / उन्नती झाली पाहिजे आणि म्हणून एखादा वसा / व्रत घेतल्याप्रमाणे तो पूर्णत्वाला नेतात तसा नियमीतपणा एखाद्या बाबतीत जरी मला जमला तर जे शिकायला मिळाले त्यातले थोडे का होईना आचरण्यात आणता आले याबद्दल स्वत:ला धन्य मानेन.' – सुहासिनीताई कुबेर (युएसए)

'गेली तीन वर्ष अपर्णाताई ज्ञानदान यज्ञात सद्विचारांची एक-एक समिधा वाहत होत्या, आपण फक्त स्वाहा करत होतो. मूळ श्लोक, त्याचा वाक्यार्थ व त्यातील सूचित अर्थ, असा त्रिगुणी प्रभाव आपल्यावर होत होता. प्रतिदिनी येणाऱ्या भर्तृहरीच्या नीतीशतकांनी आणि विदुरनीतीने अंतर्मुख केले. नीती, सदाचार, निरहंकार, अभ्यास, चातुर्य, सत्संगतीचे माहात्म्य सांगणाऱ्या गुणांचा सुसंस्कार प्रतिदिनी आमच्या चित्तावर केला.' – सौ. विशाखा बिळगी

'संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ । नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ॥' व 'संत विश्रांतीची । संत तृप्तीची निजतृप्ती । नांतरी भक्तीची फळश्रुती। ते हे संत ॥' (श्रीमत दासबोध १-५-१६ व १७) समर्थ रामदास सांगतात त्याप्रमाणेच आदित्य प्रतिष्ठानशी जोडला गेलेला प्रत्येक मनुष्य हा पूजनीय गुरुदेव व गुरु माउलींचाच होऊन राहतो. पू. गुरुदेवांचा सहवास म्हणजेच आनंदाचे स्थळ, त्यांचे वाङ्मय, प्रवचनमाला, कीर्तन, तीर्थयात्रा, निरनिराळे उपक्रम म्हणजेच निरंतर सुख! अशाश्वत सुखाच्या मागे पळून, धडपडून, त्रिविध तापाने पोळून थकल्या भागल्या जिवांना सापडलेले 'संतोषाचे मूळ व विश्रांतीची विश्रांती' म्हणजेच पूजनीय गुरुदेव व गुरुमाउलींचा सत्संग. त्यांच्या गुरुबोधात आकंठ बुडणे म्हणजेच तृप्तीची निजतृप्ती! सद्गुरू बोध श्रवणाने आपल्यात अंतर्बाह्य घडत जाणारा बदल म्हणजेच भक्तीची फलश्रुती! या कलियुगात जिथे आजूबाजूला अंधारच आहे, त्यात प्रकाशाची सात्त्विक ज्योत म्हणजेच आदित्य प्रतिष्ठान होय. तेव्हा पू. गुरुदेव, गुरु माऊली आणि आपल्या संतांनी दाखविलेल्या सत्पथावर आजन्म चालत राहण्याची सद्बुद्धी, शक्ती व धृती आम्हाला मिळावी हीच भगवान श्रीविष्णू व दुर्गा मातेच्या चरणी विनम्र प्रार्थना.

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

* * *

# श्रद्धांजली



**कै.डॉ.शरदराव रेगे**

अमेरिकेतील लाँग आयलंड, न्यू जर्सी येथे राहणारे डॉ. शरदराव रेगे यांचे वयाच्या नव्वदाव्या वर्षी दु:खद निधन झाले. २७ सप्टेंबर २०२० एकादशीला त्यांचा देह पंचत्वात विलीन झाला. याचे अतीव दु:ख गुरुदेव व अपर्णाताईंना आहे.


डॉ. शरद रेगे हे अत्यंत सच्छील, मनमिळावू, मृदुभाषी असे व्यक्तिमत्त्व होते. ७० व्या वर्षापर्यंत त्यांनी वैद्यकी केली. त्यानंतर त्यांनी ठरवले की आता उपेक्षितांसाठी प्रॅक्टिस करायची. त्याप्रमाणे त्यांनी तेथील मागासवर्गीयांसाठी विनामूल्य औषधोपचार चालू केले, ते शेवटपर्यंत! असे उदाहरण दुर्मिळच!!

गुरुदेवांशी, आदित्य प्रतिष्ठानशी त्यांचा गेली २० वर्षे घनिष्ठ संबंध होता. गुरुदेवांच्या पहिल्या अमेरिका दौऱ्यामध्ये त्यांनी न्यू आयलंड येथे प्रवचने आयोजित केली होती. त्या व त्यांच्या पत्नी विभावरीताई म्हणजे उत्साहमूर्तीच! यानंतर प्रत्येक दौऱ्याला गुरुदेव व अपर्णाताई त्यांच्याकडे जात असत. वेळोवेळी त्यांनी प्रतिष्ठानला संत भारतीसाठी देणग्या दिल्या. अध्यात्मातील अनेक शंका डॉक्टर गुरुदेवांना विचारत असत.

अत्यंत शांतपणे एक एक घास कमी करत त्यांनी आपला देह पंचत्वात विलीन केला. विभावरीताई व चि. शाम यांच्या दु:खात आदित्य प्रतिष्ठान सहभागी आहे.

डॉक्टरांना विनम्र श्रद्धांजली. त्यांना सद्गती मिळो हीच ईशचरणी प्रार्थना!


---



**कै. मोहनराव रामचंद्र फडणीस**

आदित्य प्रतिष्ठानचा कार्यकर्ता रोहित फडणीस याचे वडील श्री. मोहन रामचंद्र फडणीस, वय ६६, दि. ८ सप्टेंबर २०२० या दिवशी कोरोनामुळे निधन झाले.

मूळचे मुंबईचे. १९९३ साली पुण्यात स्थायिक झाले. व्यावसायिक. महाराष्ट्रातील पाचही संत (ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास) यांच्या ग्रंथांचे हस्तलिखित दीड वर्षात पूर्ण केले. त्यांचे अक्षर सुघड व सुवाच्य होते आणि सर्व ग्रंथ स्वत:च्या हातानी लिहून काढले, या त्यांच्या उपक्रमाची सर्व वृत्तपत्रांनी दखल घेतली होती. आदित्य प्रतिष्ठानशी त्यांचे अनेक वर्षांचे दृढ संबंध होते.




**गेली अनेक वर्षे सर्वाधिक मागणी असलेल्या**
**गुरुदेव शंकर अभ्यंकर लिखित**
**पसायदान ग्रंथाची**
**दहावी आवृत्ती आता प्रकाशित**
**पृष्ठसंख्या**
**आठ + ३९२ = ४०० (सिंगल डेमी)**
**देणगी मूल्य रु. ३००/-  सवलत मूल्य रु. २१०/-**



## माझ्या तरुण मित्रांनो!

गुरुदेव

### प्राचीन भारतात विमाने होती का?

भारतातील बहुसंख्य सुशिक्षित वर्गाचे मत असे आहे की भारतात प्राचीन काळी विज्ञान नव्हतेच. या वर्गाचे असे मत होण्याची दोन कारणे आहेत– १) प्राचीन भारतातील विज्ञानाचा परिचय आपल्या अभ्यासक्रमात कधी आलाच नाही. २) प्राचीन भारतात विज्ञान होते किंवा नाही, याला स्वतंत्र अभ्यास करण्याची तत्परता आणि जिज्ञासा या वर्गाने दाखविली नाही. मग कृती दूरच!

भारतात प्राचीन काळी विमाने होती का? या प्रश्नाचे उत्तर आमचा सुशिक्षित तरुण 'छे हो! सगळ्या भाकडकथा!' असेच देईल.

आता वास्तव काय आहे पहा.

**रामायणकालीन विमाने –** रामायणात विविध स्थळी विमानांचे उल्लेख आले आहेत. पुष्पक विमानाचा उल्लेख तर सर्वश्रुत आहेच. रावण स्वत: सीताहरणासाठी छोट्या विमानातून आला होता. तत्पूर्वी खरदूषणांचा श्रीरामांनी केलेला वध देवतांनी विमानातून पाहिला.

ऋग्वेदात (१.२५.७; १.३०.१९; १.११६.३) या तीन स्थळी विमानांचा स्पष्ट उल्लेख आला आहे. महर्षि भरद्वाजरचित **'यन्त्रसर्वस्व'** नावाचा सुमारे अडतीस हजार ओव्यांचा बृहद ग्रंथ आहे. त्यात चाळीस अध्यायांचे बृहद् विमानशास्त्र (वैमानिक प्रकरण) आहे. त्यात विमानांचे जातिभेद, विविध गती, रचना, प्रकार इत्यादींचे तपशीलवार वर्णन ८ अध्याय, १०० अधिकरणे, ५०० सूत्रांमध्ये महर्षि भरद्वाजांनी केले आहे.

'देशात् देशान्तरं तद्वद द्वीपाद् द्वीपान्तरं तथा । लोकात् लोकान्तरं चापि य: अम्बरे गन्तुमर्हति ।। स विमान इति प्रोक्ता--।' अशी विमानाची स्पष्ट व्याख्या केली आहे. विमान हा शब्द व्योमयान (व्योम = आकाश व यान = उडणारे यंत्र) या संस्कृत शब्दापासून सिद्ध झाला आहे. भरद्वाजांच्या ग्रंथात विमान चालविण्याची बत्तीस रहस्ये दिली आहेत. उदा. परशब्द ग्राहक रहस्य म्हणजे वायरलेस, दिक्प्रदर्शनरहस्य म्हणजे रडार असे कितीतरी विलक्षण आले आहे.

**'यन्त्रसर्वस्व'** हा ग्रंथ, दाक्षिणात्य पंडित सुब्बराय शास्त्री यांनी संपादित केला होता. त्याचे इंग्रजी भाषांतर G. R. JOSYER (Hon. Director, International Academy of Sanskrit Research) यांनी कोरोनेशन प्रेस, म्हैसूर यांचे वतीने दि. १५-३-१९७३ रोजी प्रकाशित केले. त्यात विमानाचे रुक्म विमान, सुंदर विमान, त्रिपुर विमान, शकुन विमान असे बहुविध प्रकार दिले असून Electric Power Generator व Electric Motor याचीही आकृत्यांसहित चर्चा केली आहे. या पुस्तकाचे प्रारंभी JOSYER म्हणतात–

'The 'Vymanika Sastra' is a Cornucopia of precious formulas for the manufacture of Aeroplanes, which should make Lindbergh, Rolls, Zeppelin, De Havilland, Tupolev and Tupolev and Harold Gray of Pan American, gape in astonishment, and if duly worked up, herald a new era of Aeroplane manufacture for the benefit of Mankind!'

आमचे सुशिक्षित तरुण, विशेष करून आदित्य, प्रतिष्ठान- आदित्य मंडलाचे युवा आदित्यव्रती तरी सावध होऊन लक्ष देतील का? यावर संशोधन करतील का?

* * *